१९५१

# वऱ्हाडी कणसें

( लघुनिबंधसंग्रह )

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८८८

लेखक :

बालशंकर देशपांडे


REFBK-0007553

क डेपो, मुंबई नं. ४.

किंमत दोन रुपये

REFBK-0007553

आयुष्याच्या विम्याकरितां
व
एजन्सीकरितां लिहा



## गुडवुइल अॅश्युअरन्स कं. लि.

गुडलक् ऑर्गनायझेशन— C/o के. एम्. उपाध्ये
१६, गोखलेवाडी, भवानीशंकर रोड, दादर, मुंबई २८.

हेड ऑफिस
११३ महात्मा गांधी रोड, क्लॉक टॉवरसमोर,
फोर्ट, मुंबई १

टे. नं. ३०५६८

—शाखा व ऑर्गनायझिंग ऑफिसेस्—

बंगलोर, कोइमतूर, सालम, मदुरा, मद्रास,
पुणे, नाशिक, बेळगांव, हुबळी, देवगड,
( रत्नागिरी ) वगैरे

## एस. एस. सी. जनरल मराठी प्रश्नोत्तरें---

ले. **चिटणीस व बेंबळकर** ( शिक्षक किंग जॉर्ज हायस्कूल )

अभिनव मराठी प्रश्नोत्तरांचें एकच एक पुस्तक ! पृ.२२० किं. २ रु.

## प्रश्नोत्तररूपी नागरिकशास्त्र व अनुशासनपद्धति—

ल. **वेलदे व डेंगळे** आवृत्ति २ री, पृ. १२६ किं. १ रु.

दोन्हीही पुस्तकांच्या वाचनानें ८०% मार्कांची खात्री !

**न्यू अँड सेकंड हँड बुक स्टॉल**

**न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई २८.**

---

# शिसा ऑप्टिशिअन्स

**( प्रो. शिरोडकर आणि साळवी )**

**चष्म्याचे व्यापारी**




**छबिलदास रोड, दादर ( बी. बी. सी. आय. ) मुंबई नं.२८**

डोळ्याच्या तज्ञ डॉक्टराकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

गिऱ्हाइकांचें समाधान हेंच आमचें ध्येय !

# हरिभाऊ विश्वनाथ कं.

आकर्षक संगीत वाद्यांचे एकमेव कारखानदार



दादर, मुंबई नं. १४

शाखा

सॅन्डहर्स्ट रोड, आणि अहमदाबाद.

## —: आमचीं प्रकाशनें :—

| | | | किंमत |
| --- | --- | --- | --- |
| **वासुदेव बळवंत फडके**–वि. श्री. जोशी | ... | ... | १–८–० |
| **मंगला** (कादंबरी)–वि. श्री. जोशी | ... | ... | २–८–० |
| **अन्नदाता**–माधव मनोहर ... | ... | ... | २–०–० |
| **सामुद्रिक प्रकाश** ( हस्तसामुद्रिक ) | ... | ... | २–०–० |

*आमचेकडे सर्व प्रकारचीं शाळा-कॉलेजचीं नवीं-जुनीं पुस्तकें मिळतात. सर्व प्रकारच्या जुन्या पुस्तकांची चौकशी करावी.*

**न्यू अँड सेकंड हँड बुक स्टॉल**

**न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई २८.**

---

# उत्तम वस्तु भांडार

प्रोप्रायटर :

**के. आर. आणि कंपनी**

रानडे रोड एक्स्टेन्शन व डी. एल्. वैद्यरोड नाका,

दादर, मुंबई नं. १४

**चहा, कॉफी, स्टेशनरी, पेपरमिंट; बिस्किटें व टॉयलेट वगैरे मिळण्याचें ठिकाण.**

मराठी भाषेंतील उद्‌बोधक व विचारप्रवर्तक साप्ताहिक

# अ खं ड भा र त

वा. व. ५ रुपये ( सर्व विशेषांकासह )

अखंड भारतांत प्रदर्शित केलेल्या राजनैतिक, आर्थिक व तत्त्वज्ञानिक विचारांबद्दल अनेक थोर लोकांनीं प्रशंसापर उद्‌गार काढले आहेत—
भारतांतील प्रख्यात विद्वान् पंडितराज राजेश्वरशास्त्री द्रवीड,
पंडित देवनायक आचार्य, प्रा. वि. वि. देशपांडे, श्री. गो. म.
जोशी इ. लोकांचे विचारप्रवर्तक लेख नियमानें
वाचण्याचें एकमेव साधन म्हणजेच—
'अखंड भारत' होय.

पत्ताः—२८१ बुधवार, पुणें २

शुद्ध आकर्षक, कलापूर्ण व प्रतिष्ठित

छपाईसाठीं प्रसिद्ध

## श्रीशारदा मुद्रणालय

२८१ बुधवार, पुणें २.

# सुरस ग्रंथमाला

स्थापना ] पंढरपूर ( B. L. Ry.) [ १९१३

## आकर्षक योजना

रुपये तीस वार्षिक वर्गणी भरून
मालेंतून निघणारीं ९ ते १२ उत्कृष्ट पुस्तकें,
क्रौनचीं सुमारें २००० पृष्ठें, घरपोंच मिळतील.
केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

**अलीकडील नवीं प्रकाशनें—**

भिरभिरें—( गाडगीळ )
गृहिणी—( निरंतर )
तूं भेटायला नको होतास ( डॉ. वाचर )
मायेचा पाझर—( शांता शेळके )
मीलन—( अरविंद गोखले )
अल्मिनार—( पद्माकर डावरे )
जीवन-नृत्य ( सौ. साने )

आणि इतर कित्येक. तावडतोब वर्गणीदार व्हा ! मालेचें नवीन पुष्प ' **बजाजी निंबाळकर** ' विक्रीस तयार ! !

**कांहीं आगामी प्रकाशनें—**

नौका-डुबी—( रवींद्रनाथ टागोर )
कावळा व ढापी—( साहित्यसम्राट् केळकर )
! ! ! ( बाळशास्त्री हरदास )

# वऱ्हाडी कणसें

( लघुनिबंधसंग्रह )

७५४३
१२००० २८/७/५३

लेखक :

बालशंकर देशपांडे

श्री समर्थ बुक डेपो, मुंबई नं. ४.

किंमत दोन रुपये

प्रकाशक :
रामचंद्र व्यंकटेश देशपांडे
प्रोप्रायटर श्रीसमर्थ बुक डेपो,
गिरगांव, मुंबई नं. ४.

सर्व हक्क सौ. पद्मा देशपांडे ( उमरखेडकर ) यांच्या स्वाधीन

आवृत्ति पहिली, डिसेंबर १९५१

मुद्रक :
वा. भा. जोशी
ज्ञानविलास प्रेस,
२७ बुधवार, पुणें २.

प्रिय पत्नी सौ. पद्मा होस

# आभार !

या लघुनिबंधसंग्रहांतील निबंध क्रमांक १३ व १४ सोडून बाकीचे सर्व निबंध निरनिराळ्या नियतकालिकांत यापूर्वी प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या पुनर्मुद्रणास परवानगी दिल्याबद्दल त्या त्या नियत-कालिकांच्या संपादकांचा मी अत्यंत आभारी आहें.

प्रस्तुत लघुनिबंधसंग्रहाचे प्रकाशक श्री. रा. व्यं. देशपांडे (मालक श्रीसमर्थ बुकडेपो, मुंबई ), मुद्रक श्री. वा. भा. जोशी ( मालक ज्ञानविलास प्रेस, पुणें ) व श्री. व्ही. जी. मेहेंदळे ( संचालक रम्य-कथा प्रकाशन, पुणें ), यांच्या सहकार्यामुळेंच पुस्तकप्रकाशनाचा योग येऊं शकला हें मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतों.

ज्यांच्या बहुश्रुत, कार्यकुशल व प्रेरक व्यक्तिमत्वाच्या कृपाछत्रा-खालीं गेलीं आठ वर्षें शिक्षकीचा व्यवसाय सांभाळून साहित्यनिर्मिति करण्यासाठीं आवश्यक तें मनःस्वास्थ्य मला लाभूं शकलें, ते श्री. केशव गोपाळ उर्फ नानासाहेब अक्षीकर, ( प्रमुखाध्यापक, छबिलदास लल्लूभाई बॉईज हायस्कूल, दादर ) यांचा साभार उल्लेख केल्या-शिवाय आभारप्रदर्शनाचें कार्य पूर्ण होणें शक्य नाहीं.

२, राजगुरुनिवास
पाईप लेन, वाकोला,
सांताक्रूझ, मुंबई २९.

बालशंकर देशपांडे

श्री. बालशंकर देशपांडे

# यांचें वाङ्मय

## ★ प्रकाशित

१ श्रावणांतल्या विजा (लघुकथासंग्रह)
प्रस्तावना वि. स. खांडेकर
२ यमुनाजळीं ( लघुकथा व लघुनिबंधसंग्रह, दुसरी आवृत्ति. )
आग्रा विद्यापीठानें बी.ए.च्या अभ्यासक्रमांत समाविष्ट केलेलें.
३ माझें जग ( स्वतंत्र सामाजिक कादंबरी )
४ शोभेचें सौभाग्य ! ( लघुकथा व लघुनिबंधसंग्रह. )
५ शिव्या आणि ओव्या ( लघुनिबंधसंग्रह. )
६ तांडव आणि लास्य ( लघुकथा व लघुनिबंधसंग्रह )
७ वऱ्हाडी कणसें ( लघुनिबंधसंग्रह. )

## ★ आगामी

सागराच्या सीमा ( कादंबरी )
मनांतलें चांदणें ( लघुकथासंग्रह )
अडला नारायण ( विनोदी नाटक )
टोण्या ( लहान मुलांसाठीं कादंबरी )
हॉलकेन ( व्यक्ति आणि वाङ्मय )
वाङ्मयीन टीकेचीं मूल्यें (अनुवादित)

# वऱ्हाडी कणसें

“ खळेदानें विश्व सुखी करी होत रासी
सारा सारुनिया ज्याचे भाग देई त्यासी
तुका म्हणे मग नाहीं आपुलें कारण
निज आलें हातां भूस सांडलें निकण ॥ ”

—तुकाराम

बालशंकर देशपांडे

# अनुक्रमणिका


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | रुचिपालट ( 'सुषमा' दिवाळी अंक १९५० ) | ... | १७ |
| २ | अविचार ( 'महा-राष्ट्र' दिवाळी अंक १९५०) | ... | २३ |
| ३ | थोर तुझे उपकार, बापा ('वसंत' दिवाळी अंक १९५०) | | २८ |
| ४ | पांच तोंडांचा राक्षस ('दै. भारत' दिवाळी अंक १९५०) | | ३६ |
| ५ | छापाचे गणपती ( 'मातृभूमि' दिवाळी अंक १९५० ) | | ४२ |
| ६ | गुणगुण ( 'दीपज्योत' दिवाळी अंक १९५० ) | ... | ४७ |
| ७ | फॅन्सी वांगड्या ( 'हंस' जानेवारी १९५१ ) | ... | ५५ |
| ८ | नटीचा अभिप्राय ( 'महा-राष्ट्र' दिवाळी अंक १९५१ ) | | ५९ |
| ९ | मोडका बाजार ( 'अखंड भारत' दिवाळी अंक १९५१ ) | | ६५ |
| १० | डबक्यांतील कमळें ( 'वसुधा' दिवाळी अंक १९५१ ) | | ७० |
| ११ | कृत्रिम तलाव ( 'रुपेरी दर्या' दिवाळी अंक १९५१ ) | | ७४ |
| १२ | ज्ञानेश्वरांचा रेडिओ ! ( 'अभ्युदय' डिसेंबर १९५१ )... | | ७९ |
| १३ | अदृश्य कावड ( अप्रकाशित ) ... | ... | ८६ |
| १४ | भाजींत भाजी मेथीची-( अप्रकाशित ... ) | ... | ८८ |

# रुचिपालट :

हैद्राबादला शिक्षणासाठीं राहिलों होतों तेव्हांची गोष्ट. गौळी-गुड्यांतल्या ढेकरे खानावळींतलं ठराविक चवीचं तेंच तेंच अन्न खाऊन आम्हां विद्यार्थ्यांना आयुष्याचा वीट आला होता अगदीं ! जगांतला पहिला निराशावादी मनुष्य एखाद्या भोजनालयाचा मेंबर असावा या तर्कापासून तों संसाराच्या निःसारतेचे धडे गिरविण्या-साठीं मठापेक्षां खानावळीच अधिक उपयुक्त होत, या सिद्धांता-पर्यंत अनेक प्रकारच्या विचारसरणींना ढेकरे खानावळीनं जन्म दिला होता ! ‘ पोट दुखवील पण विनोद नव्हे, अपरिवर्तनीय पण सनातन धर्म नव्हे, रंग नाहीं पण पाणी नव्हे ’ अशा प्रकारचे उखा-णेहि याच भोजनालयाच्या परिसरांत रचले गेले होते.

कच्च्या कांठाच्या पोळ्या, तांबड्या भोपळ्याची भाजी आणि वेचव, पातळ ताक असं त्या उखाण्याचं उत्तर ऐकतांना तिऱ्हाइत मनुष्याला गंमत वाटली, तरी ढेकरे खानावळीच्या आश्रिताला त्यांतच आपल्या जीवनाची सारी कटुता सामावल्याच्या जाणिवेनं परमावधीचं दुःख होई !

कांहीं दिवसांपूर्वी प्रकाशित झालेल्या माझ्या एका गोष्टींत खाना-वळीचं वर्णन करतांना मी लिहिलं होतं, “ अन्न हें ब्रह्म आहे या

श्रद्धामय कल्पनेपासून तों अन्न हा ब्रह्मघोटाळा आहे, या पाखंडी मतापर्यंत त्यांच्यांत वैचारिक क्रांति घडून आली होती...महिनाभर उपाशी राहून त्याबद्दल खानावळीच्या मालकाला प्रत्येक पहिल्या तारखेला तीस रुपये बिल देतांना ' उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ' ही कव्युक्ति अगदीं निराळ्याच अर्थानं सार्थ वाटूं लागे ! "

त्या उपरोधांत कल्पनेपेक्षां अनुभवाचाच भाग अधिक होता ! परिवर्तन हा सृष्टीचा आत्मा आहे म्हणतात. पण निसर्गांतले उत्पात अन् समाजांतील क्रांति यांची ढेकरे खानावळीच्या व्यवस्थेवर काडी-इतकीहि प्रतिक्रिया होण्याचा संभव नव्हता. तीस वर्षांपूर्वी खानावळ स्थापन झाली तेव्हां तिथल्या आमटींत डाळ आणि विड्यांची थोटकं यांचं जें प्रमाण असेल, तेंच आजतागायत कायम होतं ! वर्षानुवर्षे अन्नाचे तेच प्रकार, तीच चव, तेच आंबट करपट ढेकर !

दहाबारा वर्षांपूर्वी मला हैदराबादच्या त्या खानावळींत आलेला अनुभव सामान्यतः कोणत्याहि खानावळीच्या मेंबरांना येणाऱ्या अनुभवापेक्षां निराळा असेलसं मला वाटत नाहीं.

साधंसुधंच अन्न का होईना, पण त्यांत रुचिपालट करण्याचं धोरण ठेवल्यानं त्याला एक निराळीच लज्जत येते ही गोष्ट बहुतेक खानावळवाल्यांच्या लक्षांतहि येत नाहीं.

अन्नाच्याच बाबतींत नव्हे तर जीवनाच्या इतर अंगांच्या बाबतींतहि रुचिपालटाचं हें धोरण मनुष्यानं सांभाळलं, तर त्याच्या जीवनाला केवढं तरी अपूर्व माधुर्य येईल !

माझ्या खोलींत तसं पाहिलं तर कांहीं फारसं फर्निचर नाहीं. पण दर दोन तीन महिन्यांनीं त्याच्या मांडणींत बदल केल्यांवाचून चैनच पडत नाहीं मला. भिंतीवरील फोटो, फुलदाणींतलीं फुलं, फार काय, कपाटांतल्या पुस्तकांची रचनासुद्धां दर तीन चार महिन्यांनीं बदलण्याचा माझा शिरस्ता आहे ! नाविन्य अन् वैचित्र्य यांकडे असलेली मनुष्यमात्राची उपजत ओढ असला बदल केल्यानंच तृप्त होऊं

शकेल असं मला खात्रीपूर्वक वाटतं! 'कौशल्य मोठें रचनेंत आहे' हें सत्काव्याचं कुणीतरी करून ठेवलेलं वर्णन जीवनाच्या विविध क्षेत्रांतहि तितक्याच अन्वर्थकतेनं लागू पडतं.

शब्द तेच, पण त्यांच्या नवनव्या रचनाप्रकारांतून विविध अनुभूतींचा साक्षात्कार घडविणाऱ्या कवीप्रमाणं किंवा त्याच त्या रंगांच्या भिन्न भिन्न मिश्रणांतून नाना प्रकारच्या सौंदर्यांचा प्रत्यय आणून देणाऱ्या कुशल चित्रकाराप्रमाणं मनुष्याला हातांशीं असलेल्या सामुग्रींतूनच नित्य नवी प्रचीति घेतां आली पाहिजे!

जात्याच सुंदर असलेल्या सिंधी ललना केशकलापांच्या नित्य नव्या रचना शोधून काढून त्याविषयींच्या आकर्षणांतली उत्कटता कायम राखण्याचा यत्न करतात हें अनेकांनीं पाहिलें असेलच.

मास्टर कृष्णरावांच्या लोकप्रियतेबद्दलहि असंच म्हणतां येईल. आवाज बसका असूनहि त्यांनीं त्यास अनुकूल अशीच गायकी निर्माण केली हें तर खरंच; पण स्वतःच्या त्या विशिष्ट ढंगाला त्यांनीं कल्पकतेची अशी कांहीं जोड दिली, कीं त्यामुळं त्यांच्या गळ्यांतलं वैगुण्य तर उघडं पडलं नाहींच; उलट हजारों रसिक श्रोत्यांकडून त्यांनीं वाहवा मिळविली! मास्टर कृष्णाचं गाणं म्हणजे बुद्धीला चाकित करणारं, संगीत कलेंतल्या नवनव्या वैशिष्ट्यांचा प्रत्यय आणून देणारं गाणं, असं मनाशीं समीकरण मांडीतच श्रोते त्यांच्या बैठकीला हजर रहात असतात अन् मास्तरहि त्याच रसील्या वृत्तीनं कल्पकतापूर्ण कसब प्रकट करून आपल्या असंख्य चाहत्यांची अपेक्षापूर्ति करीत असतात! 'राधिका चतुर बोले' हें त्यांनींच एका बोलपटासाठीं बसाविलेलं भावगीत मी कितीतरी वेळां प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून ऐकलं आहे आणि प्रत्येक वेळीं नवं श्रवणसुख श्रुतिसंपुटांत साठाविलं आहे. खानदानी चिजा, गंधर्वांच्या जमान्यांतलीं रंगभूमीवरलीं पदं, गौळणी, भजनं अगर आधुनिक पद्धतीचं उडत्या चालीवरलं सिनेमासंगीत यांपैकीं कांहींहि ते गावोत; प्रत्येक वेळीं

निराळा ढंग, निरनिराळ्या हरकती, निरनिराळे आलाप घेऊन ते आपल्या बैठकीला रंगत आणतील. गायनकलेंतलं त्याचं हें अपूर्व वैशिष्ट्य लक्षांत घेतलं म्हणजे मला विविध प्रकारच्या लीलांनीं भरलेल्या कृष्णावताराचीच आठवण होते. राधेची वाट अडवण्यापासून तों अर्जुनाला मार्गदर्शन करण्यापर्यंत आणि यमुनेंत उतरलेल्या गोपींचीं वस्त्रं कदंबावर ठेवण्यापासून तों कौरवसभेंत द्रौपदीला वस्त्रं पुरविण्या-पर्यंत नाना प्रकारच्या नाट्यमय कृतींनीं भरलेलं कृष्णचरित अन् नाविन्यानं नटलेलं, कल्पकलेनं बहरलेलं नि चैतन्यानं रसरसलेलं मास्टर कृष्णांचं संगीत यांच्यांत पुष्कळच साम्य नाहीं का ?

जलाशयांत पोहतांना त्याच त्या पद्धतीनं पाणी तोडण्यापेक्षां त्यांत बदल केला तर जलतरणापासून अवीट आनंदाची प्राप्ति होऊं शकते, हा पट्टीच्या पोहणाऱ्यांचा नेहमींचाच अनुभव आहे. प्राचीन काळचे वीर नुसतेच शत्रूवर बाण टाकीत नसत. शरसंधानांतहि नवनव्या तंत्राचा वापर करून ते समरप्रसंगाची भीषणता घालवून देत असत अन् त्याला एक प्रकारचं क्रीडेचं स्वरूप देऊन युयुत्सु वृत्तीला आवश्यक तो उत्साह उत्पन्न करीत.

निसर्गाला तर असल्या रुचिपालटाचं वेडच आहे असं म्हटलं तरी चालेल. सृष्टीचीं वेगवेगळीं रूपं पाहतांना माझ्या मनांत कधीं कधीं अशी कल्पना येते, वसुंधरा ही अत्यंत कुशल नटी असून प्राचीन नाट्यशास्त्रांत वर्णिलेल्या आठहि प्रकारच्या नायिकेच्या भूमिका वठाविण्यांत ही सदैव गढलेली असते !

आपली कोमल काया पुष्पाभरणांनीं नटवून सजवून वल्लभाच्या शयनागारांत प्रवेश करणाऱ्या वासकसज्जेची संगमोत्सुकता, पति-विरहानं उदास बनून अश्रुमोचन करणाऱ्या विरहोत्कंठितेची व्याकुळता, सवतीमत्सरानं जळफळणाऱ्या कलहांतरितेचा संताप, लाजलज्जा सोडून देऊन कांताकडे धांवत जाणाऱ्या अभिसारिकेची मदनविव्हळता

७५९५३

इत्यादि भिन्नभिन्न भावदर्शनामुळंच सृष्टिसुंदरीची सुषमा अधिक खुलून दिसत नाहीं का ?

रुचिवैचित्र्याचं हें धोरण मनुष्याला कितीतरी गोष्टींच्या बाबतींत अंगिकारतां येईल. दररोजचा पोषाख, पत्रव्यवहारासाठीं वापरावयाचा कागद, पत्रांचा मायना, बैठे अगर मैदानी खेळ अशा अनेक लहान सहान बाबतींत अधून मधून बदल करीत गेल्यास आपणाला आपलं जीवन सुसह्य, आल्हादकारक बनवितां येईल.

माझ्या पुस्तकांच्या कपाटांत, मानवी मनाच्या व्यापाराचं रहस्य उलगडून दाखविणाऱ्या चेकाव्हला मी स्थान दिलं आहे, तसं बाह्य सौंदर्यावर भिस्त ठेवून लेखन करणाऱ्या ऑस्कर वाईल्डचंहि स्वागत केलं आहे. मनुष्याच्या अंतरंगांत प्रवेश करून त्याचा थांगपत्ता लावूं पाहणाऱ्या टॉलस्टॉय, डॉस्टव्हस्की, गॉर्की, मोंपासा इत्यादींच्या कथाकादंबऱ्या आहेत; तशाच मानवी जीवितांतील दृश्य, स्थूल घटनांवर भर देऊन चमत्कृति उत्पन्न करणाऱ्या ओ. हेन्रीसारख्या लघुकथा-लेखकाचीं पुस्तकंहि तुम्हांला तिथं आढळून येतील. कथावस्तूंत नाट्यमयतेला प्राधान्य देणाऱ्या हॉल केनच्या कादंबऱ्यांचीं मी ज्या अधीरतेनं पारायणं करतों, त्याच उत्सुकतेनं स्वाभाविक गतिमानतेमुळें सहजसुंदर झालेल्या पर्ल बकच्या ग्रामीण जीवनावरच्या कादंबऱ्या वाचून काढतों !

दैनंदिन आयुष्यक्रमांतल्या बारीक सारीक गोष्टींचा निर्देश करून त्यांतून हळूंच एखादं सुंदर तत्त्व सूचित करणाऱ्या गार्डिनरच्या लेखणींतला खेळकरपणा आणि तत्त्वजिज्ञासू वृत्तीला शोभेलसा रास्किनचा गंभीरपणा, रॉबर्ट लिंडच्या शैलींतला अल्लडपणा नि जेन ऑस्टिनच्या कथनपद्धतींतला मुग्धपणा इत्यादि भिन्न भिन्न आवडीनिवडीच्या साहित्यिकांच्या सहवासांत अनुभूतीचीं नवीं नवीं विश्वं पहातांना कुणाचं मन प्रसन्न रहाणार नाहीं ?

ज्ञानेश्वरीसारख्या नितांत रसाळ, अध्यात्मपर काव्यग्रंथापासून तों खांडेकरांच्या लघुकथांपर्यंत मराठी भाषेंतील नैकविध वाङ्मय-प्रकारांनींहि रुचिवैचित्र्याची अशीच अवीट गोडी माझ्या प्रत्ययास आणून दिली आहे !

मानवी जीवित हें एक मोठं खंडकाव्य आहे अशी कल्पना केली तर त्याची रचना निरनिराळ्या चालींवर अगर वृत्तांत व्हावी हेंच इष्ट नाहीं का ? नाहींतर मारवाडणींच्या गाण्यासारखी एकच एक सुरावट, त्यांत कुठं चढ नाहीं कीं उतार नाहीं, धृपद नाहीं, अंतरा नाहीं, कांहीं नाहीं ! असल्या वैचित्र्यहीन गाण्याचा मनाला उबग आला तर कोणतं नवल ?

तांबड्या भोपळ्याबरोबरच सुरण, दुधी अन् घोसाळीं यांचीहि आलटून पालटून आमच्या ढेकरे भोजनालयाच्या मालकानं भाजी केली असती, तर त्याची खानावळ डबघाईला आली असती असं नाहीं. उलट तेवढ्याच खर्चांत मेंबरांचा संतोष राखल्याचं श्रेयहि त्याला संपादन करतां आलं असतं.

पण मेंबरांऐवजीं शहरांतल्या खाजगी डॉक्टरांचा दुवा घेण्यांत खानावळवाल्यांना समाधान वाटत असेल तर ?

—प्रसिद्धि, ‘ सुषमा ’ दिवाळी अंक १९५०

१४००० २८।१।५३

# अविचार : : : २

परवां आमच्या चाळींतली एक तरुणी घासलेट आणायला म्हणून गेली अन् परत येतांना घासलेटच्या बाटलीबरोबरच एका तरुणाचं हृदयहि घेऊन आली ! शिंपी, कवि आणि प्रेमिक यांच्याइतके परिवर्तनवादी महात्मे दुसरे कोणी नसतील या जगांत ! बारावंदीपासून बुशकोटापर्यंत कपड्यांच्या तऱ्हा शोधून काढणारा शिंपी, ' शिवा'—पासून ' शिवी ' पर्यंत काव्याच्या अधिष्ठानांत फेरबदल करणारे कविराज आणि पुष्पवाटिकेपासून घासलेटच्या रांगेपर्यंत प्रीतीच्या संकेतस्थळांत क्रांति घडवून आणणारे प्रेमीजन यांना खरेखुरे परिवर्तनवादी समजूं नये तर काय ?

बाकी प्रेमापेक्षां प्रेमभंगाशींच रॉकेलचा संबंध आहे अशी आजवर माझी कल्पना होती. प्रेमभंगानं निराश झालेल्या दुर्दैवी जिवांनीं अंगावर घासलेट ओतून घेऊन आत्महत्या केल्याच्या बातम्या वाचतांना हाच सिद्धांत सुचण्यासारखा नव्हता का ? पण मघाशीं सांगितलेल्या त्या घटनेनं माझ्या या सिद्धान्ताला चांगलाच धक्का दिला. शृंगारिक वाङ्मयाला ' घासलेटी वाङ्मय ' म्हणून संबोधणाऱ्या टीकाकाराच्या अभिप्रायांतलं खरंखुरं मर्म त्या वेळीं माझ्या लक्षांत आलं.

आमच्या चाळींतल्या बिऱ्हाडकरूंना मात्र या प्रकरणामुळं धक्का बसला तो निरनिराळ्याच कारणानं ! पूर्वीची कांहींहि ओळखदेख

नसतां अवघ्या अर्ध्या पाऊण तासाच्या सहवासाचं प्रीतींत अन् पुढं एक दोन दिवसांतच त्या प्रीतीचं विवाहांत रूपांतर व्हावं, म्हणजे केवढी साहसाची गोष्ट ! आणि साहस म्हटलं कीं, त्याचें श्रीपेक्षां इतिश्रीशींच अधिक निकटचं नातं आहे असं एकूण एक बिऱ्हाडकरूंचं मत पडलं ! चार दिवसांतच त्या प्रीति–विवाहाचा बोजवारा उडाल्याशिवाय राहाणार नाहीं असं जो तो ठामपणें भविष्य वर्तवूं लागला.

पहिल्या दृष्टिक्षेपांत प्रेमोद्भव झाल्याची ग्वाही देणाऱ्या अनेक नाटक-कादंबऱ्यांचीं नांवं मी सदरहू विरोधकांच्या तोंडावर फेकून पाहिलीं. पण त्यांपैकीं एकहि नाटक अगर कादंबरी मनूनं लिहिली नसल्याची खातरजमा करून घेऊन साऱ्यांनीं माझं म्हणणं धुडकावून लावलं.

तें कांहींहि असो. घटकेच्या सहवासानं जन्माचा सहचर निवडणाऱ्या त्या तरुणीच्या कृत्यांत मला तरी कांहीं गैर दिसलं नाहीं.

माझ्या ओळखीचे एक सुखवस्तु गृहस्थ आहेत. गेलीं पांच वर्षें ते आपल्या उपवर मुलीसाठीं स्थळ शोधीत आहेत. जें ठिकाण त्यांना दाखवावं तें या नाहीं त्या कारणानं ते नापसंत करीत असतात. कुठं रूप, कुठं प्रकृति, कुठं सांपत्तिक स्थिति, तर कुठं घराणं मनास न आल्यामुळं त्यांनीं आजपर्यंत सोयरिकीचा योग जमून येऊं दिला नाहीं. एकदां तर भावी व्याही केसरीचा वर्गणीदार नाहीं या सबबीवरच त्यांनीं त्या घरीं आपली मुलगी द्यायला नकार दिला म्हणतात ! वडिलांच्या या फाजील चिकित्सेपायीं आणखी कांहीं वर्षें अशींच गेल्यावर लग्नाचा योग जुळून आलाच तर आपणाला आपल्या पतिराजाला पहिला वहिला तांबूल खलबत्त्यांतच कुटून द्यावा लागेल अशी त्या बिचाऱ्या उपवर कन्येच्या मनांत कल्पना आल्यावांचून राहात नसेल !

या बाबतींत प्राचीन काळांतील स्वयंवराची चाल मला मोठी हृद्य वाटते. स्वयंवरासाठीं जमा झालेल्या देशोदेशींच्या राजपुत्रांपैकीं ज्याची मूर्ति डोळ्यांत भरे किंवा जो एखादा पण जिंकी, त्याला वरणाऱ्या

राजकन्या मूर्ख होत्या असं कोण म्हणूं शकेल ! मनांत ठसलेल्या राजाच्या गळ्यांत स्वयंवराची माळ घालतांना त्याच्या राज्याच्या क्षेत्र-फळाचा अन् वार्षिक वसुलाचा विचारहि त्यांच्या मनाला कधीं शिवला नसेल; पण म्हणून त्यांच्यावर पश्चात्तापाची पाळी आली असं कुणाला म्हणतां येईल का ?

जगन्नाथराय पंडित किंवा पहिला बाजीराव यांना तर आपल्या प्रितीच्या मार्गावर पसरलेल्या काट्यांची अगाऊ कल्पना आली असू-नहि त्यांनीं यावनी कन्येच्या प्रणयार्त हांकेला हुंकार दिला ! धर्म्या-धर्म्यविवेकांतच त्यांनीं कालापव्यय केला असता, तर प्रेमसाफल्याचा अपूर्व क्षण त्यांच्या आयुष्यांत कधीं उगवला असता का ?

मानवी जीवनांत कांहीं कांहीं वेळां प्रसंगच असे येतात कीं, त्या वेळीं विवेकापेक्षां साहसच अधिक उपयोगी पडावं. अतिविचार हा मनुष्याला पुष्कळदां शाप ठरतो हें अनेक उदाहरणांनीं सिद्ध करतां येण्यासारखं आहे. हें करूं का तें करूं या प्रश्नानं शंकित झालेल्या हॅम्लेटच्या जीवनाची परिणति कशांत झाली ? द्रौपदीसारख्या साध्वी पत्नीची क्रूर विटंबना चालूं असतां, अविचलित वृत्तीनं सत्य-अहिं-सेची, शमदमाची चर्चा करणाऱ्या धर्मराजाची त्याच्याच बंधूंनीं कोणत्या शब्दांत संभावना केली ?

मनुष्याला निष्क्रीय करून सोडणाऱ्या असल्या विवेकाचीं उदा-हरणं पाहिलीं कीं वाटतं,परिणामीं क्वचित् घातकी पण क्रियाशील साह-सच त्याच्या जीविताला अधिक उपकारक, अधिक शोभादायक ठरतं! मग तें राजकारणाचं क्षेत्र असो, साहित्याचं असो, नाहींतर आणखी कशाचंहि असो !

प्रौढपणींहि शैशवाची जपणूक करायची मनीषा बाळगणाऱ्या कवीला बाळपणांतल्या साहसपूर्ण अविवेकाचंच सर्वांत अधिक आक-र्षण जडलं नसावं का ? या अविचारामुळं मनुष्य लहानपणीं किती विलोभनीय सुखांचा आस्वाद घेऊं शकतो हें सांगायला का हवं ?

वयाच्या दहाव्या अकराव्या वर्षीं गांवाबाहेरील चिंचेच्या झाडाच्या अगर्दी शेंड्यावरला कोंवळा चिघोर खुडतांना कोण विजयोन्माद चढत असे आम्हां बालवीरांना ! नेणतेपणांतल्या या पराक्रमाचा ' आंबट शोक ' म्हणून उपहास करणारा माझ्यांतला आजचा प्रौढ टीकाकार द्राक्षांना नांवबोट ठेवणाऱ्या इसापनीतींतल्या ' टीकाकार महाशया-पेक्षां ' कांहीं निराळा वाटत नाहीं मला !

श्रावणांत गरगरा डोळे फिरतील इतक्या उंचीपर्यंत झाडाला टांगलेला झोका चढवितांना मला डॉक्टरच्या बिलाचा विचार करण्याची चुकूनहि गरज वाटत नसे ! होळीच्या दिवसांत तानाजीच्या आवेशानं सरसर भिंती चढून जाऊन खाष्ट श्रीमंतांच्या जुन्या वाड्यांतलें खोकें अन् गोंवऱ्या पळवितांना नीतिशास्त्रानेंहि माझ्या हूडपणाला कधीं पायबंद घातलेला मला आठवत नाहीं.

तेंच कायदेशास्त्र, नीतिमत्ता, लोकापवाद इत्यादींच्या तणाव्यांनीं जखडून टाकलेलं माझं अन् माझ्याप्रमाणंच अवतींभोंवतींच्या शेंकडों स्त्रीपुरुषांचं आजचं निःचेष्ट, निष्क्रीय जीवन पाहिलं कीं कुठंतरी वाचलेला एक गमतीचा चुटका मला आठवतो.

रस्त्यांत विचारमग्न स्थितींत उभ्या असलेल्या एका मारवाड्याला दुसऱ्या एकानं विचारलं, " काय शेटजी, रस्त्यांतच कां उभे आहांत असे ?" तेव्हां त्यानं उत्तर दिलं, " उभा राहूं नको तर काय करूं ? धोतर अन् वहाणा आजच वापरायला काढल्या आहेत मी. दूर दूर पावलं टाकावीं तर धोतर काचतंय् अन् जवळ जवळ टाकावीं तर वाहणा झिजतात ! "

ज्या त्या बाबतींत साधक बाधक विचार करून पाऊल टाकण्याचं प्रतिज्ञाकंकण बांधणारीं आपण विचारी माणसं या चुटक्यांतल्या दूरदर्शी आत्म्यापेक्षां कोणत्या बाबतींत निराळीं आहोंत ?

भारतभूमीच्या विच्छेदनाची मागणी करणाऱ्याचा तीव्र शब्दांत धिक्कार करण्याऐवजीं त्याच्या आकांक्षेचं समर्थन करूं पाहणारं

निःसत्त्व राजकारण कायदेशास्त्राच्या अन् भूतदयावादाच्या अतिरिक्त मंथनांतूनच बाहेर आलं नाहीं का ?

गेल्या शेसव्वाशें वर्षांत हिंदुस्थानला पारतंत्र्याच्या मगरमिठींतून सोडविण्यासाठीं ज्या ज्या देशभक्तांनीं षड्यंत्रें रचलीं, स्वतःला फांसावर लटकावून घेतलं, त्यांना 'अविचारी' हें विशेषण बहाल करतांना आपण त्या शब्दाचीच प्रतिष्ठा वाढवीत आहोंत हें बिचाऱ्या ' शब्द-प्रभूंच्या ' ध्यानींमनींहि आलं नसेल !

चक्रव्यूहांत शिरून पराक्रमाची शर्थ करणारा अभिमन्युबाळ, तुफान सेनासागरांत तटावरून घोडा फेकणारी राणी लक्ष्मीबाई किंवा पहारेकऱ्यांची दृष्टि चुकवून भूमध्यसमुद्रांत उडी घेणारे स्वातंत्र्यवीर सावरकर या साऱ्या कर्मवीरांच्या साहसाला जन्म देणारा अविचार केवढा दिव्य, केवढा असाधारण समजायचा !

अशाच दिव्य अविचाराला प्रवृत्त झालेला गडकऱ्यांच्या काव्य-सृष्टींतला तो वृक्ष माहीत असेलच तुम्हांला. निष्प्रेम जीवनाचा उबग आलेल्या त्या वृक्षाचं एकदां तळपत्या विजेकडे लक्ष गेलं अन् तिच्या आलिंगनासाठीं त्यानं उत्सुकता दर्शविली. आपल्या या वांछिताचा परिणाम त्याला दिसत नव्हता असं नव्हे; पण प्रेमाच्या एका क्षणासाठीं मरणाचे वर्षाव झेलायची त्याची तयारी होती ! त्याच्या इच्छेप्रमाणंच घडून आलं. आकाशांतून कडकड करीत विद्युल्लता त्याच्या भेटी-साठीं आली. तिच्या दाहक स्पर्शानं त्याचा प्रचंड देह कोसळून भूपृष्ठावर पडला; पण इच्छापूर्तीच्या जाणिवेनं अंतकाळींहि त्याच्या महत्त्वाकांक्षी मनाला आनंदाचं भरतं आलं !

पण अल्प परिचयांत एका तरुणाला हृदयसर्वस्व अर्पण करणाऱ्या तरुणीबद्दल जिथं निषेधाचे ठराव पास होतात, तिथं असल्या अद्भुत, अचाट प्रेमसाफल्याची कथा कोण ऐकून घेणार ?

—प्रसिद्धि, ' महाराष्ट्र ' दिवाळी अंक १९५०

# थोर तुझे उपकार, बापा ! : : ३

तरुणीला पळवून नेल्याच्या बातमींत सौभद्राचा शृंगार, रामायणाचं कारुण्य, वत्सलाहरणाची अद्‌भुतता किंवा 'यावनी अपहरणांतला' रौद्र यांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी अनुभूतीचा साक्षात्कार मनुष्याला घडत असतो !

पण आमच्या रेशनिंग ऑफिसांतल्या कुप्पा स्वामीनं एका पारशी युवतीला पळवून नेल्याची बातमी कानावर आली तेव्हां शृंगार-करुणादि रसापेक्षां हास्यरसाचाच आम्हांला अधिक लाभ झाला !

टाईपरायटरवर हात टाकावा इतक्या सहजतेनं एका गौरकाय कुमारिकेच्या खांद्यावर हात ठेवून त्या मद्राशानं कुणाला न कळत पोबारा करावा म्हणजे काय ?

रात्रंदिवस हिशेबाच्या आंकड्यांत डोकं खुपसून बसणाऱ्या या प्राण्यांत प्रेयसीच्या डोक्यांत आकडे खोवण्याइतकी काव्यात्मता एकाएकीं कुठून उपटली ? चुगली करण्यासाठीं साहेबाच्या कानाशीं लागणारा हा कलिपुरुष प्रीतीच्या कानगोष्टी करण्याइतका कविपुरुष कसा बनला ? चिंचेच्या साराचे भुरके मारून ज्यानं केवळ वाच्यार्थानं आजवर आपला आंबट शोक प्रगट केला होता, त्याला तो लक्षणेनं सिद्ध करून दाखविण्याची कुठून बुद्धि झाली हेंच आम्हाला कळेना !

पण अशा प्रकारें त्या मद्राशाचा उपहास करण्यांत माझं काय किंवा आमच्या ऑफिसांतील इतर कारकुनांचं काय, मनुष्यस्वभावाविषयीं संपूर्ण अज्ञान प्रकट झालं होतं अशीच दिवसेंदिवस माझी खात्री होत चाललीय् !

मानवी मनाची घडण कोमलकठीण, सुष्टदुष्ट, सात्त्विकराजस अशा अनेक परस्परविरोधी भावनांनीं घडलेली असते, याची आम्हांला पुसटहि शंका येत नाहीं; उलट तें कोणत्या तरी एकाच प्रवृत्तीच्या रंगांत बुचकळून काढलेलं असतं अशीच आम्ही मनाशीं समजूत करून घेतों आणि या चुकीच्या दृष्टिकोनांतून त्याच्या प्रत्येक हालचालीचा, प्रत्येक व्यापाराचा अन्वयार्थ लावण्याचा हास्यास्पद प्रयत्न करीत असतों ! आणि ही चूक फक्त सामान्य माणसांच्याच हातून घडते असं नाहीं; तर मोठमोठे कादंबरीकार, इतिहासकार, चरित्रकार, न्यायाधीश, टीकाकार, शिक्षक अशा निरनिराळ्या व्यवसायक्षेत्रांत काम करणाऱ्यांचाहि मनुष्यस्वभावाविषयीं असाच विपरीत ग्रह झालेला असतो अन् मग त्यांनीं विकृत दृष्टिकोनांतून सत्य वा कल्पनासृष्टींतील व्यक्तीसंबंधीं दिलेला निर्णय अगर काढलेले निष्कर्ष पाहिले म्हणजे मानवी मनाच्या अगाधपणाविषयीं प्राचीन ऋषिमुनींनीं अन् कविजनांनीं काढलेले उद्गार स्वाभाविकतेचे निदर्शक वाटूं लागतात.

शिक्षक या नात्यानं गेलीं सात वर्षं माझा विद्यार्थ्यांशीं संबंध आला आहे. पण त्यांच्या सहवासांत अर्ध्या तपाच्या वर आयुष्य घालवूनहि त्यांच्या मनोदधीचा थांग लागला असं कांहीं मी छातीवर हात ठेवून सांगूं शकत नाहीं ! त्यांच्या मनोव्यापाराचं जों जों सूक्ष्म निरीक्षण करावं, तों तों त्यांचं स्वरूप अगम्य, अज्ञात असल्याचंच माझं मन ग्वाही देऊं लागतं ! तसं पाहिलं तर अध्यापनाच्या मार्गांतलं हें वैगुण्य लक्षांत घेऊनच हल्लीं शिक्षकांना बालमानसशास्त्राचा अभ्यास करणं आवश्यक असल्याचं प्रतिपादण्यांत येऊं लागलं !

पण लहानशा दिवटीच्या सहाय्यानं एखाद्या भव्य प्रासादांतला अंधार उजळण्याचा यत्न करावा तशांतलाच मला हा प्रकार वाटतो.

शाळेच्या आवारांत धूम्रपान केल्याबद्दल एका लक्ष्मीपुत्राविषयीं प्रमुखाध्यापकाकडे तक्रार करून मी त्याचं नांव हजेरीपटावरून कमी केलं होतं. सदरहू शोकीन शिष्यरत्नाच्या हातांत शाळा सोडल्याचा दाखला देतांना मी उपरोधिक स्वरांत म्हटलं होतं, "बाकी, आपल्या सिगारेटच्या धुराचे ढग पाहून सरस्वती नाहीं तरी तिचा मोर मात्र आनंदानं थयथय नाचूं लागेल हं !"

पुढें तीन वर्षांनीं मला समजलं, पाकिस्तानांत पळवून नेण्यांत आलेल्या हिंदु स्त्रियांची सोडवणूक करतांना कांहीं मुसलमान गुंडांनीं त्याचा बळी घेतला !

धूम्रपानाचा षोक करणाऱ्या या विद्यार्थ्यांतच आत्मशुद्धीसाठीं त्यागाचीं अग्निकाष्ठं सेवन करायला लागणारं तपःसामर्थ्यहि दडलेलं असेल याची, त्याला शाळा सोडल्याचा दाखला देतांना कल्पना तरी होती का मला ? याच्या उलट, प्रत्येक परीक्षेंत पहिला क्रमांक पटकाविणाऱ्या एका बुद्धिमान्, निर्व्यसनी विद्यार्थ्याच्या मनोवृत्तीचा एका प्रसंगीं मला जो मासलेवाईक नमुना पहायला सांपडला तो उभ्या जन्मांतहि मी विसरणार नाहीं !

शिक्षण संपल्यावर, चांगली मोठ्या पगाराची सरकारी नोकरी त्याला मिळाली असल्याचं मीं ऐकलं होतं. एके दिवशीं त्याच्या आग्रहावरून मी त्याच्याकडे चहासाठीं गेलों होतों. बैठकीलगतच्याच खोलींत त्याची धाकटी बहीण ‘ सागरा प्राण तळमळला ’ ही कविता गाण्यांत अगदीं गढून गेली होती. तोंच हे बंधुराज तिच्यावर खेकसून म्हणाले, “ एऽऽ पुरें कर तें ! बाहेर आमचे सर आले आहेत. त्यांना फक्कडसं भावगीत म्हणून दाखव पाहूं ! कोणतं म्हणशील ? ‘ मैत्रिणींनो, सांगूं नका...’ हें म्हण. नाहींतर तें हें —‘ माझ्या मामाच्या घरीं...’ ”

मी सर्दच झालों ! समोरच्याच कोचावर रेलून कोणत्याशा इंग्रजी कादंबरीशीं चाळा करणाऱ्या त्या विद्यार्थ्याकडे पुनःपुनः दृष्टिक्षेप टाकीत मी आपल्या मनाला विचारीत होतों, एके काळीं आदर्श विद्यार्थी म्हणून आपण कौतुक करीत होतों ती हीच का मूर्ति ? ' सागरा प्राण तळमळला ' या सावरकरांच्या कवितेवर विचारलेल्या प्रश्नांचीं बरोबर उत्तरं देऊन यानंच सर्वांत अधिक गुण मिळविले असतील अन् आज हीच स्वारी त्या कवितेविषयीं तुच्छतेचा उद्गार काढण्याचं धाष्टर्य करते ! मातृभूमीच्या भेटीसाठीं अधीर झालेल्या, तिच्या दर्शनासाठीं तळमळणाऱ्या एका विदेशीं गेलेल्या तरुणाच्या मनःस्थितीचं जें हृदयस्पर्शी चित्र स्वानुभवाच्या रंगानं सावरकरांनीं रेखाटलं आहे त्याचं या बुद्धिमान् विद्यार्थ्याकडून केलं जाणारं हेंच का रसग्रहण ?

शाळेंत असतांना त्याची मीं अनेक वेळां पाठ थोपटली असली तरी मला त्याचं अंतःकरण चाचपडून पाहतां आलं नाहीं हेंच खरं !

बुद्धि कुशाग्र असली म्हणजे मनांत कुसळं नसतात असा थोडाच नियम आहे ?

फूल हुंगणाऱ्या मोंगल बादशहांच्या तसबिरी पाहिल्या कीं तीं चित्रं रेखाटणाऱ्या चित्रकारांचं मला पूर्वीं हसूं येई ! प्रेतांच्या राशी रचणाऱ्या असल्या क्रूर सुलतानांच्या हातीं मांसाचा लचका दिला असता तर त्यांच्या चित्रणांत वास्तवता आली असती असं मी मनाशीं म्हणे.

पण आपल्या मुलाला स्वतःचं उर्वरित आयुष्य देऊं पाहाणारा बाबर, भावांना राज्य वाटून देणारा हुमायून, कुराणाच्या प्रती लिहून त्यांच्या विक्रीवर उदरनिर्वाह करणारा औरंगजेब, लाडक्या पत्नीच्या मृतदेहावर कलापूर्ण संगमरवरी स्मारक उभारणारा शहाजहान या साऱ्या मोंगल सम्राटांच्या अंतःकरणांच्या कोपऱ्यांत मानवतेचा अंशहि वास करीत होता ही गोष्ट जसजशी माझ्या ध्यानांत येऊं

लागली, तसतशी त्यांची भडक वर्णनं करणाऱ्या इतिहासकारांपक्षां तसबिरी रंगविणारे चित्रकारच मला अधिक वास्तववादी वाटूं लागले!

नारायणराव पेशव्याच्या वधास कारणीभूत असलेली आनंदीबाई पाताळयंत्री खरी; पण तिच्या ठिकाणीं कांहीं स्वर्गीय गुणांचाहि अधिवास असल्याचे पुरावे हल्लीं उजेडांत आले आहेत. पण आमच्या इतिहासकारांनीं केवळ काळ्याकुट्ट रंगांत आनंदीबाईचं चित्र रंगवून मनुष्यस्वभावाविषयीं केवढं अज्ञान प्रकट केलं आहे!

महात्मा गांधींचं चरित्र लिहितांना कितीशा चरित्रकारांना त्यांच्यांतली मानवता दिसूं शकली? मानवापेक्षां देवत्वाचा आरोप करूनच निरनिराळ्या चरित्रकारांनीं त्यांच्या जीवितकार्याची समालोचना केली नाहीं का? 'सत्याचे प्रयोग' हें महात्माजींनीं लिहिलेलें आत्मचरित्र सोडलं तर बाकीच्या साऱ्या चरित्रकारांनीं त्याचं जीवनचित्र रंगवितांना मनुष्यस्वभावाच्या मर्यादा दुर्लक्षिल्या आहेत!

प्रत्यक्षांत वावरणाऱ्या व्यक्तीबद्दल इतका गैरसमज, तर मग कल्पनासृष्टींत विहार करणाऱ्या पात्रांच्या स्वभावरेखनाविषयीं बोलायलाच नको!

हा कोण? नायक का? द्या याला सर्व गुणांचा ठेका! हा कोण? खलनायक? द्या याच्या छातींत लांडग्याच्या काळजाचा तुकडा बसवून! ही कोण? पतिता? करा हिनं समाजाला रसातळाला नेल्याचं सत्य शाबीत!

सारांश, एकेका व्यक्तीचं चित्र कोणत्या तरी एकाच रंगांत रंगविणारे आमचे कादंबरीकार किंवा नाटककार पाहिले म्हणजे त्यांच्या अज्ञानाला हंसावं कीं रडावं हेंच मला समजेनासं होतं!

मनुष्यस्वभावाचं सूक्ष्म निरीक्षण करून त्याचं यथामति विश्लेषण करूं पाहणाऱ्या कांहीं पाश्चात्य लेखकांचं उदाहरण या बाबतींत गिरविण्यासारखं आहे. 'Une Vie' या कादंबरींतली नायिका वैषयिकतेला बळी पडून क्षणाक्षणाला अधोगतीच्या गर्तेंत रुतत असते; तरी

तिच्याविषयीं वाचकांना उबग येत नाहीं. उलट तिच्या निरागस, सुस्वभावी व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्यांच्या अंतःकरणावर उठवून तिच्याविषयीं त्यांच्या मनांत सहानुभाव उत्पन्न करण्याचं श्रेय मोंपासा आपल्याकडे घेतो ! शरदबाबूंच्या साहित्यसृष्टींतलीं पात्रंहि याच गुणामुळें जिवंत वाटतात, बोलकीं वाटतात. मदिरा आणि मदालसा यांच्या मगरमिठींत सापडलेल्या देवदासाविषयीं वाचकांच्या मनांत जी सहानुभूति उत्पन्न होते, ती त्याच्या अधःपाताच्या शेवटच्या क्षणापर्यंत तशीच टिकून राहते !

आसक्ति आणि विरक्ति, भोग आणि त्याग, कोमलता आणि कठोरता अशा परस्परविरुद्ध मनःप्रवृत्तींचा एकाच मनांत एकाच वेळीं प्रचंड संघर्ष चालू असतो, हें मानवी मनाविषयींचं रहस्य देवदासाच्या द्वारें सूचित करतांना शरदबाबूंनीं वास्तवतेशीं केवढं इमान राखलं आहे !

मनुष्यस्वभावाची सूक्ष्म पारख असल्याशिवाय इतकी प्रभावी व्यक्तिरेखा निर्माण करतां येणं कोणत्याहि लेखकास अशक्य आहे !

समुद्राच्या पोटांत भिन्नभिन्न दिशेनं वाहणारे प्रवाह आहेत असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. मानवी मनाच्या सागरांतहि अशाच अनंत प्रवृत्तींची उलटसुलट दिशेनं हालचाल चालू असते हें आपण ध्यानांत ठेवायला हवं ! सप्तरंगांच्या मिश्रणापासून एकच पांढरा रंग बनावा, तसं एकापेक्षां अधिक प्रवृत्तींच्या एकरूपतेतून मनाचा उदय झाला आहे !

म्हणूनच एखाद्याच्या गुन्ह्याबद्दल शिक्षा कायम करतांना त्याच्या स्वरूपाऐवजीं अगर परिणामाऐवजीं त्याच्या मागच्या हेतूचा विचार करणं समंजस न्यायाधीशाला आवश्यक वाटत असतं. गुन्ह्याचं स्वरूप वा त्याचा परिणाम एकच असला तरी त्याच्या मागचा हेतु हा आरोपीच्या मनोरचनेस अनुसरून भिन्नभिन्न असूं शकतो ! जगणं अशक्य आहे म्हणून धावत्या गाडीपुढं पडणारा एखादा निराशावादी

अन् परदेशी कापडाच्या लॉरीपुढें पडून स्वतःच्या शरिरांतून रक्ताच्या चिळकांड्या वाहवूं देणारा बाबू गेनू यांच्या कृत्याचं मोजमाप एकाच दृष्टिकोनांतून करणं कितपत योग्य आहे ? साधूंच्या ठिकाणीं मेणाचा मऊपणा नि वज्राचं काठिण्य असतं असं सुचविणाऱ्या तुकोबारायांना मानसशास्त्राची खासच ओळख असली पाहिजे ! Follow not the holy man farther than his threshold ! असा प्रेषिताविषयीं इषारा देणाऱ्या हॉलकेननं तर मनोगाहनाचा साहसपूर्ण पण कौतुकास्पद प्रयत्न केला आहे !

मानवी स्वभावाविषयींचं मनुष्याचं अज्ञान लक्षांत घेऊनच कीं काय, अष्टवक्रा कुब्जेला श्रीहरीच्या वियोगानें रडूं आलं असूनहि तें प्रकट करण्याची इच्छा होत नाहीं. तिला वाटतं, आपणासारख्या काळ्या, कुरूप दासीनं श्रीकृष्णासाठीं रडणंहि जगाच्या दृष्टीनं हास्याचाच विषय होणार आहे ! गडकऱ्यांनीं या प्रसंगावर अतिशय सुंदर काव्य रचलं आहे. त्यांत त्यांनीं कुब्जेच्या तोंडीं पुढील उद्गार घातले आहेत—

‘ सुंदर गोपी योग्य रडाया जगन्मोहना, तुजसाठीं;
परी कुठें मी आणि कुठें तूं लोकसुंदरा जगजेठी !
रडायासही मुक्तकंठ हा देवा रे जीवाचे लाजे
श्रीहरिसाठीं कुब्जा रडते हेंच हंसें होइल माझें !’

राधेसारख्या सुंदर गोपींचीच काय ती विरहव्यथा अनुकंपनीय मानणाऱ्या जगाचं मनुष्यस्वभावाविषयींचं अज्ञान गडकऱ्यांनीं मोठ्या चातुर्यानं कुब्जेकडून वदविलं नाहीं का ?

शरीर वाकडं असलं म्हणून मनांत ऋजुता नसते असं थोडंच आहे ?

आईच्या प्रेमावर डझनावारी कविता लिहिल्या जातील. पण पितृवात्सल्याचं दर्शन घडविणारं लहानसं काव्यहि लिहायचं आमच्या कवींच्या जीवावर येतं ! ‘ थोर तुझे उपकार, बापा —’ अशी उद्यां

एखाद्या कवीनं कवितेची सुरवात करून त्यांत जन्मदात्याची महती वर्णन केली तर मला तरी तें विडंबनाऐवजीं वास्तववादीच काव्य वाटेल !

आईपेक्षांहि वडिलांच्या मायेंत अधिक शीतळाई अनुभवणारे कित्येक स्त्रीपुरुष मला ठाऊक आहेत !

काव्यांत ढसढसा रडणारे कवि प्रत्यक्षांत कसल्याहि दुःखद प्रसंगीं डोळ्यांवाटे टिपूसहि न काढण्याइतके निर्घृण असूं शकतात; उलट ज्यांचा वाङ्मयाशीं जन्मांतहि कधीं संबंध आला नाहीं, अशा बाह्यतः खडकासारख्या रुक्ष दिसणाऱ्या माणसांच्या अंतःकरणांत कोमल भावनांचे अनंत पाझर झिरपत असतात !

मानवी स्वभावाविषयींचीं हीं व अशींच इतर अनेक सत्यं जेव्हां आम्हांला आकलन होतील, तेव्हां एखाद्या मद्राशानं पारशी मुलीला पळवून नेल्याची घटनाच काय, पण श्रीकृष्णानं जांबुवंतीशीं विवाह लावल्याची पुराणांतली कथासुद्धां स्वाभाविक वाटूं लागेल !

—प्रसिद्धि, ‘ वसंत ’ दिवाळी अंक १९५०

## पांच तोंडांचा राक्षस : : ४

आयुष्यांत आपण शंभर नाटकं लिहिणार आहोंत असं माझ्या एका साहित्यिक मित्रानं मजजवळ बोलून दाखविलं, तेव्हां मी मनाशीं हंसून म्हटलं, 'स्वारीचा हा संकल्प ऐकून मराठी रंग-देवतेला तिच्या डोक्यावर वरदहस्ताऐवजीं बर्फाचा खडा ठेवायची इच्छा खचित झाली असेल!'

जीवनाचाच काय, पण व्याकरणांतल्या विभक्तीचासुद्धां प्रत्यय कशाशीं खातात हें ज्याला फारसं ठाऊक नाहीं अशा एका अनभिज्ञ प्राण्याच्या तोंडची शंभर नाटकं लिहायची भाषा स्फूर्तीपेक्षां वाता-च्याच झटक्याची निदर्शक नव्हे का?

आणि मग बर्फाचा खडा डोक्यावर ठेवणं हाच त्यावर उत्तम इलाज नाहीं का? माझ्या त्या मित्राच्या शतकपूर्तीच्या कल्पनेंत शंभर अश्वमेध करणाऱ्या धर्मराजाच्या पुण्याईपेक्षां शंभर पुत्रांना जन्म देणाऱ्या धृतराष्ट्राचं दुर्दैव साठवलं आहे अशी माझी नक्की खात्री आहे!

संख्येऐवजीं गुणावर भर देऊन त्यानं आपल्या वाङ्मयनिर्मितीचं अंदाजपत्रक तयार केलं असतं तर महाराष्ट्र-शारदेला त्याच्याविषयीं केवढा अभिमान वाटला असता! पण मला वाटतं, हल्लींच्या युगा-

चाच हा विशेष आहे ! गुणाऐवजीं संख्येवरूनच एखाद्या गोष्टीचं महत्त्वमापन करायची हल्लीं आपणांला संवय जडली आहे अन् या दृष्टिकोनांतूनच लोकशाहीच्या तत्त्वाचा उदय झाला असं विधान केलं तर तें फारसं चुकीचं ठरणार नाहीं.

राजनीतिविशारदांऐवजीं बहुमताचा कौल घेऊन पास करण्यांत येणारे कायदे किंवा बहुमतानें निवडल्या जाणाऱ्या निवडणुकी पाहिल्या म्हणजे आजच्या युगांतलं हें संख्याबलाचं माहात्म्य अधिकच ठळकपणें जाणवूं लागतं !

दर तीन–चार वर्षांनीं व्याख्यानं, विड्या अन् वचनं यांचा जनतेवर वर्षाव करून म्युनिसिपालिटींत निवडून येणाऱ्या आमच्या गांवच्या कांहीं महाभागांकडे पाहिलं कीं, मला शेक्सपियरच्या एका सुप्रसिद्ध सुभाषिताच्या चालीवर म्हणावंसं वाटतं, ' विनोदा, तुझं नांव लोकशाही ! '

खरंच, बहुसंख्य जनतेच्या मर्जीनुरूप चाललेल्या आजच्या राज्यकारभारांत हास्यरसाची केवढी तरी सामुग्री सांठविली आहे ! देशाच्या उत्कर्षासाठीं माकडं मारण्याचा किंवा रताळ्याचं पीठ खाण्याचा उपदेश करणाऱ्या भारतीय संसदेच्या महान् सभासदापासून तों गजकर्ण खाजविणाऱ्यांवर करमणुकीचा कर बसवूं पाहणाऱ्या आमच्या गांवच्या म्युनिसिपल मेंबरांपर्यंत लोकशाहीच्या साऱ्या पुरस्कर्त्यांना आपण केवढ्या प्रचंड प्रमाणावर विनोदाची पैदास करून ठेवीत आहोंत याची दखलहि नसेल.

बहुसंख्य लोकांचा पाठिंबा असलेली व्यक्ति म्हणजे कर्तुमकर्तुं अन्यथाकर्तुम् शक्तीचं प्रतीक असल्याचा जोंपर्यंत आम्ही विश्वास बाळगूं तोंपर्यंत सामाजिक जीवनाचं हें असंच ' हंसं ' व्हायचं !

' ज्याच्यामागं गर्दी तोच राजकारणांतला दर्दी ' अशी माझ्या एका विनोदी मित्रानं राजकारणी पुरुषाची व्याख्या केली आहे. राजकारणच कशाला ! तत्त्वज्ञान, वाङ्मय, संगीत इत्यादि कोणत्याहि

चाच हा विशेष आहे ! गुणाऐवजीं संख्येवरूनच एखाद्या गोष्टीचं महत्त्वमापन करायची हल्लीं आपणांला संवय जडली आहे अन् या दृष्टिकोनांतूनच लोकशाहीच्या तत्त्वाचा उदय झाला असं विधान केलं तर तें फारसं चुकीचं ठरणार नाहीं.

राजनीतिविशारदांऐवजीं बहुमताचा कौल घेऊन पास करण्यांत येणारे कायदे किंवा बहुमतानें निवडल्या जाणाऱ्या निवडणुकी पाहिल्या म्हणजे आजच्या युगांतलं हें संख्यावलाचं माहात्म्य अधिकच ठळकपणें जाणवूं लागतं !

दर तीन—चार वर्षांनीं व्याख्यानं, विड्या अन् वचनं यांचा जनतेवर वर्षांव करून म्युनिसिपालिटींत निवडून येणाऱ्या आमच्या गांवच्या कांहीं महाभागांकडे पाहिलं कीं, मला शेक्सपियरच्या एका सुप्रसिद्ध सुभाषिताच्या चालीवर म्हणावंसं वाटतं, ' विनोदा, तुझं नांव लोकशाही ! '

खरंच, बहुसंख्य जनतेच्या मर्जीनुरूप चाललेल्या आजच्या राज्यकारभारांत हास्यरसाची केवढी तरी सामुग्री सांठविली आहे ! देशाच्या उत्कर्षासाठीं माकडं मारण्याचा किंवा रताळ्याचं पीठ खाण्याचा उपदेश करणाऱ्या भारतीय संसदेच्या महान् सभासदापासून तों गजकर्ण खाजविणाऱ्यांवर करमणुकीचा कर बसवूं पाहणाऱ्या आमच्या गांवच्या म्युनिसिपल मेंबरांपर्यंत लोकशाहीच्या साऱ्या पुरस्कर्त्यांना आपण केवढ्या प्रचंड प्रमाणावर विनोदाची पैदास करून ठेवीत आहोंत याची दखलहि नसेल.

बहुसंख्य लोकांचा पाठिंबा असलेली व्यक्ति म्हणजे कर्तुमकर्तुं अन्यथाकर्तुम् शक्तीचं प्रतीक असल्याचा जोंपर्यंत आम्ही विश्वास बाळगूं तोंपर्यंत सामाजिक जीवनाचं हें असंच ' हंसं ' व्हायचं !

' ज्याच्यामागं गर्दी तोच राजकारणांतला दर्दी ' अशी माझ्या एका विनोदी मित्रानं राजकारणी पुरुषाची व्याख्या केली आहे. राजकारणच कशाला ! तत्त्वज्ञान, वाङ्मय, संगीत इत्यादि कोणत्याहि

# पांच तोंडांचा राक्षस : : ४

आयुष्यांत आपण शंभर नाटकं लिहिणार आहोंत असं माझ्या एका साहित्यिक मित्रानं मजजवळ बोलून दाखविलं, तेव्हां मी मनाशीं हंसून म्हटलं, 'स्वारीचा हा संकल्प ऐकून मराठी रंग-देवतेला तिच्या डोक्यावर वरदहस्ताऐवजीं बर्फाचा खडा ठेवायची इच्छा खचित झाली असेल!'

जीवनाचाच काय, पण व्याकरणांतल्या विभक्तीचासुद्धां प्रत्यय कशाशीं खातात हें ज्याला फारसं ठाऊक नाहीं अशा एका अनभिज्ञ प्राण्याच्या तोंडची शंभर नाटकं लिहायची भाषा स्फूर्तीपेक्षां वाताच्याच झटक्याची निदर्शक नव्हे का?

आणि मग बर्फाचा खडा डोक्यावर ठेवणं हाच त्यावर उत्तम इलाज नाहीं का? माझ्या त्या मित्राच्या शतकपूर्तीच्या कल्पनेंत शंभर अश्वमेध करणाऱ्या धर्मराजाच्या पुण्याईपेक्षां शंभर पुत्रांना जन्म देणाऱ्या धृतराष्ट्राचं दुर्दैव साठवलं आहे अशी माझी नक्की खात्री आहे!

संख्येऐवजीं गुणावर भर देऊन त्यानं आपल्या वाङ्मयनिर्मितीचं अंदाजपत्रक तयार केलं असतं तर महाराष्ट्र-शारदेला त्याच्याविषयीं केवढा अभिमान वाटला असता! पण मला वाटतं, हल्लींच्या युगा-

-चाच हा विशेष आहे ! गुणाऐवजीं संख्येवरूनच एखाद्या गोष्टीचं महत्त्वमापन करायची हल्लीं आपणांला संवय जडली आहे अन् या दृष्टिकोनांतूनच लोकशाहीच्या तत्त्वाचा उदय झाला असं विधान केलं तर तें फारसं चुकीचं ठरणार नाहीं.

राजनीतिविशारदांऐवजीं बहुमताचा कौल घेऊन पास करण्यांत येणारे कायदे किंवा बहुमतानें निवडल्या जाणाऱ्या निवडणुकी पाहिल्या म्हणजे आजच्या युगांतलं हें संख्याबलाचं माहात्म्य अधिकच ठळकपणें जाणवूं लागतं !

दर तीन–चार वर्षांनीं व्याख्यानं, विड्या अन् वचनं यांचा जनतेवर वर्षाव करून म्युनिसिपालिटींत निवडून येणाऱ्या आमच्या गांवच्या कांहीं महाभागांकडे पाहिलं कीं, मला शेक्सपियरच्या एका सुप्रसिद्ध सुभाषिताच्या चालीवर म्हणावंसं वाटतं, ' विनोदा, तुझं नांव लोकशाही ! '

खरंच, बहुसंख्य जनतेच्या मर्जीनुरूप चाललेल्या आजच्या राज्यकारभारांत हास्यरसाची केवढी तरी सामुग्री सांठविली आहे ! देशाच्या उत्कर्षासाठीं माकडं मारण्याचा किंवा रताळ्याचं पीठ खाण्याचा उपदेश करणाऱ्या भारतीय संसदेच्या महान् सभासदापासून तों गजकर्ण खाजविणाऱ्यांवर करमणुकीचा कर बसवूं पाहणाऱ्या आमच्या गांवच्या म्युनिसिपल मेंबरांपर्यंत लोकशाहीच्या साऱ्या पुरस्कर्त्यांना आपण केवढ्या प्रचंड प्रमाणावर विनोदाची पैदास करून ठेवीत आहोंत याची दखलहि नसेल.

बहुसंख्य लोकांचा पाठिंबा असलेली व्यक्ति म्हणजे कर्तुमकर्तुं अन्यथाकर्तुम् शक्तीचं प्रतीक असल्याचा जोंपर्यंत आम्ही विश्वास बाळगूं तोंपर्यंत सामाजिक जीवनाचं हें असंच ' हंसं ' व्हायचं !

' ज्याच्यामागं गर्दी तोच राजकारणांतला दर्दी ' अशी माझ्या एका विनोदी मित्रानं राजकारणी पुरुषाची व्याख्या केली आहे. राजकारणच कशाला ! तत्त्वज्ञान, वाङ्मय, संगीत इत्यादि कोणत्याहि

क्षेत्रांत नजर टाका. तुम्हांला वरील व्याख्येंतील सत्याचाच थोड्याफार प्रमाणांत प्रत्यय आल्यावांचून राहणार नाहीं.

मुंडेछाट सदऱ्यावर जाकीट घालण्यापलीकडे दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रीय गुणांचा उद्रेक ज्यांच्या ठिकाणीं दिसून आला नाहीं, अशा कित्येक महापुरुषांना राजकारणाच्या दरबारांत मानाचे मुजरे झडत आहेत नि ज्यांच्या देहाचा कण न् कण राष्ट्रीयत्वाच्या भावनेनं फुलून निघाला अशा देशभक्तांच्या घरांच्या झडत्या घेतल्या जात आहेत. स्वतःभोंवतीं गर्दी जमविण्याचं तंत्र अवगत नसल्यामुळंच त्यांना हें प्रायश्चित्त मिळत नसेल का ? येशू ख्रिस्त किंवा सॉक्रेटिस यांच्या तत्त्वांची उपेक्षा करून तत्कालीन सत्ताधीशांनीं त्यांचा वध करविला तोसुद्धां त्या तत्त्वज्ञांच्या पाठीमागं लोकगंगेचा लोंढा वहात आला नव्हता म्हणूनच ना ?

स्त्रीसुलभ मार्दवतेपलीकडे ज्यांच्या गळ्यांत गायनकलेंतलं कसलंच वैशिष्ट्य उतरलं नाहीं, ज्यांना ताल, लय अगर स्वरांचा सच्चेपणा यांची जानपछान नाहीं अशा सिनेमा-नटींच्या अनुग्रहासाठीं त्यांच्या बंगल्यांच्या दाराशीं चित्रपटनिर्मात्यांची रांग लागते अन् मग त्यांच्या बेसुरेल, अशास्त्रीय, निर्बुद्ध गायकीच्या किंमतीचा आंकडा शंभरावरून हजारापर्यंत नि हजारावरून लाखापर्यंत सहज चढत जातो ! उलट ज्यांनीं उभी हयात संगीताच्या रियाज़ांत घालाविली, संगीत-साधनेच्या ध्येयापुढें साऱ्या ऐहिक सुखोपभोगांना तुच्छ लेखलं अशा गानसृष्टीच्या विधात्यांची वाण्याच्या दुकानावरली सुद्धां पत दिवसेंदिवस घसरतं जाते !

महिन्यागणिक पांच पंचवीस कविता विटाळ्यांतून पाडणाऱ्या कविवर्यांचं काव्य प्रातिनिधिक कवितासंग्रहांत ऐसपैस जागा अडवून बसण्याइतकं मान्यता पावतं अन् दलितांच्या दैन्याशीं अन् दुःखाशीं तद्रूप होऊन साने गुरुजींसारख्या संत कवींनीं टाकलेले काव्यरूप निःश्वास वाऱ्यावर विरून जातात. महाकवीच्या भव्य प्रतिभा-

विलासाची ओळख पटविणाऱ्या सावरकर, बी, इत्यादि कवीश्वरांच्या काव्यवाणीवर विस्मृतीचीं पुटं चढू पाहतात !

संख्येवरून वस्तूची वा व्यक्तीची किंमत ठरविणाऱ्या आधुनिक जगानं भूतकाळाकडे ओझरती नजर टाकली तरी त्याला आपली चूक कळून आल्यावांचून रहाणार नाहीं !

तीनच विद्वानांची परिषद बोलवावी असा आदेश देणारा मनु, कौरवांऐवजीं पांडवांच्या पक्षाला जाऊन मिळालेला कृष्ण, मूठभर मावळ्यांच्या बळावर मोंगलांच्या अवाढव्य सैन्याशीं शह द्यायला सिद्ध झालेले शिवबा, या साऱ्या विभूतींच्या आचरणांत व्यक्त झालेली गुणाविषयींची निष्ठा आम्हांला कांहींच का मार्गदर्शन करणार नाहीं ? मूठभर पोह्यांच्या मोबदल्यांत श्रीकृष्णानं सुदामजीला सोन्याची नगरी बहाल केली ती त्याचं अर्थशास्त्र कच्च होतं म्हणून का ? सोळा हजार एकशें सात स्त्रियांचीं सुवर्णभूषणं एका पारड्यांत नि रुक्मिणीचं तुळशीचं पान एका पारड्यांत टाकल्यावर दुसरंच अधिक जड भरलं अन् रुक्मिणीच्या प्रीतीची कसोटी लागली, याचा अर्थ एखाद्या सराईत सराफाच्या सफाईनं श्रीकृष्णानं तराजूच्या दांडीला झोका दिला होता असा करतां येईल का ? छे ! छे ! कोणत्याहि गोष्टीचं मूल्यमापन करतांना संख्येला गौण स्थान असावं हेंच या दोन्ही आख्यायिकांतून सूचित होत नाहीं का ? 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरम्' असा आपल्या पुत्राला उद्देशून उपदेश करणाऱ्या वीरपत्नी विदुलेला संख्येऐवजीं गुणाचीच महती पटली नव्हती का ?

मिल्लसारख्या पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांनीं कार्याकार्य-कसोटी ठरवितांना 'पुष्कळांच्या पुष्कळ' सुखाविषयींची जी उपपत्ति गृहीत धरली ती किती भ्रममूलक आहे हें 'रहस्यकारां' नीं मोठ्या मार्मिकपणें आपल्या गीतेवरील भाष्यांत सिद्ध करून दिलं आहे.

निवडक, मोजके श्रोते उपस्थित असले म्हणजे गाण्याच्या मैफलीला क्षणाक्षणाला कशी रंगत चढत जाते हें अनेकांनीं अनुभवलं असेलच—

युद्धाच्या हालचाली सार्वमताऐवजीं सेनापतीच्या सल्ल्यावरहुकूम चालत असतात, यांतलं इंगित तरी दुसरं कोणतं आहे? रोग्याच्या खाटेभोंवतीं जमलेल्या आप्तेष्टांच्या मताला वैद्य आपली औषधयोजना टाकीत नाहीं तोंपर्यंतच रोग्याची घडगत आहे हें विसरून कसं चालेल?

सारांश, बहुमताचा मागोवा घेऊन पाऊल टाकण्यांत समाज आपल्या विनाशाची पूर्वतयारी करीत आहे असं मला निश्चितपणें वाटत आहे! वनस्पति-तुपापासून तों हिंदुकोडापर्यंत अनेक लहान-मोठ्या गोष्टीसंबंधीं जनमत अजमावून पाहून त्यावरून त्या गोष्टीची इष्टानिष्टता ठरवूं पाहणारं आजचं आमचं सरकार पाहिलं कीं मला 'विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः' ही भर्तृहरीची उक्ति एकापेक्षां अनेक अर्थांनीं खरी वाटूं लागते!

मनुष्याच्या शरीराला कोणतीं घटकद्रव्यं पोषक आहेत याचं अचुक ज्ञान ज्यांना आहे अशांनाच वनस्पति तुपाचा बरेवाईटपणा ठरविण्याचा अधिकार नाहीं का? पण कोणत्याहि सोम्या गोम्यानं उठावं अन् वनस्पति तुपाच्या बाजूनं अगर विरुद्ध हात वर करावा ही लोकशाही-वरील श्रद्धा समजावी कीं श्राद्ध?

समाजशास्त्र, कायदेशास्त्र अगर घटनाशास्त्र याचीं पुसटहि तोंड-ओळख नसलेल्या मनुष्यानं हिंदुकोडासंबंधीं आपलं मत प्रकट करावं आणि त्यावरून हिंदुकोडाची आवश्यकता वा अनावश्यकता सिद्ध व्हावी ही लोकशाहीच्या तत्त्वाची किती क्रूर थट्टा म्हणावयाची!

'पांचामुखीं परमेश्वर' या म्हणीची ढाल पुढें करून वाचक माझ्या या विधानाचा हल्ला परतवून लावण्याच्या विचारांत असतील. पण प्रत्येक मनुष्य हा दुतोंडी असतो, त्या अर्थीं 'पांचांमुखीं रावण' अशीच नवी म्हण बनवायला पाहिजे असं कुणीसं म्हटलंय् ना? मला त्या लेखकाचं म्हणणं शंभर टक्के पटतं! बहुमताच्या जोरा-वर इच्छित कामनांची पूर्ति करूं पाहणाऱ्या आजच्या लोकशाहींत

परमेश्वराचं राहोच, मानवाचं सुद्धां दर्शन होणं दिवसेंदिवस दुरापास्त होत चाललं आहे!

हृदयांत माणुसकीचा अंश असल्यावर त्याच्या आविष्कारासाठीं पंचांचीच काय आवश्यकता आहे? ती ज्याची त्याला एकट्यालाहि प्रकट करतां येईल. प्रतिभेचं देणं लाभलेल्या साहित्यिकाला आपल्या निर्माणक्षमतेची साक्ष पटवायला शंभर नाटकंच लिहिलीं पाहिजेत असा कुठं नियम आहे? ती एखाददुसऱ्या कृतीवरूनहि त्याला सिद्ध करून दाखवितां येईल. गुणाचा संख्येशीं मेळ घालूं पाहणंच मुळीं चुकीचं आहे. 'एकश्चंद्रस्तमो हन्ति नच ताराशतान्यपि' हेंच खरं!

—'दै. भारत', दिवाळी अंक १९५०

१२०००
२११५३

# छापाचे गणपति ! : : ५

पंधरा वीस मिनिटें निरीक्षणांत घालवूनहि कोणता गणपति खरेदी करावा याविषयीं मनाचा कांहींच निश्चय ठरेना ! पण दुसऱ्याच क्षणीं त्या मूर्तींत सरस निरस ठरवूं पाहणाऱ्या माझ्या मनाचंच मला हंसूं आलं ! सरसकट एकाच छाप्यांतून काढलेल्या त्या मूर्ति ! तिथं सरसानिरसपणाला कुठून वाव असायला !

बाकी, मूर्तींतहि देवाचं निराकारत्व सूचित करणाऱ्या त्या कारागिराच्या कलेचं मला कौतुक वाटलं ! विनायकाची मूर्ति घडवितांना त्यांतून प्रगट होणारं वानररूप हा कलात्मतेचा आद्य आविष्कार मानला तर मूर्तींच्या ठिकाणीं दृग्गोचर होणारी तेहतीस कोटी देवांची 'कळा' ही त्या कलात्मतेची अखेरची उत्क्रांतावस्था मानावी लागेल ! नांव गणपतीचं, पण स्वरूप हव्या त्या देवतेचं, अशी त्या छाप्याच्या मूर्तींकडे पाहतांना माझी खात्री पटली.

एकाच सांच्यांतून गणरायाच्या मूर्ति ओतून काढणाऱ्या कारागिराचा उपहास करतां करतां माझ्या मनांत विचार आला, गणपति म्हणजे बुद्धीचं प्रतीक! एकाच सांच्याचं बौद्धिक जीवन जगणारीं आजचीं आम्हीं माणसं म्हणजे तरी काय, छापाचे गणपतीच आहोंत कीं ! वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेलं म्हणून हजारांत एखाद्या-

ऱ्याच जीवनाकडे अंगुलिनिर्देश करतां येईल. बाकीच्या साऱ्यांच्या जीविताची तऱ्हा ठराविक साच्यांतून ओतून काढलेली, एकाच थाटाची, एकाच घाटाची !

आमच्या वऱ्हाडांत, दिवाळीच्या वेळीं श्रीमंतांच्या वाड्यांच्या चिरेबंदी भिंती पिवळ्या धमक अन् हुरमुंजी रंगानं रंगविल्या जात असतात. एक पिवळा, एक हुरमुंजी, एक पिवळा, एक हुरमुंजी अशा तऱ्हेनं तेलकट घट्ट रंगांत सारे चिरे रंगून निघतात ! भिंत रंगविण्याची दुसरी कोणतीहि तऱ्हा अद्याप आमच्या विदर्भभूमींत जन्म पावली नाहीं !

थेट हीच अवस्था आमच्या जीवनाची झाली आहे. वैय्यक्तिक वा सामुदायिक जीवनांत कुठंही डोकावून पहा, जिथं तिथं तोचतो-पणा भरलेला तुम्हांला आढळून येईल ! शेज्यांनीं रेडिओ आणला म्हणून मुळ्यांनाहि तो आपल्या घरीं असावा अशी इच्छा होते, अन् दोघांच्याहि इथले रेडिओ किंचाळूं लागले म्हणजे तिसऱ्याचा आंतला आवाज खडबडून जागा होऊन तोहि नवा सेट खरेदी करण्याविषयीं आदेश देतो !

कोणत्याहि कृतीच्या मुळाशीं स्वतःचा असा विशिष्ट हेतु वा दृष्टिकोन नाहीं; त्यानं केलं म्हणून मीं केलं, हीच त्याची कार्यकारण-मीमांसा !

आमच्या शेजारच्या चाळींत एक गोविकरीण राहते. काळ्याभोर लांबसडक केशसंभाराची तिला निसर्गतःच देणगी लाभली आहे. पाठीवर लांबसडक वेणीचा शेपटा टाकून ती ऐटींत चालूं लागली म्हणजे पाताळांतल्या एखाद्या रूपसुंदर नागकन्येचा मत्तविलास दृष्टि-पथांत आल्याची जाणीव पहाणाऱ्याला होत असते. पण तिच्या सह-वासांत नेहमीं रहाणाऱ्या दुसऱ्या एका स्त्रीनं तिचं अनुकरण करून स्वतःच्या पाठीवर जाड,राकट केसांच्या वेणीचा पेड टाकलेला पाहिला

कीं मला पाताळांतल्या नागिणीऐवजीं आफ्रिकेच्या जंगलांत सुस्त होऊन पडलेल्या अजगराची आठवण होते अन् अंगावर शहारे येतात.

जाड, राकट केस वेणीपेक्षां अंबाड्याच्याच अधिक उपयोगाचे नाहींत का ? पण ही जाणीव कांहीं त्या बापड्या स्त्रीच्या मनाला शिवत नाहीं अन् तिचं सौन्दर्यप्रसाधन शृंगाराऐवजीं हास्यरसाचाच उद्दीपनाविभाव होऊन बसतं !

शाळेची कोनशीला बसविणाऱ्या पुढाऱ्यापासून तों वर्गातील दगडधोंड्यांना शिस्तींत बसविणाऱ्या शिक्षकापर्यंत सारे बुद्धीजीवी प्राणी असलंच गतानुगतिकत्वाचं नीरस, रटाळ जीवन जगत आहेत.

तेच ते गोरे गोमटे चेहरे नि अनावृत उरोज चिताडणारे चित्रकार; प्रीतीच्या शाश्वत त्रिकोणांत पिंगा घालणारे लेखक, पडद्याकडे पहात ' अजून कां बरें प्रिया येत नाहीं ! ' असा स्वतःशीं प्रश्न करून स्टेजवर चुळबुळ करणारे अभिनयसम्राट, हे सारे जीव विश्वाच्या या विस्तीर्ण डोहांत तोचतोपणाचा रवंथ करीत फतकल मारून बसले आहेत !

जीविताच्या डफावर तडफदारपणानं थाप देऊन, खड्या उंच आवाजांत पराक्रमाचे पवाड रचून, गाऊन दाखविणारा शाहीर एखादाच ! ' सावळ्या रामा ऽ दाऽजीऽऽ ' म्हणून री ओढणाऱ्या झीलकऱ्यांचीच संख्या फार !

नवरात्र संपतं, दसरा उजाडतो, मोरूचा बाप मोरूला म्हणतो, मोरू, लवकर ऊठ, नवे कपडे घाल. '

मोरू उठतो, नवे कपडे घालतो.

मोठा झाल्यावर तोही अंथरुणांत लोळत पडलेल्या आपल्या चिरंजीवाला नवरात्र संपून दसरा उजाडल्याची जाणीव देतो अन् नवे कपडे घालण्याविषयीं सूचना करतो.

वर्षानुवर्षं, पिढ्यानूपिढ्या अशाच प्रकारें दसऱ्याचा सण साजरा केला जात आहे. गांवालगतच्या शेतांतलीं जोंधळ्याचीं चार धसकटं

उपटण्याचा पराक्रम केल्याबद्दल मोरूला काशीकडून ओवाळून घेतांना कसलीच दिक्कत वाटत नाहीं; त्याच्या वाडिलांनाहि वाटली नव्हती; त्याच्या चिरंजीवालाहि ती वाटण्याचं कांहीं कारण नाहीं ! वाण्याकडून उधारीनं किराणा आणून दसऱ्याच्या दिवशीं आनंदाला तोटा नसल्याचं सिद्ध करण्यांत मोरूच्या आधींच्या पिढ्यांनीं उभी हयात वेचली, तशीच मोरूच्या नंतरच्या पिढ्याहि वेचीत आहेत !

सर्वसामान्य माणसाच्या कर्तृत्वहीन, अळणी आयुष्याचं चित्रण करणारी एक इंग्रजी कविता आहे. वारांचीं नांवं लहान मुलांच्या लक्षांत राहावीं म्हणून ती कविता रचण्यांत आली असं म्हणतात. पण मला मात्र वैशिष्ट्यहीन आयुष्यक्रमाचं यथार्थ दर्शन घडविणारं काव्य म्हणूनच त्याचं महत्त्व जाणवतं !

त्या पद्यपंक्ती अशा आहेतः-

Soloman Grundy
Born on Monday,
Christened on Tuesday,
Married on Wednesday,
Sickened on Thursday,
Worse on Friday,
Died on Saturday,
Buried on Sunday,
This is the end of Solomon Grundy.

गडकऱ्यांच्या मूकनायकाविषयीं लिहितांना खांडेकरांनीं या यमकयुक्त परंतु अर्थहीन पद्याचा निर्देश करून म्हटलें आहे, ' बारसें, उष्टावण, मुंज, लग्न, नोकरी, संसाररथांत झालेली मुलाबाळांची गर्दी, आजार, मृत्यु, बारावें आणि फार तर श्राद्ध यांची बेरीज केली कीं एक दीर्घायुषी मनुष्याचा जीवितपट तयार होतो !' किती अर्थपूर्ण आहे खांडेकरांचा हा उद्गार !

प्रेयसीला चोरून पत्र पाठविणाऱ्या प्रेमवीरांचा चाळींचाळींतून वुजबुजाट झाला आहे. पण अपरात्रीं पत्नीच्या माडींत सापाला धरून प्रवेश करणाऱ्या तुळसीदासाची प्रणयोत्कटता किती अभूतपूर्व !

गीतेच्या सहाय्यानं निःश्रेयसावर प्रवचन झोडणारे वेदांतीं कांहीं थोडे थोडके नाहींत. पण त्याच ग्रंथाच्या मंथनांतून कर्मयोगाच्या शिकवणीचं अमृत काढणाऱ्या लोकमान्यांची तत्त्वजिज्ञासू वृत्ति किती लोकोत्तर होती !

रक्तरंजित राजनीतीचं आवाहन करणाऱ्या असंख्य मुत्सद्यांपेक्षां निःशस्त्र लढ्याचा आग्रह धरणाऱ्या महात्माजींचं राजकारण, विज्ञानांतून विनाशाकडे जाणाऱ्या जडवाद्यापेक्षां त्याच ज्ञानाच्या सहाय्यानं आत्मतत्त्वाची अनुभूति घेऊं पाहणाऱ्या जगदीशचंद्रांचा भौतिकवाद, त्याच त्या श्रृंगार-करुणादि भावनांची मुद्राभिनयांतून वा पदविन्यासांतून आविष्कृति करणाऱ्या शेंकडों, हजारों नर्तकांपेक्षां आपल्या कलात्मतेंतून यंत्रयुगाच्या विध्वंसक, विराट स्वरूपाचं दर्शन घडविणाऱ्या उदयशंकराचं नृत्य–

किती अपूर्वता, किती असामान्यत्व भरलं आहे या साऱ्यांत !

याचं नांव आयुष्य !

ऐसिया नवलाच्या कृति । आचरती तेचि विभूति ।<br>
येरवीं ते गणपति । छापियाचे कां न म्हणूं ? ॥

—'मातृभूमि', दिवाळी अंक, १९५०

## गुणगुण : : : ६

स्त्रियांची लज्जा ही नेहमींच रसनिष्पत्तीला कारणीभूत असते, असं समजायचं बिलकूल कारण नाहीं. तिच्यांतून केव्हां केव्हां विरसहि जन्माला येतो हें मी स्वानुभवानं सांगू शकतों!

परवांच माझ्या पत्नीची एक मैत्रीण गप्पा करण्यासाठीं आमचेकडे येऊन बसली होती. बोलतां बोलतां सहज तिला गुणगुणण्याची लहर आली—

'का ऽ हे करत तूं गुमा ऽ ऽ न......'

आकस्मिकपणें अंगावरून गार वाऱ्याची झुळूक जावी तसं मला वाटलं. मी एकदम हर्षभरित होऊन उद्गारलों, 'वाहवा!'

त्यासरशीं गुणगुणणं बंद करून ती तरुण स्त्री लाजत म्हणाली, 'इश्श! सहज गात होतें मी आपली...'

'मोठी सुंदर बांधलीय ही चीज. खरंच, म्हणा ना!'

'अय्या! गळ्याची शपथ सांगतें...'

गळ्याच्या शपथेचा इतका समर्पक उपयोग क्वचितच होत असेल या कल्पनेनं हंसतांना मी त्या स्त्रीनं केलेली निराशा विसरण्याचा यत्न केला. दोन वर्षांपूर्वी हीच चीज लाहोरकडल्या एका मुसलमान गायिकेच्या तोंडून ऐकण्याची संधि मला मिळाली होती.

उंची कनोजी अत्तराच्या कुपीचं झांकण काढतांच क्षणार्धात सारं वातावरण मस्त सुगंधानं दरवळून जावं, त्याप्रमाणं दोन वर्षांपूर्वींच्या त्या जलशाची आठवण होतांच माझ्या अंतःकरणाचा कोपरा न् कोपरा मस्त सुवासानं धुंद झाला.

कुणाच्या तरी फर्मायशीवरून बाईंनीं सारंगांतली ती चीज म्हणायला सुरवात केली. तबलजीनं एक भरगच्च सुंदर मुखडा घेऊन ठेका धरला. स्वरांचा कसदारपणा, तानेचा स्वच्छपणा, रंगतदार फिरत अशीं गायिकेच्या कंठांतलीं वैशिष्ठ्यं क्रमाक्रमानं श्रोत्यांना प्रतीत होऊं लागलीं आणि साऱ्या दिवाणखान्यांत विलक्षण तटस्था पसरली. तिच्यापूर्वीं तीन चार गवई गाऊन गेले होते. पण साऱ्या श्रोतृसभेवर सुरमोहिनी टाकून तिला मंत्रमुग्ध करण्याची अजब जादु याच गायिकेच्या कलेंत आहे अशा अर्थाचा अभिप्राय प्रत्येकाच्या नजरेनं व्यक्त झाला केला.

तबलजीनंहि चाटीला सुरेलपणाची आस देऊन अन् शक्य त्या भरदारपणानं डग्गा घुमवून मैफलीची रंगत वाढविण्याकडे आपलं सारं अवधान केंद्रित केलं. नवे नवे पेंच टाकून गाणाऱ्याला गोत्यांत आणणाऱ्या अन् आपल्या वादनकौशल्याच्या प्रदर्शनाच्या हव्यासांत बैठकीचा बदरंग करणाऱ्या तबलबाजीचा क्षुद्रपणा त्याच्या वृत्तींत दिसून येत नव्हता. गायिकेच्या भावनेशीं समरस होऊन, मीठे वजनदार बोल तबल्यावर काढून रसपरिपोष करण्याची त्याला कोण उत्कंठा लागली होती!

श्रोत्यांच्या मनश्चक्षूंमोर हां हां म्हणतां कुंजवनाचें दृश्य उभं राहिलं. मानिनी राधा कृष्णावर रुष्ट होऊन एकीकडे जाऊन कुढत बसते, तिचा रोष घालविण्यासाठीं एक व्रजबाला आर्जवयुक्त शब्दांनीं तिची मनधरणी करते—

'का ऽ हे करत तूं गुमा ऽ ऽ न मानिनी '......

ढंगदार, स्वच्छ स्वरोच्चार, रसानुकूल हावभाव, चमकदार हरकती,

अर्थपूर्ण शब्दांची फेक इत्यादींच्या सहाय्यानं ती गायिका अशा कांहीं मोहकपणानं अन् कलात्मतेनं रागदारीचं स्वरूप स्पष्ट करीत होती कीं सारे श्रोते डोलूं लागून, 'वाहवा !', 'अहाहा !', 'बहोत अच्छे !' इत्यादि प्रशंसोद्गारांची मुक्त कंठानं खैरात करूं लागले.

चिजेची बढत करतांना निरनिराळ्या मात्रेवरून उठाव करून ती ज्या वैचित्र्यपूर्ण सौंदर्यानं अन् सहजतेनं लयीशीं क्रीडा करीत होती तिचं कुठवर वर्णन करावं ? लयींत मुरलेल्या तिच्या सुरेल, पिळदार आवाजांतून निघणारी प्रत्येक तान, प्रत्येक मुरकी किंबहुना प्रत्येक अलंकार राधेच्या मैत्रिणीचा आर्जवीपणा, व्याकुळता इत्यादि भाव श्रोत्यांच्या प्रत्ययास आणून देत होता.

संगीत कलेशीं इतक्या निष्ठेनं तद्रूप झाल्यावर तिचा मनमुरादपणें आस्वाद कां घेतां येणार नाहीं ?

एकंदर जीवनाशींच मनुष्याची वृत्ति इतकी समरस, इतकी तदाकार व्हावयास हवी; तरंच त्याला त्याची खरी गोडी, खरं सौंदर्य कळूं शकेल, इतरांनाहि त्याची प्रचीति आणून देतां येईल !

कंठांतल्या कंठांत चीज गुणगुणणाऱ्या माझ्या पत्नीच्या मैत्रिणीप्रमाणं जीवनाचा बरवर आस्वाद घेण्यांत सध्यां तुम्ही आम्ही गढून गेलों आहोंत ! पाण्याचे चार दोन शिंतोडे अंगावर घेऊन कावळा आपलं स्नान उरकतो म्हणतात. आम्हीहि जीवनसरितेच्या काठाशीं उभे राहून असलं काकस्नान आटोपण्यांतच अभ्यंग स्नानाची मौज लुटल्याचं समाधान मानीत असतों.

प्रीति, भक्ति, कीर्ति इत्यादि विषयांतला उत्कट आनंद सेवन करायला लागणारी आवश्यक ती क्षुधार्त वृत्तीच आमच्या ठिकाणीं नाहीं. पानांत वाढलेले चार पदार्थ नुसते चिवडून अन् उष्टावल्याप्रमाणं करून उठून जाणाऱ्या रुग्णाइताप्रमाणं आमचा जठराग्नि मंदावला आहे कीं काय कुणास ठाऊक !

महिन्याकांठीं चार दोन रहस्यकथा वाचल्या किंवा एखादटुसरी कविता मासिकांतून छापून आणली कीं आमच्या वाङ्मयानंदाला उधान येतं !

सकाळीं चहा पितांना एक आणावाल्या वर्तमानपत्रांतल्या शिळ्या ताज्या बातम्या वाचून त्यांच्या आधारानं दुपारीं ऑफिसांत तावा-तावानं भाष्य करण्यापलीकडे आमच्या राजकारणाची मजल जात नाहीं !

तसंच प्रीतीचंही. प्रथितयश कवीपासून तों कॉलेजच्या परीक्षेंत वारंवार आपटी खाणाऱ्या खुशालचेंडूपर्यंत सर्वांच्याच ओठावर प्रीतिविषयीं प्रवचनं झोडण्याची उत्कंठा स्फुरत असलेली तुम्हांला दिसून येईल. पण त्यांच्यापैकीं एकाला तरी खऱ्या, उत्कट प्रीतीचा अनुभव येत असेल तर शपथ ! प्रेयसीला दिवसांतून दोनदां प्रणय-पत्रिका लिहून आपल्या हृदयाची काव्यमय हालहवाल (म्हणजे फुफ्फुसांची प्रसरणसंकोचादि क्रिया, रक्ताचा दाब, रुधिराभिसरण इत्यादि गद्य भाग वगळून) कळविणारे शेंकडा नव्वद प्रेमवीर प्रीति-साफल्याचा क्षण उगवण्यापूर्वींच दिलजमाईची नवी आघाडी उघडून बसलेले आढळून येतात ! उरलेल्या दहा टक्क्यांची मजल कशीबशी प्रीतिविवाहापर्यंत गेली तरी थोड्याच दिवसांत त्या प्रेमी युगुलाला घटस्फोटाच्या कायद्यावरलीं पुस्तकं चाळण्याची आवश्यकता भासूं लागते अन् विवाहापूर्वीं प्रीतीला दिलेली मधुघटाची उपमा निराळ्याच अर्थानं स्वारस्यपूर्ण असल्याची खात्री पटते !

प्रियकराला चुंबन देतांना गालावरली पावडर वाजवीपेक्षां अधिक प्रमाणांत पुसली गेल्याच्या आधारावर त्याच्याशीं फारकत घेऊं पाहणाऱ्या लयला, किंवा गजगतीऐवजीं लांब लांब टांगा टाकीत चालण्याची बायकोला संवय आहे, म्हणून स्वतःच्या संसाराचं सहारा वाळ-वंट झाल्याची समजूत करून घेणारे मजनू, यांना प्रीतीच्या उत्कट-तेची कधीं तरी कल्पना येणं शक्य आहे का ?

हौसेखातर नाट्यप्रयोग करणाऱ्या कितीतरी संस्था अन् क्लब हल्लीं पुण्यामुंबईसारख्या ठिकाणीं आढळून येत आहेत. पण अभिनयकला कशाशीं खातात याचा यत्किंचित्‌हि विचार न करतां रंगभूमीवर पाऊल टाकणारे हे धाडसी नटवर्य पाहिले कीं शकार, विट, चेटादि मूर्खांच्या तावडींत सांपडलेल्या वसंतसेनेसारखी मराठी रंगभूमीची अवस्था झाली आहे अशी मनाची खात्री पटल्यावांचून राहत नाहीं ! एवढा मोंगलांना कर्दनकाळ वाटणारा शिवाजी; पण ऐनवेळीं भाषण विसरल्यामुळं त्याला गोगलगाय बनून केविलवाण्या नजरेनं बुईंगकडे पाहावं लागतं; अंकाचा पडदा पुरता भुईला टेकण्यापूर्वीच रामदासाला झोळींतून विडी काढून तीन चार झुरके मारण्याची तल्लफ येते; दाढी कुरवाळण्याची अफजलखानाची जितेपणींची खोड मेल्यानंतरहि त्याला सोडीत नाहीं—

या सर्व प्रकाराला काय नाट्यसेवेचा आनंद म्हणायचा ?

दैनंदिन आयुष्यक्रमाचा उबग येऊन दोन दिवस एखाद्या रम्य, निवांत स्थळाची सहल काढतांनासुद्धां आम्ही आपले नित्याचे व्याप, संताप, रागद्वेष, हेवेदावे विसरूं शकत नाहीं. निसर्गाच्या प्रशांत निरामय वातावरणांत जाऊनहि तेथील भव्यतेचा, अद्‌भुततेचा, गांभिर्याचा आमच्या मनावर परिणाम होत नाहीं, तेथील दिव्यतेची अन् उदात्ततेची आम्हांला प्रचीति येत नाहीं ! महाबळेश्वर, माथेरान, सिंहगड, गिरसप्पा या मानवी मनावरले क्षुद्रतेचे, अहंकाराचे पडदे दूर करुन त्याला ईश्वरी सामर्थ्याचा साक्षात्कार घडविणाऱ्या केवढ्या विशाल, केवढ्या प्रेरक प्रकृति ! नवरसांनीं अन् विविध अलंकारांनीं नटलेलीं हीं महाकाव्यें म्हणायला हवींत वस्तुतः !

वसईचा किल्ला पाहण्यासाठीं आम्ही कांहीं मित्रमंडळी एका रविवारीं गेलों होतों. किल्ल्यांत ठिकाठिकाणीं विखुरलेले पोर्तुगीजांच्या वास्तुकलेचे भग्न, उदास अवशेष, इतस्ततः वाढलेलं काटेरी रान, शेवाळलेलीं डबकीं इत्यादि दृश्यं पाहून आमच्यापैकीं एका

शिक्षकिणीचं डोकं दुखूं लागलं. कोटाच्या कॉलरींत खोवण्याजोगं एकहि सुंदर फूल किल्ल्याच्या परिसरांत आढळून न आल्यामुळं एका कविराजानं आपलं नाक फेंदारलं, तर छायाचित्र घेण्यासारखा एकहि देखावा दिसून न आल्यामुळं एका होतकरू फोटोग्राफरच्या ओठांचा चंबू झाला! सौंदर्याचा शोध घेण्याच्या प्रयत्नांत निराश झालेल्या त्या तिन्ही आत्म्यांची मला कींव आली!

मातबर मराठ्यांच्या मर्दुमकीची ग्वाही देणाऱ्या त्या दुर्गाच्या दगडादगडांत, कणाकणांत मर्दानी सौंदर्याचीं प्रस्फुरणं स्फुरत असतां त्या तीन जिवांचा चित्तवेध होऊं नये या दुर्विलासाचं मला वाईट वाटलं! पराक्रमाची शर्थ करूनहि किल्ला सर होत नाहींसा पाहून, ' आपलं मस्तक तरी धडापासून वेगळं होऊन तें तोफेच्या गोळ्या-बरोबर किल्ल्यांत जाऊन पडो ' या चिमाजीअप्पांच्या तोंडून बाहेर पडलेल्या धीरोदात्त उद्गारांची आठवण करून देणाऱ्या त्या ऐति-हासिक स्थळाकडून आम्ही आणखी कोणत्या सुंदर गोष्टीची अपेक्षा करावी? किल्ला पडल्यावर एका फिरंग्याची लावण्यसंपन्न बायको अप्पासाहेबांच्या स्वाधीन झाली असतां तिला सन्मानानं परत पाठ-विल्याची नाट्यमय स्मृति आमच्या मनांत जागृत करणाऱ्या त्या स्थानाकडून आणखी कोणत्या चित्तवेधक दृश्याची आम्हीं अपेक्षा बाळगावी?

कोटाच्या कॉलरींत फूल खोवूं इच्छिणाऱ्या त्या तरुणापेक्षांहि अप्पासाहेबांनीं आपल्या छातीवर अपहृत पुरंध्रीचं मुखकमल विसावूं दिलं असतं तर त्यांची सौंदर्यदृष्टि अधिक प्रमाणांत व्यक्त झाली असती; पण या वरवरच्या, दिखाऊ सौंदर्यापेक्षां अधिक व्यापक, अधिक चिरंतन सौंदर्यासाठीं त्यांचं मन आसुसलं होतं. जीवनाशीं संपूर्ण तादात्म्यता साधल्यावांचून ही सौन्दर्यसमीक्षेची कला माणसाच्या अंगीं बाणत नाहीं हेंच खरं!

हिंदुस्थानच्या भूमींत ईश्वरविषयक भक्तीचं बीज चटकन् रुजतं म्हणतात. पण त्या विषयांत रंगून गेलेल्या स्त्री-पुरुषांचीं उदाहरणं पुराणांतच शोधण्याची पाळी येते. एखाद्या विनोदी लेखकानं सांप्रतच्या आमच्या भक्तिमार्गाची पुण्यांतल्या रस्त्यांशीं तुलना केली तर त्याला दोहोंत किती तरी साम्यस्थळं आढळून येतील ! पुण्यांतल्या रस्त्यांचं अस्तित्व पावसाळ्यांत विशेषेंकरून जाणवतं; भक्तांनाहि वर्षाकालीन चातुर्मास्यांतच व्रतवैकल्यांची तीव्रपणें आठवण येते. पुणेकर पादचाऱ्यांकडून बाजूनें जाणाऱ्या येणाऱ्यांवर जितका चिखल उडतो, त्यापेक्षां कितीतरी आधिक चिखलफेक मुमुक्षुजनाकडून इतर सांप्रदायिकांवर होत असते. ईश्वरोपासनेची आजची ही तऱ्हा पाहिली म्हणजे परमेश्वराला आपल्या ब्रह्मपदाचा राजीनामा देऊन मोकळं होण्याची लहर येत असावी अशी मिस्किल शंका मनांत डोकावूं लागते !

भक्तीप्रमाणं आमची विरक्तीहि उथळच ! घरांत कांहीं कुरकूर झाली कीं माझा एक मित्र गुरुचरित्राचा ग्रंथ काखोटीस मारून थेट माहूरचं शिखर गांठतो अन् दाढी जटा वाढवून अनुष्ठानास प्रारंभ करतो. त्याच्या या वैराग्याच्या झटक्याचं सरासरी मान वर्षाला तीन या प्रमाणांत पडत आलं आहे. प्रत्येक वेळीं मिरजेच्या शक्तिवर्धक पाकाच्या डब्याची व्ही. पी. परत जाईल म्हणून, विम्याचा हप्ता भरण्याची मुदत टळून जाईल म्हणून किंवा शेजाऱ्याच्या भाकड म्हशीला कोंडवाड्यांत घालण्याची महत्त्वाकांक्षा अतृप्त राहिली म्हणून, कोणत्या ना कोणत्या तरी निमित्तानं ही स्वारी दोन हजार फूट उंचीच्या शिखरावरून प्रपंचाच्या खोल दरींत गडगडत आली आहे !

दुसरे एक माझ्या ओळखीचे गृहस्थ आहेत. यांनाहि मधून मधून संसाराचे पाश तटातट तोडून टाकून ब्रह्माचा ठाव घेण्याची लहर येत असते. परमार्थाविषयींचीं यांची ही ओढ पत्नीवरल्या रागांतून

किंवा मुलांची फी वाढल्याच्या विषादांतून उत्पन्न झाली नसून त्यांच्या उपजत अध्यात्मवादी प्रवृत्तींतूनच ती जन्माला आली आहे. असं असूनहि यांचं वैराग्य महिना पंधरा दिवसांपेक्षां कांहीं अधिक काळ टिकत नाहीं. विठ्ठलाच्या पायापाशीं उर्वरित आयुष्य कंठण्याच्या निर्धारानं जे हे राजश्री पंढरपूरला जातात ते तिथून परत येतांना सुरस ग्रंथमालेच्या कादंबऱ्यांचा लाट खरेदी करूनच बरोबर घेऊन येतात. नाशिकला जाऊन पंचवटीच्या दर्शनाऐवजीं भिकूसा यमासाच्या चिड्या घेऊन येण्यासारखाच प्रकार आहे हा!

कोणत्याहि विषयाकडे वरवर पाहण्याची दृष्टि असली कीं, तिच्यांतून असलीच हास्यास्पदता जन्माला यायची! येरव्हीं, कंठांतल्या कंठांत गाणं गुणगुणाऱ्या त्या तरुणीला मोकळ्या आवाजांत गाऊन दाखविण्याची भीति कशाला वाटली असती?

—'दीपज्योत', दिवाळी अंक १९५०

# फॅन्सी बांगड्या : : : ७

भूगोलसंशोधकाचं धाडस, इतिहाससंशोधकाची चिकाटी आणि विज्ञानसंशोधकाची बुद्धिमत्ता अंगीं असल्याशिवाय कोणत्याहि पुरुषाला आपल्या पत्नीच्या 'वस्तुभांडारां'तून इच्छित वस्तु शोधून काढतां येणं अशक्य आहे अशी त्या दिवशीं माझी खात्री पटली !

सौभाग्यवतीच्या टेबलाच्या खणांत कात्री धुंडतांना माझ्या हाताला बोंचणाऱ्या सुया, पिना अन् आंकडे कोलंबसाच्या साहसाची कल्पना आणून देत होते; अंबाड्याची जाळी, कागदी फुलाच्या वेण्या, रिबन, गंगावन इत्यादींची उलथापालथ इतिहाससंशोधनाच्या कार्यांतला किचकटपणा लक्षांत आणून देत होती; तर लोंकरीच्या लडी, शिवण्याचा दोरा अन् फिती यांची गल्लत न होऊं देणारं अस्मादिकांचं बुद्धिचातुर्य वैज्ञानिकाच्या कार्यकुशलतेची साक्ष पटवीत होतं !

तसं पाहिलं तर या तिघांपेक्षांहि माझी भूमिका अवघड होती यांत शंका नाहीं. हिंदुस्थानचा शोध लावायला निघालेला कोलंबस अमेरिकेलाच हिंदुस्थान समजून तिला तें नांव देऊन मोकळा झाला, बाजीरावाच्या तुमानीला मस्तानीची चोळी समजणारा एखादा विचक्षण पुरुष उद्यां इतिहाससंशोधनाच्या क्षेत्रांत अजरामर ठरेल, आणि पृथ्वीचा वाटोळेपणा सिद्ध करणाऱ्या शास्त्रज्ञाच्या बरोबरीनें ती

चौकोनी ठोकळ्यासारखी असल्याचा सिद्धांत प्रस्थापित करणारा महाभागहि जगाच्या इतिहासांत चिरंजीव ठरल्याशिवाय राहणार नाहीं. पण कात्री म्हणून पत्नीचं नेलकटर उपयोगांत आणायचा मी प्रयत्न केला असता तर—

तर काय ? गणिताप्रमाणं सामान्यज्ञानाच्या परीक्षेंतसुद्धां आपल्या दादांना एकच मार्क मिळत गेला असला पाहिजे असा तर्क बांधायला झालूनं मुळींच कमी केलं नसतं!

पंधरावीस मिनिटं संशोधनांत घालविल्यावर कात्रीऐवजीं एक नवं सत्य मात्र हाताशीं आलं माझ्या! हल्लींच्या युगाला स्त्री-स्वातंत्र्याचं युग म्हणून सनातन्यांनीं उगीचच हांकाटी चालविली आहे. उलट पूर्वीपेक्षांहि आतांचीच स्त्री अधिक गुलाम बनली आहे. ही ताबेदारी पुरुषांची नसेल. स्वतःच्या मनाचीच—सवयींची, फॅशनची—गुलामगिरी पत्करण्यांत.हल्लींच्या कोणत्याहि स्त्रीला भूषण वाटत असतं. माझ्या पत्नीच्या टेबलाच्या खणांतच पहा ना! पांचसहा प्रकारचे बांगड्यांचें जोड, दोनचार प्रकारचीं कर्णभूषणं—

छे! छे! भर्तृहरि या शतकांत जन्माला आला असता तर त्यानं ' श्रोतृं श्रुतेनैव न कुंडलेन । दानेन पाणिर्नतु कंकणेन ।।' या स्वतःच्या काव्यंचरणाच्या प्रती छापवून घेऊन घरोघर मोफत वाटल्या असत्या, असा मनांत विचार येऊन मी स्वतःशींच हंसलों.

पण दुसऱ्याच क्षणीं मला वाटलं, आपली ही मीमांसा कुठं तरी चुकते आहे! बायकांना काय किंवा पुरुषांना काय, फॅशनच्या गुलाम गिरीपेक्षां जवळ असलेल्या वस्तूबद्दलचा असंतोषच नव्या नव्या जिनसांचा संग्रह करायला भाग पाडीत नाहीं का ? कळूं लागतं तेव्हांपासून मनुष्य या वृत्तीचा अंगीकार करीत असतो.

पण ही वृत्ति गैर आहे असं मात्र मला वाटत नाहीं.उलट मनुष्य· जातीच्या आजपर्यंतच्या विकासाला ही असंतुष्टताच कारणीभूत झाली आहे असं अनेक उदाहरणांवरून सिद्ध करून देतां येईल. कवि,

तत्त्वज्ञ, राजकारणधुरंधर या साऱ्या पुरुषांनीं आपापल्या परिस्थितींतच समाधान मानलं असतं तर आज जगाची जेवढी प्रगति झालेली आपणाला दिसून येत आहे, त्याच्या शतांशानेंहि ती आढळून आली नसती. नवीं तत्त्वं, नव्या समाजरचना, नवे शोध इत्यादींच्या मुळाशीं हा असंतोषच असतो हें विसरून चालणार नाहीं. 'यशोविद्या समुत्थानमसंतोषः श्रियंप्रति ।' असा व्यासांनीं युधिष्ठिराला उपदेश केला तो उगीचच का ? 'संतोषो वै श्रियं हन्ति' असा आपल्या पुत्राला इषारा देणाऱ्या विदुलेनेंहि किती निःसंदिग्धपणें असंतोषाचं महत्त्व सुचविलं आहे तें पहा ! लोकमान्यांनीं 'गीतारहस्या' च्या एका प्रकरणांत असलीं अनेक उदाहरणं देऊन असंतोषाची महति सिद्ध केली आहे. 'It is better to be a man dissatisfied than to be a pig satisfied' हें त्यांनीं उध्दृत केलेलं एका पाश्चात्य तत्त्ववेत्त्याचं वचन मला मोठं मार्मिक वाटतं. पण खुद्द रहस्यकारांचं जीवितकार्यहि हेंच तत्त्व आपल्या मनावर ठसवीत नाहीं का ? हिंदी जनतेच्या मनांत परकीय सत्तेविषयीं चीड, प्रक्षोभ उत्पन्न करण्याचं महत्कार्य त्यांनीं केलं म्हणूनच ना त्यांना 'राजकीय असंतोषाचे जनक' अशी पदवी बहाल करण्यांत आली ! राजकारणाप्रमाणंच तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतहि लोकमान्य असंतुष्ट होते म्हणूनच ना त्यांना भगवद्गीतेच्या आधारानं कर्मयोगाचा नवा सिद्धांत प्रस्थापित करतां आला ?

आदर्श समाजव्यवस्थेचीं चित्रं रंगविणारे आरिस्टॉटल, प्लेटो, मूर इत्यादि तत्त्ववेत्ते; महर्षि कार्ल मार्क्स, लेनिन इत्यादि समाजशास्त्रज्ञ; किंवा टॉलस्टॉय, म. गांधी इत्यादि साधुपुरुष या साऱ्या पुरुषोत्तमांच्या अंतःकरणाचा कोपरान् कोपरा असंतोषानं व्यापला होता, म्हणूनच त्यांतून दिव्य वैचारिकता, दिव्य कार्यप्रणाली जन्माला आल्या ! जगांतल्या पहिल्यावहिल्या काव्याचा प्रथमचरण छंदोबद्ध होऊन प्रकट झाला तोसुद्धां आदि कवीच्या विकल, प्रक्षुब्ध मनःस्थितींतूनच !

सारांश, असला दिव्य, महान् असंतोष ( Divine discontentment ) हा वैयक्तिक वा सामुदायिक जीवनाच्या उत्कर्षाला आजपर्यंत हातभारच लावीत आला आहे. तुम्हां-आम्हां सामान्य माणसांचा असंतोष क्षुल्लक स्वरूपाचा, म्हणून त्यांतून निर्माण होणारे आचार-विचारहि क्षुल्लकच ! चाळींतले गंगाधरराव मुलांबाळांवर कडकडून तुटून पडल्यावर फार तर शेजारीपाजारी आपापल्या खोलीबाहेर डोकावून पहातील अन् आपआपसांत कुजबुजतील, एखाद्या होतकरू लेखकाला लघुकथेसाठीं विषय सांपडल्याचं समाधान होईल; पण प्रलयंकर महेश्वराच्या तृतीय नेत्रांतून बाहेर पडणाऱ्या क्रोधाच्या स्फुल्लिंगांत, त्रिशूळाच्या खणखणाटांत नि दुमदुमणाऱ्या डमरुध्वनींत विश्वाच्या पुनर्रचनेसाठीं आवश्यक असलेल्या महान् शक्तीला आवाहन झालेलं असतं ! अन् मग त्या भव्य प्रसंगावर महाकाव्यांची उभारणी करण्यासाठीं लोकोत्तर कवींच्या प्रतिभेला स्फुरण चढतं !

क्षुल्लक कारणावरून आईबापांशीं भांडून घरांतून बाहेर पडलेलं एखादं शाळकरी पोर फार तर मुंबईचं हॉटेल, नाहीं तर कोल्हापूरचा स्टुडिओ गांठील; पण अढळ ब्रह्मपदाची प्राप्ति करून द्यायला ध्रुवासारख्याची अलौकिक असंतुष्टताच हवी ! शेजाऱ्याशेजाऱ्यांच्या भांडणांत परस्परांना चौदावं रत्न दाखवण्याची नुसती भाषाच आपल्या कानांवर येते; लक्ष्मीकौस्तुभादि खरोखरीच्या चौदा रत्नांच्या निर्मितीसाठीं देव-दानवांचा प्रचंड संघर्षच घडून यायला हवा !

सारांश, प्रत्येकजण आपापल्या परीनं मनांतला असंतोष व्यक्त करण्यासाठीं अहोरात्र धडपडत असतो. मोठ्यांच्या असंतोषांत नवनिर्मितीच्या प्रतिज्ञाकंकणाचं आपणाला मोहक दर्शन घडतं. लहानांचे असंतोष म्हणजे नुसतीं कांकणं—माझ्या पत्नीच्या टेबलाच्या खणांत मला आढळून आल्या तशा तऱ्हेतऱ्हेच्या फॅन्सी बांगड्या—असतात !...फॅशनच्या हव्यासाशिवाय दुसरी कोणती महान् अनुभूति त्यांत गवसणार ?

—' हंस ', जानेवारी १९५१

# नटीचा अभिप्राय ! : : : ८

धोबी तलावाच्या ट्रॅमच्या नाक्यावर कांहीं टॉयलेट सावणांच्या जाहिराती लावल्या आहेत. ट्रॅममधून अगर पायीं जाणाऱ्या येणाऱ्यांचं इटकून लक्ष वेधलं जाईल, अशा आकर्षक रीतीनं अन् भडकपणानं त्या विज्ञापनाची योजना केलेली आहे. मधुबाला, रेहाना, नरगिस इत्यादि लोकप्रिय नटींच्या रंगीत, मोहक फोटोसोबत त्यांना आवडणाऱ्या साबणांचीं चित्रं छापून, या सावणामुळंच आपण आपली अंगकांति इतकी सतेज अन् तुकतुकीत राखूं शकलों असा त्यांच्याकडून अभिप्राय ध्वनित केलेला आहे.

टाईम्स, लोकमान्य, लोकसत्ता यांसारख्या प्रतिष्ठित वृत्तपत्रांतूनहि सुप्रसिद्ध सिनेतारकांचीं छायाचित्रं त्यांच्या आवडत्या साबणाविषयींच्या प्रशस्तिपत्रांसह प्रकाशित झालेलीं तुम्ही पाहिलीं असतीलच.

हे सारे अभिप्राय नि प्रशस्तिपत्रं पाहतांना माझ्या मनांत राहून राहून एकच प्रश्न डोकावत असतो. विशिष्ट साबणांचा चांगुलपणा इतक्या अधिकारवाणीनं जगजाहीर करणाऱ्या या सिनेमानटींनीं रसायनशास्त्राचा केव्हां अभ्यास केला ? त्वचा स्वच्छ नि मृदु राखायला साबणाच्या ठिकाणीं कोणते गुणधर्म आवश्यक आहेत हें कळा-

यला सौंदर्यापेक्षां सायन्सशीं अन् स्टुडिओपेक्षां लॅबोरेटरीशींच अधिक संबंध असणं आवश्यक नाहीं का ? ' सर्वे गुणा सुंदरमाश्रयन्ते ' अशी एका जुन्या सुभाषिताची नवी सुधारलेली आवृत्ति रूढ करण्याचा या साबणाच्या कारखानदारांचा बेत दिसतो आहे, दुसरं काय !

पण सिनेमा नटींना सर्वज्ञतेचं शिफारसपत्र बहाल करणाऱ्या साबणाच्या कारखानदारांना काय म्हणून हंसावं ? एखाद्या व्यक्तीनं विशिष्ट क्षेत्रांत प्रगति केल्याबरोबर तिच्या ठिकाणीं ' कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्' सामर्थ्य उत्पन्न झाल्याचा विश्वास बाळगणारे तुम्ही आम्ही सर्वचजण साबणाची जाहिरात करणाऱ्या कारखानदाराचे सख्खे भाऊ शोभतों !

राजकारणांत मान्यता पावलेल्या व्यक्तींच्या गळ्यांत साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ टाकतांना, अथवा कादंबऱ्या लिहिण्यांत गढून गेलेल्या वाङ्मयभक्ताच्या खांद्यावर संयुक्त-महाराष्ट्राच्या प्रचाराची धुरा ठेवतांना किंवा संगीत अधिवेशनाचं नेतृत्व एखाद्या वैद्यराजाकडे सोंपवितांना आपण मनुष्याच्या कर्तृत्व-शक्तीविषयीं फाजील विश्वास बाळगीत नाहीं, तर काय ?

राजकारण, वाङ्मय, संगीत इत्यादि विषयाचे प्रांत परस्परांपासून अगदीं भिन्न असून त्यांच्यांत चीनच्या भिंतीसारखी अजस्र तटबंदी उभी आहे असं मला मुळींच सुचवायचं नाहीं. उलट मानवी शरीराच्या अवयवाप्रमाणंच त्यांच्यांत एकजिनसीपणाचं तत्त्व भरलं आहे, हें मी एकदम कबूल करतों. पण साऱ्या अवयवांतलं ' एकत्व ' मान्य करूनहि प्रत्येकाचं स्वतंत्र अस्तित्व अन् वैशिष्ट्य आपण मान्य करतोंच कीं नाहीं ? गुलाबांच्या फुलाचा आस्वाद कानांना घेतां यावा आणि संगीत कलेचा आनंद नाकालाहि लुटतां यावा, असा आपण कुठं आग्रह धरतों ! पण अवयवांच्या अधिकाराच्या बाबतींतलं आपलं हें समजूतदारपणाचं धोरण जीवनाच्या इतर क्षेत्रांच्या बाबतींत साफ सुटतं अन् मग त्यांतून अनेक आपत्ति उद्भवतात.

गेल्या दहा पंधरा वर्षांपूर्वीचे महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे वृत्तान्त वाचा अन् अलीकडे राजकीय क्षेत्रांत प्रसिद्धि पावलेल्या व्यक्तींच्या अध्यक्षपदांखालीं भरलेलीं संमेलनं पहा. स्थायी भाव, रसव्यवस्था, अलंकारादि साहित्याविषयक मूलभूत तत्त्वांवर झालेल्या कुठं त्या उद्बोधक चर्चा अन् सर्वोदय पक्ष, समाजवाद, रचनात्मक कार्यक्रम इत्यादि आगंतुक, तात्कालिक विषयांवर झालेल्या कुठं अलिकडच्या चार्वितचर्वणा !

उत्तर हिंदुस्थानांत एका प्रसिद्ध वैद्यराजाच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या संगीत परिषदेचं वृत्त नुकतंच माझ्या वाचनांत आलं आहे. प्रस्तुत परिषदेंत संगीतशास्त्रविषयक मुद्यांचा उहापोह बाजूला राहून कोणत्या रोगावर कोणत्या रागाची योजना गुणकारी ठरते, कोणत्या तानक्रियेमुळं फुप्फुसांची कार्यक्षमता अधिक वाढते, कशा प्रकारें स्वर लावला असतां गळ्यांतल्या गांठी ( टॉनासिल्स ) आपोआप जिरून जातात वगैरे प्रश्नांवर खल करण्यांत अध्यक्षमहाशय शेवटपर्यंत गढून गेले होते.

शाळाकॉलेजांचीं संमेलनं, इमारतींचे कोनशिलासमारंभ, थोरथोर व्यक्तींचे स्मृतिदिन, १५ ऑगस्ट अथवा २६ जानेवारीसारखे स्वातंत्र्योत्सव इत्यादि प्रसंगीं अनधिकारी व्यक्तींना नेतृपद दिल्यानें प्रसंगाच्या औचित्याची कशी विल्हेवाट लागते हें अनेक वेळां मी पाहिलं आहे.

विद्यार्थीजीवनांतील खेळकर, स्वच्छंदी वृत्तीशीं तादात्म्य न पावूं शकणाऱ्या, त्यांच्या निर्भय, आनंदी स्वभावाचं मनापासून स्वागत न करतां येणाऱ्या एका वेदाभ्यासजड, निर्विकार चेहऱ्याच्या शास्त्रीबोवास एका शालेय स्नेहसंमेलनाचं अध्यक्षपद देण्यांत आलं होतं. त्या प्रसंगीं विद्यार्थ्यांनीं 'संशयकल्लोळ' नाटकाचा प्रयोग करून दाखविला होता. सबंध प्रयोगांत शास्त्रीबुवांनीं फक्त एकाच पदाच्या वेळीं आपल्या काठीनं ठेका धरला होता. तें पद म्हणजे नाटकाच्या

आरंभीं रंगभूमीवर प्रवेश करणाऱ्या दाढीजटावाल्या साधूच्या तोंडचं! 'संशयवृत्तीच्या अहितकारकपणाचं इतकं रसाळ, परिणामकारक वर्णन साधूनं केल्यावर तिचा अनर्थ दाखविणाऱ्या प्रयोगाची आवश्यकताच कुठं उरली ?' असा शास्त्रीबुवांना प्रश्न पडला असल्याचं त्यांच्या चर्येवरून दिसून येत होतं.

कुठल्याशा संस्थानिकाची एक आख्यायिका सांगतात ना! एका फुटबॉलच्या मॅचसाठीं खास निमंत्रणावरून सदरहू सरकारस्वारी उपस्थित राहिली होती. मॅच सुरू झाली तेव्हां राजेसाहेबांना प्रश्न पडला, जमिनींत रोवलेल्या दोन खांबांमधून हातांनीं चेंडू फेकून जिवाचा इतका आटापिटा कशासाठीं करीत आहेत हे लोक ?

राणीसाहेबांना पडलेला प्रश्न याहीपेक्षां मजेदार होता. त्यांना वाटत होतं, येवढा खटाटोप करून दोन खांबांतून चेंडू फेकून असं काय मिळविलं या खेळाडूंनीं ?

शास्त्रीबुवांचं 'संशयकल्लोळाचं' रसग्रहण फुटबॉलच्या खेळावरील या दोन अभिप्रायांच्या जातीचंच नव्हतं का ?

शिवजयंतीच्या प्रसंगीं शिवाजीमहाराजांच्या राजनीतीचीं सामभेदादि स्वरूपं, त्यांचं व्यवहारचातुर्य, विशुद्ध चारित्र्य, धर्मनिष्ठा, आस्तिक्यबुद्धि इत्यादि मुद्द्यांना बगल देऊन सूतकताई, ग्रामोद्योग वगैरे अप्रस्तुत विषयांवर झोडलीं जाणारीं प्रवचनं; रस्ता, विहीर अगर रुग्णालय यांसारख्या सार्वजनिक कामाच्या उद्घाटनप्रसंगीं शमदमादि नैतिक गुणांवर केलीं जाणारीं भाष्यं अगर कारखान्याच्या उद्घाटनप्रसंगीं होणारी कलेची मीमांसा, हे सारे चमत्कार अधिकाराबाहेरच्या क्षेत्रांत पदार्पण केल्यानं जन्माला येतात यांत मुळींच शंका नाहीं. थोड्याच दिवसांपूर्वीं देशभर साजरा झालेला वनमहोत्सव अशापैकींच एक महान् चमत्कार होता. जमिनीचा कस, प्रादेशिक हवामान इत्यादि गोष्टींचा विचार करून मगच वृक्षारोपणाचं कार्य हातीं घ्यावयास नको का! अन् वाटेल त्या सोम्यागोम्याला वनस्पतिशास्त्र सहज समजूं

शकेल इतकं का तें उथळ स्वरूपाचं आहे ! ‘ दिसली जमीन कीं लाव झाड ’ अशा प्रकारच्या उपक्रमाला कोणतं ‘ फळ ’ लागणार होतं हें सांगायला भविष्यवेत्त्याची मुळींच आवश्यकता नव्हती. लाखों रुपयांचा चुराडा होऊन शेंकडा वीस झाडंहि जगूं शकलीं नाहींत, हा आधिकृत रिपोर्ट मीं वाचला तेव्हां आपण सारेचजण एका-पेक्षां अनेक अर्थांनीं ‘ अरण्यपंडित ’ असल्याची माझी खात्री पटली !

आज आपल्या देशांत असल्या चमत्कारांचं पेंव फुटलं आहे कालच्या-शेअर बाजारांतले दलाल अन् सराफ कट्ट्यावरले सटोडिये आजच्या राजकारणांतले ऋत्विज नि अध्वर्यु बनले आहेत; कालचे भांडवलवाले आज साधुत्वाची पताका फडकवीत आहेत; साक्षी-दारांना पढविणारे वकील सत्याचे संदेश देत आहेत; खोटे दस्तऐवज लिहिणारे उमेदवार सांस्कृतिक मूल्याची पोपटपंची करीत आहेत; प्रिव्ही कौन्सिलपर्यंत इस्टेटीचं भांडण लढविणारे पक्षकार समतेचा अन् विश्वबंधुत्वाचा पुरस्कार करीत आहेत !

अन् हें सारं तटस्थ वृत्तीनं, निर्विकार चित्तानं आम्ही ऐकत आहोंत, पहात आहोंत, चालूं देत आहोंत. क्षात्रधर्माचा विसर पड-लेल्या वेनराजाला सिंहासनावरून खालीं ओढायला तेजस्वी ब्राह्मणांची परंपरा हयात होती; पण आज आपण सर्वचजण शाळकरी पोराप्रमाणें, देवळांतल्या आजीबाईप्रमाणं, कळपांतल्या मेंढरांप्रमाणं होयबा बनलों आहोंत. जें जें कानांवर येईल, जें जें दृष्टीस पडेल तें तें सारं प्रमाण मानण्याइतकी आमची बुद्धि मंद, दुबळी बनली आहे.

कोणी माकडांविरुद्ध मोहीम काढायला सांगितलं कीं बसला त्यावर आमचा विश्वास. देशाच्या उन्नतीसाठीं संततिनियमनाची आवश्यकता आहे असं कुणी प्रतिपादन करूं लागला कीं, दिला आम्हीं त्याच्या मताला पाठिंबा ! दुधाचीं झाडं परदेशाहून आणून लावण्याची कल्पना कुणाच्या मनांत आली कीं, केलं आम्हीं त्याच्या या कल्प-नेचं कोडकौतुक. राम चरित्र्यसंपन्न नव्हता अन् सीतेचंहि शील संश-

यास्पद होतं असा एकाद्यानं जांवईशोध लावला कीं, डोलवलीच आम्हीं संमतिदर्शक मान ! भाषावार प्रांतरचनेचं तत्त्व संकुचित असल्याचा एखाद्याला साक्षात्कार झाला कीं, माजवलेच आम्हीं त्याचे देव्हारे. खुळचट मतं, अशास्त्रीय सिद्धांत, खोटे संकेत आणि स्वार्थी निर्णय आमच्या माथीं लादणाऱ्यांच्या पात्रापात्रतेची आम्ही चुकूनहि चौकशी करीत नाहीं, एका शब्दानंहि शंका घेत नाहीं !

आणि मग जिथं राणा प्रतापाच्या देशभक्तीवर तोंडसुख घेणाऱ्याच्या पुरुषार्थाची खोली तपासली जात नाहीं, शिवबांना नि लोकमान्य टिळकांना अराष्ट्रीय ठरविणाऱ्यांच्या आत्म्यांची उंची मोजली जात नाहीं, तिथं साबणावर अभिप्राय देणाऱ्या अभिनेत्रीच्या योग्यायोग्यतेची शहानिशा कशाला करायला हवी ?

–' महाराष्ट्र '; पुणें दिवाळी अंक १९५१

# मोडका बाजार : : : १

" ऐकलंत का ? आपले चिरंजीव अन् लेकबाई दोघंहि डोक्यावर चढून बसूं पाहताहेत..."

" बसूं दे " पत्नीची तक्रार पुरती ऐकून घेण्यापूर्वीच मी हंसत म्हटलं, " मुलं म्हणजे फुलं असं म्हणतात ना ? फुलं देवांच्या डोक्यावर चढून बसतात. मुलं आपल्या मातृपितृदेवतांच्या डोक्यावर बसलीं तर त्यांत कोणतं नवल ? "

" पुढें डोईजड झालीं म्हणजे कळेल मग..."

" तर तर ! अमेरिकेंतल्या कोणत्याशा सरोवरांत शेर शेर वजनाचीं कमळं उमलतात म्हणतात. त्यांच्या जातीचीं आहेत म्हणायचीं हीं..."

" लढवा हव्या तशा कल्पना ! " सौभाग्यवती अधिकच चिडून म्हणाली. " अमेरिकेंतलीं कमळं ठरताहेत कीं गुलबकावलीचीं फुलं, तें पुढें डोळे उघडले म्हणजे दिसेलच ! हें पाहिलंत का ? "

असं म्हणून तिनं पत्त्यांचा डाव, बॅटरी, फाउन्टन पेन, फुटबॉल इत्यादि पांच सहा वस्तु माझ्या पुढ्यांत आणून ठेवल्या. शालूनं आणि दिलीपनं मिळून त्या जुन्या बाजारांत खरेदी केल्या असून त्यांपैकीं एकहि वस्तु कामाची नसल्याची सौभाग्यवतीची तक्रार

होती. पत्यांच्या जोडात आठ दहा पानें कमी होतीं, बॅटरींत बल्बचा पत्ता नव्हता, फाउन्टन पेनला कॅप नव्हती. सारांश, युद्धांत एकाद्-दुसरा अवयव गमावून मायदेशीं परतलेल्या सैनिकांप्रमाणं बहुतेक वस्तूंची अवस्था झालेली दिसत होती !

तसं पाहिलं तर मध्यम वर्गातल्या लोकांचा जुना बाजार म्हणजे मीनाबाजारच म्हटला पाहिजे. आपल्या पुत्राबरोबर मीनाबाजारांतून चांदण्या रात्रीं रमतगमत फिरतांना अकबरला जो आनंद वाटला असेल, तोच आनंद मध्यम वर्गातल्या माणसांना आपल्या मित्राबरोबर जुन्या बाजारांतून भटकतांना होत असतो. उपभुक्त सौंदर्याच्या बाजार-पेठेंत केवळ दर्शनसुखावरच अकबर अन् सलीमचं समाधान झालं किंवा नाहीं हें मला ठाऊक नाहीं; पण सर्वसामान्य माणसानं मोडक्या बाजारांत साउंड बॉक्स नसलेला ग्रामोफोन, विनभात्याची हार्मोनियम, किंवा तीन पायांची खुर्ची विकत घेण्याचा मोह कटाक्षानं टाळून त्यांच्या क्षणिक दर्शनांतच सुख मानायला हवं, असं मला अगदीं मनापासून वाटतं. डोंगराप्रमाणं जुना बाजारहि दुरूनच पाहण्याच्या लायकीचा असतो हेंच खरं ! जुना बाजारच कशाला ? अर्धवट सत्यें अथवा अपूर्ण सिद्धांत यांचा स्वीकार करण्यापूर्वींहि मनुष्यानं हाच विवेक दाखवायला हवा. आज जो तो गिऱ्हाइकांना बनवून अर्धीं मुर्धीं सत्यं त्यांच्या पदरांत बांधण्याची शिकस्त करूं पहात आहे.

एखाद्या गुन्हेगाराला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊन त्यानं अश्रु ढाळले कीं आमच्यांतलीं भूतदयावादी ढेकळं पार विरघळून जातात अन् तुरुंगांच्या भिंती पाडून टाकण्याची भाषा बोलूं लागतात. मानवी मनोव्यापाराच्या अथवा क्रियेच्या मुळाशीं सुप्त लैंगिक प्रेरणा असल्याचं एखाद्यानं विधान केलं कीं, आम्ही मार्केटमधील खरेदीपासून तों स्मशानांतल्या दहनविधीपर्यंत जीवनांतल्या प्रत्येक कृतीचा लैंगिकतेशीं संबंध जोडून मोकळे होतों.

अर्थ हा जीवनाचा पाया आहे असा एखाद्या महर्षीला साक्षात्कार झाला कीं आम्हीहि डोळे मिटून त्याच मंत्राचा जप करीत बसतों !

साहित्य, राजकारण, अध्यापनादि क्षेत्रांत तर असल्या अर्धसत्यांचं पेंव फुटलं आहे सध्यां. एखाद्या पाश्चात्य लेखकानं कथेच्या शेवटीं अनपेक्षित कलाटणी दिली कीं अपेक्षाभंग हेंच कथेचें अनन्यसाधारण गमक मानण्याकडे आमची प्रवृत्ति झुकते ! पण मार्मिक श्रोता, गायकानं अनपेक्षित स्वर लावला असतां विस्मयचकित होतो, तसा अपेक्षित क्षणीं समेवर आल्यानं आनंदितहि होतो, हें मैफलींतलं सत्य कथेच्या तंत्राच्या बाबतींतहि लागू करण्यास मुळींच हरकत असूं नये !

मराठी रंगभूमीवर लादली जात असलेली एक अंकी, एक प्रवेशी नाट्यतंत्राची कल्पनाहि मला अशीच एकांगीपणाच्या दोषानं डागळल्यासारखी वाटते. अनेक अंक नि प्रवेश असूनहि नाट्यवस्तूंतील स्थल, काल नि प्रसंगांची एकता ( Unity ) साधणारीं शाकुंतल, मृच्छकटिक, सौभद्र, स्वयंवर इत्यादीसारखीं कितीतरी नाटकं दाखवितां येतील. उलट, आधुनिक नेपथ्यरचनेचं तंत्र कसोशीनं सांभाळूनहि नाट्यवस्तूंचा चिचका उडविणारे हल्लीचे कांहीं नाट्यप्रयोग पाहिले म्हणजे एक अंकी, एक प्रवेशी नाटकाविषयींच्या अर्धवट सिद्धांताऐवजीं ' नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधकम् । ' ही कविकुलगुरुनं केलेली नाट्यविषयक मीमांसाच मार्मिक अन् समर्पक वाटूं लागते.

वाङ्मयांतील वास्तववादासंबंधींच्या मतप्रणालीला अबाधित सिद्धांताचं स्वरूप देतांनाहि हीच घिसाडघाई आमच्या हातून होत आहे. वास्तववादी वाङ्मयाइतकीच अद्‌भुतरम्य, ध्येयवादी, कल्पनाप्रचुर इत्यादि वाङ्मयप्रकारांची बूज राखणारे लक्षावधि वाचक या जगांत आहेत. त्यांच्या आवडीनिवडींची काय वाट ? आणि त्यांची ही

आवड वाङ्मयीन अभिरुचीला विघातक ठरल्याची जोंपर्यंत इतिहास साक्ष देत नाहीं, तोंपर्यंत वास्तववादात्रिषयींचा हा सिद्धांत अपूर्ण म्हणूनच समजावयास नको का ? रामायण-महाभारतांतल्या अद्भुत-रम्य, आदर्शवादी कथांचीं पारायणं करणाऱ्या आपल्या पूर्वजांना साहित्याचं सामर्थ्य वा सौंदर्य आकलन होऊं शकलं नाहीं असं का आपण म्हणणार ?

मानसशास्त्राच्या पायावर उभारल्या जाणाऱ्या आधुनिक शिक्षण-शास्त्रांतहि अर्ध्यामुर्ध्या सत्यांनीं कसा धुडगूस घातला आहे तो पहा !

शिक्षणशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्धि पावलेली मॅांटेसरी बाई म्हणते, ' प्रत्यक्ष जीवनापासून दूर नेणाऱ्या केवळ काल्पनिक वा अद्भुत-रम्य कथा बालकांच्या हातीं देऊं नयेत. ' पण विशिष्ट वयोमर्यादेपर्यंत बालकांच्या कल्पनाशक्तीचा यथायोग्य प्रमाणांत विकास घडून आलाच पाहिजे असा विरोधी पक्षांतल्या मानसशास्त्रज्ञांनीं अभिप्राय देऊन मॅांटेसरी बाईच्या सिद्धांतांतला फोलपणा सिद्ध केला आहे !

जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत प्रचलित झालेलीं अगर होऊं पाहणारीं असलीं अर्धवट सत्यं संपूर्ण सत्यं म्हणून समजायचीं, तर मग हत्तीला दोराप्रमाणं किंवा सुपाप्रमाणं समजणाऱ्या सहा आंध-ळ्यांनाच काय म्हणून हंसावं ? ढालीची दृष्टिपथांत येणारी बाजू पाहून तिची दुसरी बाजूहि त्याच धातूनं मढविलेली असली पाहिजे असा तर्क बांधणाऱ्या अन् हातघाईवर येणाऱ्या दोन सैनिकांचीच कशाला कींव करायला हवी ?

अर्धवट ज्ञानावर भिस्त ठेवली असतां कशी आपत्ति ओढवते हें सांगणारी एक मजेदार गोष्ट आठवली मला. एक वैद्यबुवा रोग्यास पहावयास निघाले म्हणजे बरोबर आपल्या चिरंजीवासहि घेत आणि संधि सांपडली कीं व्यवहार-ज्ञानाच्या मात्रेचे त्यांना चार वळसेहि देत. एकदां पोटदुखीनं बेजार झालेल्या एका रोग्याला औषध देण्यासाठीं सदरहु वैद्यमहाशय गेले होते. बरोबर त्यांचे चिरंजीवहि

होतेच. रोग्याच्या खोलींत चौफेर नजर टाकल्याप्रमाणं करून वैद्य-बुवा म्हणाले, "स्वारीनं आंब्याच्या साली खाल्लेल्या दिसतात!"

रोग्यानं तत्काळ वैद्यबुवांचं निदान बरोबर असल्याची कबुली दिली. चिरंजिवांना विलक्षण आश्चर्य वाटलं! रोग्याची नाडी किंवा पोट न पाहतांच त्याच्या व्यथेचं अचूक कारण हुडकून काढणाऱ्या पितृदेवाबद्दल त्यांना विशेषच आदर वाटूं लागला. घरीं जातांना त्यांनीं याबद्दल खुलासा विचारला, तेव्हां वडील म्हणाले, "वेड्या, नुसत्या वैद्यक शास्त्रावरच विसंबून बसून चालत नाहीं. त्याच्या जोडीला तर्कशास्त्राचाहि थोडा आधार घ्यावयास हवा! रोग्याच्या खाटेजवळ आंब्याच्या नुसत्या कोयीच पडल्या होत्या. त्यावरून त्यानं साली खाल्या असाव्यात असा मीं तर्क लढाविला, अन् तो बरोबर ठरला!"

दुसऱ्या एका प्रसंगीं चिरंजीव एकटेच दुसऱ्या एका रोग्याला तपासण्यासाठीं गेले. मस्तकशूळानं रोगी हैराण झाला होता. चिरंजीवांनीं रोग्याच्या खाटेच्या आसपास नजर टाकल्याप्रमाणं करून एकदम निर्णय दिला, "पेशंटनं घोडा खाल्ला असला पाहिजे!"

रोग्याच्या खाटेजवळ पडलेल्या खोगिरावर वैद्यबुवांच्या चिरंजीवांचं तर्कशास्त्र आरूढ झालं होतं.

अर्धवट व्यवहारज्ञानावर भिस्त ठेवणारे वैद्यबुवांचे चिरंजीव, मोडक्या वस्तूंचा संग्रह करणारी आमची शालू अन् अपूर्ण सत्यांचा स्वीकार करणारे तुम्ही आम्ही, यांपैकीं कुणाच्या बुद्धिमत्तेची धार अधिक तीक्ष्ण आहे हें कुणीं कसं सांगावं?

प्रसिद्धि—'अखंड भारत' दिवाळी अंक, १९५१.

# डबक्यांतील कमळें : : १०

वाशीम मोटार स्टँडवर अपेक्षित गाडीची वाट पहातांना जवळच असलेल्या तलावाकडे माझं लक्ष गेलं. कितीतरी वेळ टक लावून त्या जलाशयाकडे पहात होतों मी. तसं म्हटलं तर आमच्या वऱ्हाडच्या वाट्याला आलेलं निसर्गवैभव बेतास बातच होतं. संपत्तीची वाटणी करतांना धूर्त भावानं स्वतःसाठीं दुभती म्हैस ठेवून भोळसर भावाला आंत्रोण द्यावं, तशांतलाच कांहींसा प्रकार इथं घडला होता. गोव्यांतली अगर कोंकणांतली फळाफुलांनीं नटलेली हिरवीगार वनश्री, कड्यावरून कोसळणाऱ्या दुग्धधवल जलधारा, पाण्यानं तुडुंब भरलेलीं तळीं, हें सारं निसर्गाचं ऐश्वर्य पाहतांना रसिकालाच काय, पण पेन्शनरांनाहि वाताऐवजीं काव्यस्फूर्तीचा झटका आल्याशिवाय रहायचा नाहीं !

पण आमच्या विदर्भभूमींतल्या निसर्गावरून काव्य राहोच, साध्या भूगोल विषयाचं सुद्धां ज्ञान होणं दुरापास्त होतं !

लहानपणीं आमच्या शिक्षकांनीं आम्हांला गांवाबाहेरच्या टेकडीवर नेऊन हिमालयाची कल्पना आणून दिली, तेव्हां नेपाळभूतानमधली मंडळी त्या नगाधिराजाच्या शिखरावरून पतंग उडवीत असली पाहिजे असा आमचा साहजिकच ग्रह झाला आणि देशमुखांच्या गढीवरून पठाराची कल्पना आणून दिली, तेव्हां तिबेटमधल्या

वायकांना चुलीसाठीं माती खणून नेण्याकडे पठाराचा उपयोग होत असला पाहिजे अशी आमची समजूत झाली.

मोटारीची वाट पाहतांना ज्या तलावाकडे माझं लक्ष गेलं होतं, तोहि फारसा मोठा नव्हता. तलावाऐवजीं एखाद्या डबक्याची त्याला अवकळा आली होती. तलावाच्या चारी बाजूंना चिरेबंदी पायऱ्या असल्या तरी गेलीं बरींच वर्षे तो वापरांत नसावा हें सहज ध्यानांत येण्याजोगं होतं. पायरीपायरीवर सांचलेले कचऱ्याचे ढीग, हिरव्यागार शेवाळानं आच्छादलेला पाण्याचा पृष्ठभाग, त्यावर तरंगणारे कोळसे, रिकामीं डबडीं आणि लाकडांचे तुकडे, जागजागीं बसलेले डांसांचे पुंजके...हीं सारीं दृश्यं त्याच्या भेसूरतेंत भर घालीत होतीं.

पण माझं लक्ष वेधलं गेलं तें त्या तलावाच्या कोपऱ्यांत उमलू पहात असलेल्या एका कमलपुष्पाकडे !

आजच्या नवकाव्याच्या हंगामांत कमळाला कांद्याइतकीसुद्धां किंमत राहिली नाहीं याची मला पूर्ण कल्पना आहे. चकोरांपेक्षां बेडकांचा अन् चक्रवाकांपेक्षां बोंबील माशांचा भाव आजच्या साहित्यपेठेंत वधारला आहे, हें सत्य मला दृष्टिआड करतां येणं शक्य नाहीं. तें कांहीं असलं तरी मला मात्र कमळ म्हटलं कीं भारतीय संस्कृतीचं अन् काव्याचं मनोज्ञ दर्शन घडल्याचा सुखद भास होतो ! भगवान् विष्णु, लक्ष्मी, सरस्वती, शंकर इत्यादि देवतांना प्रिय असलेल्या नि भगवद्गीताकारापासून तों कविकुलगुरूपर्यंत साऱ्या मेधावींच्या कौतुकाचा विषय झालेल्या त्या निरागस कोमल पुष्पाभोवतीं कसलं तरी 'दैवी' गूढ तेजोवलय प्रकाशत असल्याची सुखसंवेदना होते !

देवादिकांना आसन म्हणून, भक्तांना अर्चनेची सामुग्री म्हणून, कविजनांना उपमानाचा विषय म्हणून, वेदांत्यांना निर्लेप वृत्तीचं प्रतीक म्हणून आणि हठयोग्यांना कुंडलिनी शक्तीच्या जागृतावस्थेंतील मूलाधारचक्रादि षट्चक्राची प्रतिमा म्हणून या चिमुकल्या प्रकृतीविषयीं केवढं आकर्षण वाटत आलं आहे !

उन्मीलनाच्या दिव्य प्रेरणेनं कमळाची पाकळी न् पाकळी प्रस्फुरित झालेली दिसत होती. तें मोहक दृश्य डोळे भरून पाहतांना त्याच्या सभोंवतालच्या दुर्गंधीचा, शेवाळाचा अन् कृमिकीटकांचा अजिबात विसर पडला होता मला. क्षुद्र विचार, स्वार्थी वासना नि अघोरी आकांक्षा यांनीं बुजबुजलेल्या जगांत उदय पावणाऱ्या मानवताधर्मांकडेहि असंच आपणां सर्वांचं लक्ष वेधलं गेलं तर ! विध्वंस, विनाश आणि वंचना यांचं चौफेर भीषण थैमान चालू असतांही मानवताधर्माच्या विकासाचं मोहक दृश्य पाहतांना आपल्या वृत्ति हरखून गेल्याशिवाय राहणार नाहींत ! जीवनविषयक वैफल्यांनीं अन् निराशांनीं उबगलेल्या, किंकर्तव्यमूढ बनलेल्या आपल्या मनाला दिलासा मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं ! येशू ख्रिस्त, सॉक्रेटीस, तुकोबाराय, टॉलस्टॉय, म. गांधी या साऱ्या सत्पुरुषांच्या वाट्याला सामान्य प्रापंचिकापेक्षां काय कमी दुःखभोग आले होते ? त्यांच्या भोंवतालच्या जीवनांत काय कमी घाण, कमी दुर्गंधी माजली होती ? पण त्यामुळं त्यांची जीवननिष्ठा यत्किंचित्‌ही ढळली नाहीं. ' विफल जीवन ! विफल जीवन ! ' म्हणून छाती बडवीत आक्रोश करण्याचा आततायीपणा त्यांच्या हातून घडला नाहीं. उलट अवघा संसार सुखाचा करून तिन्ही लोक आनंदानं भरून टाकण्याची त्यांची प्रतिज्ञा होती. जीवनाकडे श्रद्धेनं, आदरानं, आत्मीयतेनं पाहण्याचा हा दृष्टिकोन आज आपणांपैकीं कितीजणांच्या ठिकाणीं शिल्लक उरला आहे ? नव्या जगाच्या निर्मितीचं कंत्राट स्वतःकडे असल्याची समजूत करून घेणारे एक नवकवि माझ्या परिचयाचे आहेत. मुखचंद्राला मुस्कट अन् केशकलापाला झिपऱ्या म्हणण्यांत अधिक वास्तवता आहे असा त्यांचा दावा आहे अन् याच मुद्यावर ते चरणकमलांना तंगड्या अन् सिंहकटीला कंबरडं म्हणून संबोधण्यांत भूषण मानीत असतात. डोळे म्हटले कीं कमळाऐवजीं खुपऱ्या, चिपडं नि वडस या कविमहाशयांना आठवतात. तरुणीच्या दंतपंक्तीवर कुंद-

कळयांचा आरोप करण्याऐवजीं तिला पायोरिया तर जडला नसेल ना, या संशयानं ते विद्ध होतात. तसं पाहिलं तर अनेक व्याधींचं माहेर-घर असलेल्या मानवी देहाच्या घृणास्पद अवस्थेचं आमच्या संत-मंडळींनीं याहिपेक्षां अधिक स्पष्ट शब्दांत वर्णन केलं आहे. ' रोमें मुळीं किडे भक्षिती ! खांडुक झाल्या किडे पडती ! पोटामध्यें जंत होती । प्रत्यक्ष प्राणियांच्या ॥' हें रामदासांनीं केलेलं वर्णन नवकाव्या-लाहि लाजवण्यासारखं नाहीं का ? पण नादिरशहानं मुंडक्यांचा खच रचला म्हणून कांहीं त्याला कुणी नररुंडमाला धारण करणाऱ्या महे-शाचा मान देत नाहींत. संत कवींनीं देहाच्या ओंगळपणाचं वर्णन केलं खरं; पण त्यांची प्रतिभा तिथंच रमली नाहीं. ऐहिक सुखोपभो-गांत रममाण झालेल्या संसारी जनांना मोक्षधर्माची शिकवण द्यावी; पार्थिव, मर्त्य शरीराचे चोज पुरविण्यापलीकडे कसलीहि इतिकर्तव्यता न मानणाऱ्या भोगपरायण जीवांना आत्म्याच्या उत्थापनाची आवश्य-कता पटवावी म्हणून साक्षात्कारी संतांनीं नरतनूच्या दुबाळिकीचं नि अमंगळपणाचं ठसठशीत चित्र रेखाटलं आहे. वस्तुतः आत्म्याच्या विकासाचं साधन म्हणून मनुष्यजन्माचा विचार करतांना सर्वच संतांनीं मानवी देहाची महती गायिली आहे. शरीर म्हणजे जीव-जंतूंचं आश्रयस्थान असं म्हणणारे समर्थ रामदास, ' या नरदेहाचेनि संबंधें । बहुत पावले उत्तम पदें ॥......म्हणोनि नरदेह श्रेष्ठ । नाना देहांमध्यें वरिष्ठ ॥ ' अशी ग्वाही देतात ती काय उगीचच !

मारामाऱ्या, दंगेधोपे अन् महायुद्धं यांपायीं प्रचंड प्रमाणावर होत असलेल्या मनुष्यसंहाराचे वृत्तांत मी वर्तमानपत्रांत वाचतों तेव्हां भीतीनं गपकन् डोळे मिटतात माझे. एखादं भलं थोरलं रक्ताचं थारोळं......छे ! डबकंच !—पहात असल्याचा चमत्कारिक भास होतो मला. पण दुसऱ्याच क्षणीं तें डबकं शेंकडों कमळांनीं भरून गेल्याचं त्याहूनहि विलक्षण आभासमय दृश्य दृष्टीसमोर तरळूं लागतं.

प्रसिद्धि—' वसुधा ' दिवाळी अंक, १९५१

# कृत्रिम तलाव : : ११

मानवाच्या विकाससंबंधीं डार्विनचं उत्क्रांतिशास्त्र कोणतीहि उपपत्ति लावो; पण मला मात्र कधीं कधीं असं वाटतं, मनुष्यच हळूं हळूं माकडाच्या अवस्थेत प्रवेश करीत आहे. निदान मुंबईच्या स्त्रीपुरुषांकडे पाहिलं कीं मला सुचलेला हा सिद्धांत अधिकच बरोबर असल्याची खात्री पटूं लागते !

धोबी तलावावर भरलेलं औद्योगिक प्रदर्शन पाहण्यासाठीं त्या दिवशीं मी गेलों होतों. तसं पाहिलं तर देशी मालाविषयीं माझं कांहीं फारसं अनुकूल मत नाहीं. स्वदेशीच्या तत्त्वापुढं मी शंभर वेळा मान झुकवीन; पण तपाशिलाशीं गांठ पडली कीं......

गाय ही आपली माता असल्याचं नि तिच्या ठिकाणीं तेहतीस कोटि देवदेवतांचा कुटुंबकबिला गुण्यागोविंदानं नांदत असल्याचं तत्त्व-ज्ञान एखाद्या शाळकरी पोरालासुद्धां सांगतां येतं. पण धार काढायला जवळ गेल्यावर हें पवित्र दैवत डोळे वटारून नि शिंगें रोखून अंगावर येतं, तेव्हां गायीविषयींची तात्त्विक भूमिका डळमळल्या-शिवाय रहात नाहीं !

तत्त्वं आणि थापा खोलांत शिरण्यासाठीं नसतात, हेंच खरं ! स्वदेशीच्या तत्त्वाचंच पहा ना ! देशी कारखान्यांत तयार झालेला

चुन्याच्या भुकटीचा स्नो नि राखेची फेसपावडर बाजारांत विक्री-साठीं आलेली पाहिली कीं निराळ्याच अर्थानं आपले चेहरे गोरेमोरे होतात ! रांगोळीच्या पिठाची पिठीसाखर, उडवायच्या दारूपासून प्यायची दारू अन् वाळलेल्या झेंडूच्या फुलापासून केशर तयार करणाऱ्या आपल्या इकडल्या कारखानदारांचं बुद्धिवैभव पाहून डोळे दिपतात अन् उघडतातहि !

धोबीतलावावरलं प्रदर्शन पहायला मी गेलों होतों तें आमच्याकडे आलेल्या एका पाहुण्यांच्या आग्रहाखातर !

स्वच्छास्वच्छतेचा विचार न करतां नानाविध खाद्यपेयांवर ताव मारणाऱ्या, शेंगादाणे, चणे अन् गंडेऱ्या खातखात प्रदर्शनाच्या आवारांत फिरणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या वर्तनांत बाल्यसुलभ क्रीडाप्रियते-ऐवजीं बालिशपणाचीच अधिक छटा दिसत होती. एका ठिकाणीं तर कृत्रिम तलावांतील वांफेच्या लहानशा बोटींत बसण्यासाठीं प्रेक्षकांची अशी कांहीं झुंबड उडाली होती कीं कांहीं विचारूं नका ! कृत्रिम पहाड चढणाऱ्या छोट्या आगगाडींत बसण्यासाठींहि बरेचजण उत्सुक झालेले दिसत होते आणि त्या चिमुकल्या बोटींत नि गाडींत बसायला मिळाल्यावर त्यांनीं आनंदातिशयानं ओरडायला नि हवेंत रुमाल उडवायला सुरवात केली, तेव्हां मीं मनांत म्हटलं, डार्विन-साहेबांच्या उत्क्रांतिविषयक उपपत्तींत कुठंतरी घोटाळा झाला असावा !

खऱ्याखुऱ्या बोटींत नि गाडींत अनेक वेळां बसण्याची संधि मिळत असूनहि, प्रदर्शनांतल्या त्या कृत्रिम वाहनांत बसण्यासाठीं मुंबईच्या लोकांनीं एवढी उत्कंठा दाखवावी यांत माणुसकीपेक्षां माकडचेष्टेचाच भाग अधिक नव्हता का ?

पण प्रदर्शन पाहून घरीं परततांना मुंबईकरांना दोष देणाऱ्या माझ्या स्वभावाचं मला हसूं आलं. मनुष्यानं सदान्कदा वास्तव-तेला कवटाळून बसावं असा आग्रह धरणंच मुळीं चुकीचं नाहीं का ?

वास्तवतेइतकीच तिच्या आभासाविषयींहि त्याला उपजतच ओढ वाटत असते यांत शंका नाहीं. या आभासांतच एक प्रकारच्या कलात्मकतेचा अन् तज्जन्य आनंदाचा लाभ होतो हेंहि तितकंच खरं! कुठल्याहि कलेला कृत्रिमतेवांचून रमणीयता प्राप्त होणं केवळ अशक्य आहे. ही कृत्रिमता इतरांच्या ध्यानांत न येईल इतकी सफाईची, कलापूर्ण असली म्हणजे झालं! ललित वाङ्मयांतील तंत्राची तरफदारी करतांना ' Art lies in concealing Art ' असं आग्रहानं प्रतिपादन केलं जातं, यांत तरी दुसरं कोणतं रहस्य आहे? कृत्रिमतेचा आश्रय तर घ्यायचा; पण तो अशा खुबीनं कीं इतरांना चुकूनहि तिचा पास लागतां कामा नये! अण्णासाहेब किर्लोस्करांची कण्वमुनींच्या वेषांतली अगर बालगंधर्वांची स्त्रीवेषांतली भूमिका पाहतांना प्रेक्षक देहभान विसरून रंगभूमीवरल्या दृश्याशीं तद्रूप होत ते काय उगीचच? लंकाधिपति रावणमहाराज गंभीरपणें एकेक पाऊल टाकीत रंगभूमीवर प्रवेश करीत, तेव्हां त्यांचीं बाकीचीं नऊ तोंडं पृष्टिपत्रांचीं आहेत हें ठाऊक असूनहि प्रेक्षकांच्या चर्येवरलं गांभीर्य रतिमात्रहि ढळत नसे. आमच्या गांवाकडल्या नाटक मंडळींत भीमसेनाची स्वारी पोपईचा सोट गरगरा फिरवून दुर्योधनाची मांडी विदीर्ण करण्याची प्रतिज्ञा करी, तेव्हां त्याच्या त्या आयुधाच्या कार्यक्षमतेबद्दल शंका घेण्याचं आम्हांला चुकूनहि प्रयोजन वाटत नसे.

पतिराजाजवळ कुड्यांची नाहींतर जॉर्जेटच्या पातळाची मागणी करतांना स्त्रियांना लटक्या रुसव्याचं जें नाटक करावं लागतं त्यामुळंच संसाराला एक प्रकारची शोभा अन् रुचि येत नाहीं का? लटक्या कलहानंतर पतिपत्नींनीं धरलेल्या अबोल्यांतच त्यांच्या अंतःकरणांतील प्रीतीचे मुग्ध संदेश मुखर होत नाहींत का?

जीवनांत शभर टक्के वास्तवता आणूं पाहणाऱ्या निसर्गवाद्यांची मला कींव करावीशी वाटते. अगदीं त्यांचा हा अट्टाहास पाहिला कीं,

मला लहानपणीं वाचलेल्या 'नकल्या व एक गांवंढळ' या गोष्टीची आठवण होते. डुकराच्या ओरडण्याची हुबेहुब नकल करणाऱ्या एका नकल्यावर लोक बेहद्द खुष झालेले पाहून एका गांवंढळ मनुष्यानं डुकराचं खरोखरीचं पिल्लू घोंगडींत लपवून आणलं आणि लोकांसमक्ष त्याला ओरडायला लावलं. पण त्याच्या ह्या खटाटोपाचं कोण कौतुक करणार? पण त्या गांवंढळाला मात्र खऱ्याला सोडून खोट्याची प्रशंसा करणाऱ्या लोकांच्या वृत्तीचं नवल वाटलं!

कलात्मक कृत्रिमतेविषयीं विपर्यस्त समजूत बाळगणाऱ्या खुद्द कलावंताचीच दुसरी एक गोष्ट याहून मजेदार आहे. एक चित्रकार स्वतःच्या कारागिरीची दुसऱ्या एका चित्रकाराजवळ तारीफ करूं लागला. कोणत्यांशा संस्थानिकाची हुबेहुब प्रतिमा चितारल्याबद्दल राजेसाहेबांची स्वारी आपणावर कशी बेहद्द खुष झाली याचं रसभरित वर्णन करून तो सांगूं लागला. पण त्याचं हें वर्णन पुरं होण्यापूर्वीच तो बढाईखोर चित्रकार तुच्छतेनें हंसून म्हणाला, 'ऊंः! त्यांत काय मोठंसं आश्चर्य करण्यासारखं आहे? मी त्या संस्थानिकाची तसबीर रंगविली असती तर चित्रांतल्या चेहऱ्यावर तीन चार दिवसांत दाढीचे खुंटसुद्धा उगवले असते!'

मघाच्या गांवंढळ मनुष्याप्रमाणं अज्ञानानं म्हणा अगर कलेच्या स्वरूपाविषयीं डोळ्यांवर बुद्ध्या अज्ञानाचं कातडं ओढणाऱ्या या बढाईखोर चित्रकाराप्रमाणं म्हणा, कृत्रिमतेंतील वास्तवाच्या मर्यादा लक्षांत न घेणारीं असंख्य माणसंच जगांत चोहोंकडे दृष्टीस पडतात!

कृत्रिमता म्हणजे सत्य नव्हे, सत्याभास आहे, आणि या आभासांतच मानवी जीवनांत 'रस' उत्पन्न करणारी सुप्त शक्ति आहे हें ओळखायला आपण शिकलं पाहिजे! सत्याभासांतली रसवत्ता अन् कलात्मकता ध्यानांत न आल्यामुळेंच मला वाटतं वेदांत्यांनीं संसाराला निःसार, खोटा, नाशवंत अशीं विशेषणं बहाल करून त्यापासून दोन पावलं दूर रहाण्याचा मानवांना उपदेश केला आहे. निर्भेळ

वास्तवतेचा पुरस्कार करणाऱ्या निसर्गवाद्यांपेक्षांहि सारं विश्व खोटं ठरवून त्याच्याकड उपेक्षाबुद्धीनं पाहणाऱ्या या वेदांत्यांची अधिक कींव येते मला !

शंकराचार्यांच्या पाठीमागं एकदां हत्ती लागला तेव्हां ते पळत सुटले. तेव्हां एकजण उपरोधमिश्रित स्वरांत त्यांना म्हणाला, ' आचार्य, जग मिथ्या म्हणून आपण सांगतां ना ! मग हा हत्तीहि मिथ्याच असला पाहिजे ! त्याला एवढं कशाला भ्यायला हवं ? ' यावर शंकराचार्य हंसून म्हणाले, ' अरे वेड्या, हा हत्ती खोटा, तसं माझं पलायनसुद्धा खोटं आहे ! तें तरी खरं आहे म्हणून कोण सांगतो ! '

सृष्टीच्या व्यापारांत आभासात्मकता असली तरी त्यांची मनुष्य-जीवितावर होणारी क्रियाप्रतिक्रिया अनिवार्य आहे, हें आचार्यांनीं मोठ्या चातुर्यानं त्या उत्तरांत सूचित केलं नाहीं का ? म्हणूनच बौद्ध तत्त्वज्ञानांतून निर्माण झालेल्या भोंगळ निवृत्तिवादाच्या आहारीं जाणाऱ्या कर्तव्यशून्य जनतेला आचार्य सावरूं शकले !

प्रदर्शनांतल्या त्या नकली, कृत्रिम तलावांत नौकाविहार करणाऱ्या हौशी स्त्रीपुरुषांच्या क्रीडाप्रियतेचंहि याच शब्दांत समर्थन करतां येईल कीं !

प्रसिद्धि–' रुपेरी दर्या ' दिवाळी, अंक १९५१

# ज्ञानेश्वरांचा रेडिओ! : : १२

बाई, बाटली अन् जुगार या व्यसनत्रयीच्या कचाट्यांतून सुटका होणं कठीण आहे असा जुन्या-नव्या सर्व लोकांनीं एकमतानं निर्वाळा दिला आहे. पण बाईच कशाला? दाढीचे खुंट उपटण्याच्या संवयी-पासूनसुद्धां माणसाला स्वतःची सोडवणूक करून घेतां येत नाहीं हें मीं अनेकांच्या उदाहरणांवरून सहज पटवून देऊं शकेन. दातांनीं नखं कुरतडणं, कोटाच्या गुंड्या उगीचच काढून पुनः लावणं, नाकाचा शेंडा ओढल्यासारखा करणं इत्यादि अनेक क्रिया दिसा-वयाला साध्या असल्या तरी एकदां त्या संवयीच्या झाल्या म्हणजे कुणालाही सहसा विसरतां येत नाहींत हेंच खरं! अनुनयाच्या प्रकरणीं मनोमय कल्पिलेल्या हृदयेश्वरीनं चारचौघांत शिव्या हास-डल्या तरी तिच्यावर प्रीतीचा मुसळधार वर्षाव करण्याचं कॉलेज-कुमारांचं व्रत, जनतेला आश्वासनामागून आश्वासनं देत सुटण्याचं मंत्र्याचं धोरण अथवा लालभाईची वेळीं-अवेळीं मुठी आवळून कंठांतल्या शिरा ताणण्याची खोड, हीं सारीं एका अर्थीं व्यसनंच नव्हेत तर काय! त्यांच्या मगरमिठींत सांपडलेल्यांची तरी कधीं सुटका झालीय्! शिव्या, थापा, भांडणं, फॅशन यासुद्धां माणसांवर कमी अधिक प्रमाणांत वर्चस्व गाजविणाऱ्या संवयी आहेत,

यांत शंका नाहीं ! माझ्या ओळखीच्या एका थापेबाज इसमाला एखाद् दिवशीं थापा मारण्याची संधि मिळाली नाहीं तर त्याच्या पचनाक्रियेंत बिघाड होतो अन् एका फॅशनेबल युवतीला अंबाड्यांत खोवायला मनासारखं फूल मिळालं नाहीं तर डोक्यांत घणाचे घाव घातल्याचा चमत्कारिक भास होतो ! व्यसनाचं यापरतं आणखी कोणतं लक्षण असूं शकेल ?

अशीं लहानसहान चमत्कारिक व्यसनं माझ्याहि ठिकाणीं कांहीं थोडीं थोडकीं नाहींत. हॉटेलांतले तळलेले पदार्थ न खाण्याविषयीं विद्यार्थ्यांना मी अशा कांहीं अधिकारवाणीनं उपदेश करीत असतों कीं त्यांच्या भोळ्याभाबड्या बुद्धीला वाटत असावं, आपले सरहि जन्मल्याबरोबर उगवत्या सूर्यबिंबाचा ग्रास करण्यासाठीं धावून गेले असावेत. पण खरं सांगूं ? मामा काण्यांच्या उपहारगृहांतलं थालीपीठ अथवा तांब्यांच्या हॉटेलांतली मिसळ खाल्ल्याशिवाय एक दिवस सुना जात नाहीं माझा. ' हॉटेलची पायरी चढणं म्हणजे यम-दरबाराची पायरी चढणं होय ' इत्यादि सुभाषितांच्या साहाय्यानं मी छात्रगणाच्या मनावर आरोग्याचं महत्त्व बिंबवण्याचा प्रयत्न करतों. पण पुराणिकाप्रमाणं शिक्षकांचाहि उपदेश इतरांसाठीं असतो हेंच खरं. गप्पा अन् झोंप या दोहोंपायीं निष्कारण दवडलेल्या क्षणांचा मी मनाशीं ज्या ज्या वेळीं हिशेब करतों, त्या त्या वेळीं त्या फुकट घालविलेल्या काळांत दहाबारा हजार पृष्ठं भरतील इतकं वाङ्मय आपल्या हातून लिहून झालं असतं असा पश्चात्तापाचा विचार मनाला चाटून जातो.

गेल्या दोनतीन महिन्यांत आणखी एका नव्या गोष्टीचं मला जबरदस्त व्यसन जडलं आहे. तें म्हणजे रेडियो ऐकत बसण्याचं. तसं पाहिलं तर साडेतीनशें रुपये किंमतीचा रेडियो सेट विकत घेण्याची मला कधीं काळीं बुद्धि होईल असं कधींच वाटलं नव्हंत. रेडियोच काय, कुठल्याहि आधुनिक शोधाविषयीं सामान्यतः मी

उदासीनच होतों. उमरखेडसारख्या संतभूमि म्हणून प्रसिध्द अस-लेल्या क्षेत्रांत आयुष्याचीं बरींच वर्षे घालाविलेल्या माझ्यासारख्या मनुष्यानं यंत्रयुगाचा निषेध करावा हें स्वाभाविकच आहे असा एक वेळ मनांत विचार येतो. पण दुसऱ्याच क्षणीं त्या विचारांतलं वैय्यर्थ्य मनाला पटूं लागतं. अध्यात्माच्या प्रभावाऐवजीं निराळ्याच कारणानं यांत्रिक शोधाबद्दल माझ्या मनांत अढी बसली होती. कोणत्याहि भौतिक शोधाचं अस्सल स्वरूप अन् त्याची उपयुक्तता आम्हां उमरखेडकरांच्या दृष्टीस पडूंच नये असाच नियतीचा शाप होता कीं काय कुणास ठाऊक ! आगगाडी, मोटर, पेट्रोमॅक्स, बोलपट, ग्रामोफोन इत्यादि शोधांचं विकृत, विडंबित स्वरूपच मी लहानपणापासून पहात आलों होतों. खेड्यांतल्या न्हाव्याजवळच्या आरशांत ' गिऱ्हाइकाच्या ' चेहऱ्याचं चमत्कारिक प्रतिबिंब पडावं ना, तशापैकींच त्या शोधांची स्थिति झाली होती !

मध्यप्रांत सरकारनं आमच्या भागांत सुरूं केलेल्या छोटेखानी गाडीबद्दल प्रवाशांचंच काय, आत्महत्या करूं इच्छिणाऱ्याचं सुद्धां फारसं अनुकूल मत नव्हतं ! परलोकचा प्रवास करण्याच्या तयारीनं गाडीपुढें आडवं पडावं, पण पाठ केलेलं भाषण ऐन वेळीं विसरणाऱ्या अवसानघातकी नटाप्रमाणं मध्येंच गाडीचा वेग बंद पडावा असं आजपर्यंत तीन चार वेळां घडलं म्हणतात ! आमच्या गांवच्या ' मुखरे टॉकींत ' आम्हीं पहिला वहिला बोलपट पाहिला, तो भक्त सुदामाच्या फिल्मला दामाजीची फिल्म जोडलेल्या स्वरूपांत ! पुढें ' शिवतांडवांत ' मिठाईचे पेटारे, अत्र्यांच्या ' ब्रह्मचारीं'त हनुमंताचं उड्डाण अथवा ' अयोध्येच्या राजांत ' सिराजउद्दौल्यानं रागारागानें इंग्रजांना पाठविलेला खलिता असे अनेक अतर्क्य चमत्कार उमर-खेडकरांना पहावे लागले.

मैलभर ढकलून फर्लांगभर रखडणाऱ्या आमच्या गांवच्या खोळंबे सर्व्हिसच्या गाड्या, लग्नामुंजीच्या मंडपांत धुराचे अन् जाळाचे लोट

सोडणाऱ्या रोषन बत्तीवाल्याच्या गॅसच्या बत्त्या आणि विंचू चावल्या-प्रमाणं वेळीं-अवेळीं ओरडणारा गुंडाप्पा सावकारांचा ग्रामोफोन, या साऱ्या गोष्टी पाहून यंत्रयुगाबद्दल माणसाच्या मनांत गैरसमज उत्पन्न होणार नाहीं तर काय ?

रेडिओबद्दल माझा प्रतिकूल ग्रह व्हायलाहि असंच मजेदार कारण घडलं होतं. युद्धप्रचारासाठीं सरकारनं गांवोगांव रेडिओ दिले होते. आमच्या गांवच्या वाड्यालाहि त्यांपैकीं एक आला होता. पण ' फट्फट्, टर्रर्र ' या आवाजापलीकडे दुसरा कोणताच शब्द रेडिओंतून आमच्या कानावर आला नाहीं. जर्मनीवर पडणाऱ्या बॉंब गोळ्यांचे हे ध्वनि आहेत अशी रिक्रूटभरतीच्या साहेबांनीं आमची समजूत घालून रेडिओविषयींची आमची श्रद्धा न डळमळूं देण्याचा यत्न केला. रेडिओंतून ' चुंग सुंग शुई ऽ ऽ ऽ ' असे आवाज ऐकूं येऊं लागले, तेव्हां ते रणभूमीवर विव्हळत पडलेल्या जपानी सैनि-कांचे आर्त स्वर असावेत असा स्वतःच्याच हिंमतीवर तर्क बांधण्याचं आम्हीं साहस केलं ! पण नंतर युद्ध संपलं तरी आमच्या गांवच्या रेडिओंतलं फटफट टर्रर्र अन् चुंग सुंग शुईऽऽ थांबण्याचं चिन्ह दिसेना, तेव्हां त्या नव्या शोधाकडे आम्ही साशंकतेनं पाहूं लागलों.

नंतर नोकरीच्या निमित्तानं मी मुंबईला आल्यावर एकापेक्षां एक सरस अन् उत्तम बनावटीच्या रेडियोचे नमुने पाहिले, तेव्हां त्यांच्याविषयींचं माझं पूर्वीचं दूषित मत साफ निवळलं ! रेडिओ हें मनुष्याच्या सर्वांगीण विकासाचं प्रभावी साधन आहे, अशी माझी खात्री झाली. जागतिक घडामोडी, चर्चा, भाषणं, श्रुतिका, संगीत इत्यादि कितीतरी प्रकारांनीं रेडियो आपल्या ज्ञानांत नि मनोविनो-दनांत भर घालीत असतो ! कधीं कधीं माझ्या मनांत असा गम-तीचा विचार येत असतो, हल्लींचं युग लोकशाहीचं असलं तरी ज्याच्या इथं रेडियो आहे तो एका अर्थी बादशहाच समजायला

पाहिजे! रेडियोची कळ फिरवून आपण त्याला ऐटींत म्हणावं, 'हं! काय प्रधानजी, आज काय जगाची हालहवाल आहे?' कीं कांचेच्या कपाटावर नाहींतर स्टुलावर विराजमान झालेल्या या प्रधानजीकडून जगाची सारी महत्त्वाची खबरबात आपणांला मिळूं शकते. उत्तम उत्तम भाषणं ऐकण्याची रेडियोमुळं वारंवार संधि मिळते हा काय थोडा थोडका लाभ समजायचा! कालचंच उदाहरण सांगतों. कुठल्याशा प्राध्यापकाचं दिल्ली केंद्रावरून ललितवाङ्मयाच्या हेतूवर एक लहानसं भाषण झालं. तसं पाहिलं तर त्या विषयावर आजपर्यंत साहित्यिकांनीं आपल्या लेखांतून नि व्याख्यानांतून थोडीथोडकी का चर्चा केली आहे? कलेसाठीं कला या तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या ऑस्करवाईल्डपासून तों मॉमपर्यंत अन् कला ही जीवनाची बटीक होय या मताचा उद्घोष करणाऱ्या टॉलस्टायपासून तों शॉपर्यंत अनेक वाङ्मयविशारदांनीं या विषयाचा परामर्श घेतला आहे. पण फॉर्स्टरच्या विचारांच्या आधारानं प्रस्तुत प्राध्यापक महाशयांनीं आपल्या भाषणाला असा कांहीं नाविन्याचा अन् वैचारिकतेचा उजळा दिला होता, कीं त्यांचं भाषण संपलं तरी बराच वेळ त्यांतले शब्द माझ्या कानांत घुमत राहिले. जीवनांत पदोपदीं विसंगति आढळून येत असतां कलेला त्याच्याशीं सुसंवाद राखतां येणं कठिण आहे. विशिष्ट नियमांनीं बद्ध असलेलं कलेचं स्वरूप अन् व्यापार जीवननिरपेक्ष असण्यांतच तिचं खरं वैशिष्ट्य आहे हा मुद्दा वक्त्यांनीं अतिशय परिणामकारकतेनं नि आत्मविश्वासानं मांडला होता. त्या भाषणांतला शब्दांशब्दांतला आवेश, लयबद्धता, आवाजाच्या कमानीची कमी अधिक उंची इत्यादि वक्तृत्वगुणांची तर माझ्या मनावर अशी कांहीं पकड बसली कीं, कांहीं वर्षांपूर्वीं याच विषयावर ( What is an ultimate end of art? ) हैदराबादच्या निजाम कॉलेजमध्यें प्रि. टर्नर यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या प्रा. फडके यांच्या सुश्राव्य व्याख्यानाची आठवण झाली!

संगीतश्रवणाच्या मुख्य हेतूनं मी रेडियो खरेदी केला तो तर कल्पनेपेक्षांहि सफल होत चालल्याचं दिवसेंदिवस माझ्या प्रत्ययाला येत आहे. नॉब फिरवतांच एखाद्या कसलेल्या गायकाच्या गळ्यांतून श्रुतिमधुर स्वर कानांवर आले कीं अंगावर गार पाण्याचा शत-धारांनीं वर्षाव व्हावा तसा मला आनंद होत असतो. ख्याल, टुंबरी, गजल, लावणी, भावगीतं इत्यादि विविध गायनप्रकार ऐकतांना स्त्री-जीवनाचीं विविध अंगंच ध्वनिमय होऊन प्रतीत होत असल्याचा सुखद आभास होत असतो मला! विलंपदांत मातेच्या सुस्निग्ध ममतेचा प्रत्यय येतो, तर द्रुत चिजेच्या बांधणींत कन्येच्या अल्लड विलोल वृत्तीचा आविष्कार झालेला पहायला मिळतो. टुंबरींत विरह-व्याकुळ युवतीचं कारुण्य जाणवतं, तर तराण्यांत रूपगर्वितेच्या कामुक-तेचा मत्त विलास आढळून येतो!

इतक्या विविध प्रकारांनीं करमणूक करणाऱ्या रेडिओच्या संग-तींत तास तास घालविण्याचा मला कां कंटाळा यावा मग? साऱ्या विश्वाला आपल्या कवेंत घेऊं पाहणाऱ्या या रेडिओचं निरीक्षण करण्यांत घटकान्‌घटका घालविल्या आहेत मी! रेडिओ म्हणजे मानवी बुद्धीनं गाठलेला विकासाचा सर्वांत उच्चांक होय अशी माझी खात्री झाली. खरंच! जगाच्या पाठीवरल्या कुठल्याहि ध्वनिलहरी टिपून घेणारं यंत्र माणसाला शोधून काढतां यावं हा त्याच्या बुद्धिमत्तेचा केवढा विजय म्हणायचा! पण काय असेल तें असो, रेडिओविषयींचा माझा सारा आदर, सारं कुतूहल, सारा विश्वास डळमळूं लागल्याचा मला अलीकडे प्रत्यय येऊं लागला आहे. रेडिओचं संशोधन म्हणजे मानवी बुद्धिमत्तेच्या उत्कर्षाची परम सीमा असं मानतांना केवढ्या अज्ञानमूलक अहंतेची जोपासना केली होती मी! हल्लींच्या रेडिओपेक्षांहि मानवी बुद्धीला थक्क करून सोडणारा विस्मयकारक रेडिओ आपल्या पूर्वजांना शोधून काढतां आला याचा अजिबात विसर पडला होता मला. अनंत अवकाशा-

-तून येणारा अध्यात्माचा संदेश नोंदण्याचं जीवात्म्याच्या ठिकाणीं असलेलं सुप्त सामर्थ्य ज्या पूर्वसूरींना कळलं, त्यांची घोषणा काय सामान्य कोटींतली समजायची ? दिक्कालापलीकडून येणारीं ईश्वराचीं निःश्वसितं जिथं प्रतिध्वनित होतात, अनाहताचा गजर स्पष्ट ऐकूं येतो, सोऽहं हा ध्वनि उठतो, असा आश्चर्यकारक रेडिओ आपल्याजवळ असूनहि आपणाला त्याची जाणीव असूं नये हें केवढं नवल !

'हें असो ते कुंडली । हृदयाआंतु आली । तंव अनाहताचा बोली । चावळे । ' असं त्या दिव्य नादाचं वर्णन करणारे ज्ञानेश्वर किंवा ' हृदयीं अनाहत कमळ । तें अग्निवर्ण द्वादश दळ ॥ ' असं रूपक रचून त्या अलौकिक ध्वनिकल्लोळाची प्रशंसा करणारे मुकुंदराज हे सत्पुरुषच रेडिओचा शोध लावणाऱ्या वैज्ञानिकापेक्षां अधिक श्रेष्ठ, अधिक बुद्धिमान् समजूं नयेत का ? संतांनीं, योग्यांनीं अन् ऋषींनीं शोधून काढलेल्या या ' रेडिओ'वर दूरच्या आवाजाच्या लहरी येत, तशाच या मर्त्य लोकांतले आवाजहि त्यांना ऐकूं येत. पतितांचे निःश्वास, पीडितांचे आर्त स्वर, अबलांचं आक्रंदन, पश्चात्तप्तांचा टाहो हे सारे अवतींभोंवतींच्या वातावरणांत उठणारे नानाविध आवाज त्या महापुरुषांना स्वतःजवळच्या आत्मौपम्य बुद्धीच्या अद्‌भुत ' रेडिओ'च्या योगानंच स्पष्ट ऐकतां आले !

ज्ञानेश्वरादि संतश्रेष्ठांच्या या ' रेडिओ'पुढें विज्ञानेश्वरांच्या रेडिओची काय मातब्बरी वर्णन करावी ?

—प्रसिद्धि, 'अभ्युदय' डिसेंबर १९५१

# अदृश्य कावड : : १३

कुठल्याहि तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं यात्रेच्या वेळीं जायचं म्हणजे तियल्या त्रिगुणात्मक मूर्तींच्या साक्षात्काराऐवजीं बडवे, खिसेकापू अन् कॉलरा या त्रयीच्या तडाख्यांत सांपडायचं हा अनेकांच्या अनुभवावरून मीं ठोकताळा बसविला होता !

असं असूनहि पैठणला नाथषष्ठीला भरणाऱ्या यात्रेसाठीं जाण्याचा विचार गेलीं कित्येक वर्षं माझ्या मनांत घोळत आहे. पैठणच्या त्या पुराणप्रसिद्ध हौदाविषयींचं कुतूहलच मुख्यतः या उत्कंठेच्या मुळाशीं आहे. तसं पाहिलं तर जवळपासच्या देवस्थानांशीं निगडित असलेल्या किती तरी लोकविलक्षण वदंता आजपर्यंत मी ऐकल्या आहेत. पण त्यांच्याविषयीं माझ्या मनाला कधींच फारसं आकर्षण वाटलं नव्हतं. पण पैठणच्या हौदाची ती नवलकारक आख्यायिका ऐकल्यापासून मात्र एकदां तरी तो नजरेखालून घालावा अशी माझ्या अंतःकरणाला ओढ लागली आहे.

तुम्हाला त्या हौदाची हकिकत ठाऊक आहे का ? नाथषष्ठीच्या दिवशीं अनेक भाविक जन त्या हौदांत पाण्याच्या घागरी आणून रिचवितात. असंख्य घडे रिचवूनहि हौद भरत नाहीं. शेवटीं आकस्मिकपणें देवाची अदृश्य कावड येते अन् तो हौद काठोकाठ भरून वाहूं लागतो.

या चमत्काराच्या मुळाशीं कोणता कार्यकारणभाव असेल तो असो; पण मला मात्र तो हौद म्हणजे मानवी जीवनाचं लहानसं प्रतीक असल्याची वारंवार जाणीव होते !

•

पैठणला जमणाऱ्या यात्रेकरूंप्रमाणें आपण सारीं माणसं जीवन-पूर्तीसाठीं–आपापल्या जीविताचा हौद तुडुंब भरण्यासाठीं–परोपरीनं प्रयत्न करीत असतों. शक्तिमान, बुद्धिमान, कलावंत, श्रीमंत इत्यादि साऱ्याजणांची धडपड चालू असते. पण त्यांचं वैय्यक्तिक वा सामुदायिक सामर्थ्य अपुरं पडतं. अदृश्य ईश्वरी साहाय्यावांचून जीवनाचा हौद भरणं शक्य नाहीं हें सत्य ज्यांना उमगलं, त्यांनीं स्वसामर्थ्याविषयीं फाजील विश्वास बाळगण्याचा कधींच आततायी-पणा केला नाहीं. रावण-दुःशासनादिकांनीं केवळ स्वतःच्याच बळा-वर भिस्त ठेऊन आपलं जीवन पूर्ण करण्याचा यत्न केला; पण तें रितंच राहिलं ! हातपाय जोडून स्वस्थ बसणाऱ्या निष्क्रिय जीवांना देव पावत नाहीं, तसा त्याच्यावर निष्ठा ठेवून कार्यरत झालेल्यांना तो साहाय्य केल्यावांचून रहात नाहीं ! भगवंताचं अधिष्ठान असल्या-वांचून कुठल्याहि स्वरूपाचं कार्य अथवा चळवळ यशस्वी होणं शक्य नाहीं अशा अभिप्रायाचा रामदासांनीं निर्वाळा दिला, तो उगीचच का ?

आज ईश्वरी शक्तीला आवाहन केल्यावांचून जो तो व्यष्टि वा समष्टिजीवनाच्या परिपूर्तींचीं स्वप्नचित्रं मनःफलकावर रंगवीत आहे ! सत्तामदानं धुंद झालेल्या राज्यकर्त्यांची निधर्मी राज्य प्रस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा अथवा धर्ममोक्षाला बगल देऊन केवळ अर्थ-कामाच्या आश्रयानं संसाराची सांगता करूं पाहाणाऱ्या प्रापंचिकाची इच्छा हीं सुद्धां स्वप्नचित्रंच म्हटलीं पाहिजेत. असलीं स्वप्नचित्रं रंगविणाऱ्या चितान्यांची आज जगांत दाटी झाली आहे. कुणी सत्तेंत, कुणी बुद्धिमत्तेंत, कुणी संपत्तींत, कुणी रूपांत, तर कुणी कलेंत जीवनाची पूर्णता सामावल्याचं समाधान उराशीं बाळगून स्वतःची वंचना करून घेत आहेत !

या साऱ्यांच्या प्रयत्नांच्या कावडींत ईश्वरी शक्तीची अदृश्य कावड येऊन पडेल तो सुदिन !

—अप्रकाशित

# 'भाजींत भाजी मेथीची–' : : १४

माझ्या एका नवविवाहित मित्राला उखाण्यांत आपल्या पत्नीचं नांव घ्यायला सांगितलं तेव्हां तो म्हणाला, ' भाजींत भाजी मेथीची–'

पण त्याचा उखाणा पुरा होण्यापूर्वीच लग्नमंडपांत जमलेल्या कांहीं नवकाव्याच्या उपासकांनीं एकच गिल्ला केला—' नवा उखाणा पाहिजे ! नवा उखाणा पाहिजे ! '

तेव्हां जात्याच थट्टेखोर असलेल्या माझ्या त्या मित्रानं नांव घेतलं, ' पिपांत पीप ओलं पीप, सुधाकिनीचं नांव घेतों बसा गुपचीप ! '

नव्या उखाण्यासंबंधींचा नवकवींचा आग्रह थट्टेवारीं नेऊन तो विषय विसरलासुद्धां असेल माझा मित्र ! पण त्या दिवशीं घरीं जातांना नवकवींच्या अरसिकतेचं राहून राहून मला नवल वाटत होतं.

मेथींतलं काव्य ज्यांना उमगूं शकत नाहीं ते अरसिकच नव्हेत तर काय ? गुलाबाच्या फुलांइतकंच मेथीच्या भाजींतहि काव्य आहे असं तुम्हाला नाहीं वाटत ?

दिवाळीच्या सुट्टींत मी आपल्या गांवीं गेलों म्हणजे आमच्या मळ्यांतल्या हिरव्यागार, लुसलुशीत मेथीच्या वाफ्यांकडे कितीतरी वेळ टक लावून बघत बसतों नुसता ! त्यांचं सौंदर्य नेत्रसंपुटांत साठवितांना कितीतरी कल्पनातरंग मनांत उसळत असतात. लहानपणीं पऱ्यांच्या गोष्टींत वाचलेल्या पांचूंच्या बेटाची आठवण होते न होते तोंच हलकली लुगडं नेसून हिरव्या बांगड्या भरलेली

न्हाणकरीण दृष्टिसमोर तरळूं लागते आणि त्या दृश्यापाठोपाठ निसर्गाच्या प्रासादांत मखमालीचा मृदुल गालीचा अंथरल्याचा गोड संभ्रम मनाला स्पर्शून जातो.

मानवी संसाराला आज अनेक कवींनीं नि लेखकांनीं निरनिराळ्या उपमा दिल्या आहेत. त्यांपैकीं कुणी मेथीच्या भाजीची उपमा दिली आहे कीं काय हें मला ठाऊक नाहीं. पण ती दिली तर दुसऱ्या कोणत्याहि उपमेपेक्षां अधिक बरोबर लागूं पडेल असं मला वाटतं! मेथीप्रमाणंच संसारांतहि कडवटपणा भरलेला आहे; पण म्हणूनच त्याला एक प्रकारची लज्जत आली आहे!

'स्वर्गातलं अमृत अन् मृत्युलोकांतली मेथी यांपैकीं कोणतं तरी एक स्वीकार' असं मला उद्यां कुणी सांगितलं तर मी तरी मेथीचाच स्वीकार करीन!

कांहींहि सायास न करितां जिथं कल्पवृक्षाच्या छायेंत अमृत प्राशन करायला मिळतं, गंधर्वांचं गायन कानांवर येतं, अप्सरांचं लावण्य न्याहाळायला सापडतं, त्या स्वर्लोकाविषयींच्या कल्पनेंत काव्य असलं तरी मानसशास्त्राचा अभाव आहे असं माझं ठाम मत आहे!

कांहींहि कष्ट न करतां दिवसामागून दिवस आळशाप्रमाणं स्वस्थ बसून घालवायचे; कसलीहि अपेक्षा नाहीं, कोणतीहि आकांक्षा नाहीं; स्पर्धा नाहीं, आशा नाहीं, उत्कंठा नाहीं, ओढ नाहीं, विजयाचा आनंद नाहीं; अशा संथ, निष्क्रिय जीवनक्रमांत कुणाचं तरी मन रमणं शक्य आहे का?

तुकारामाच्या बायकोला मानसशास्त्र अवगत होतं कीं काय कुणास ठाऊक? पण त्याच्या अंतकाळीं त्याला सदेह स्वर्गात न्यायला विमान आलं असतां त्यानं जिजाईला आपल्या बरोबर चलायचा आग्रह केला, तेव्हां त्या माउलीनं त्याला चक्क नकार दिला.

' मी तुमच्याबरोबर स्वर्गात आलें तर माझ्या म्हशीचं बाळतपण करायला तुमच्या इन्द्रलाची आवा येनार हाय काय धावूनश्यानी ! ' असा रोकडा सवाल टाकणाऱ्या जिजाईच्या स्वभावांत फटकळपणाइतकाच वास्तवतेवरील निष्ठेचा आढळ होत नाहीं का आपणाला ?

स्वर्गाकडे तोंड करून अमृताच्या आशेनं जिभल्या चाटणाऱ्या स्वप्नरंजनांत निमग्न झालेल्या कविमंडळीपेक्षां मृत्युलोकांतल्या दुधाच्या धारांवर भिस्त ठेवणारी जिजाई शतपटीनं श्रेष्ठ वाटते मला!

नंदनवनांत आपल्या प्रेयसीबरोबर विहार करणाऱ्या ॲडमला ज्ञानाचं फळ चाखण्याची इच्छा होऊन मृत्युलोकांत यावं लागलं, हा त्याला मिळालेला शाप आहे असं कुणी म्हणणार असतील तर म्हणोत बापडे. पण मी तरी त्याला तें वरदान मिळालं आहे असंच म्हणेन !

पुण्याचा शिलकी साठा संपला म्हणजे मनुष्याची स्वर्गांतून परत पृथ्वीवर रवानगी होते, असा आपल्या पुराणांत संकेत आहे. पण मनुष्याला स्वर्ग मिळाला म्हणजे त्याचं पाप उभं राहिलें असं समजावं, असा नवा संकेत मानसशास्त्राच्या आधारानं रूढ करायला मुळींच प्रत्यवाय असू नये.

सुखःदुख, आशानिराशा, जयपराजय यांच्या आडव्याउभ्या धाग्यांनीं मानवी जीविताचा भव्य पट विणणाऱ्या अज्ञात शक्तीचं करावं तेवढं कौतुक थोडंच आहे !

थोडीशी शिष्टपणाची मर्यादा उल्लंघिल्याचा दोष पत्करून हीच कल्पना कामशास्त्राच्या परिभाषेंत मांडायची झाली तर असं म्हणतां येईल, कामिनीच्या दंतक्षतांत जी अनिर्वाच्य सुखसंवेदना असते तीच इहलोकींच्या जीवनसंग्रामांत अनुस्यूत आहे !

मृत्यूला मानवी जीवननाट्यांतील खलनायक मानून त्याच्याविषयीं अनेकांनीं धसकी घेतली आहे. पण त्याचा अहंकार गडकऱ्यांच्या कपटी वृंदावनापेक्षां कंकणाच्या भाबड्या अस्मितेच्या जातींतला आहे

हें ज्या धीरमतींना ओळखतां आलं त्यांनीं उलट त्यांचीच फटफजिती करून इतरांचा त्यांच्याविषयींचा संभ्रम दूर करण्याचा यत्न केला आहे.

देशाच्या स्वातंत्र्यासाठीं हंसत हंसत फांसावर लटकणारे क्रांतिवीर, धगधगत्या चितेंत शिरून मरणाऱ्या ज्वालेपेक्षांहि पातिनिष्ठा अधिक ज्वलंत असल्याचं सत्य जगाच्या निदर्शनास आणून देणाऱ्या शूर सती, रसरसलेल्या अग्निकुंडांत पटापट उड्या घेऊन शीलाचं संरक्षण करणाऱ्या रजपूतरमणी—

या साऱ्यांनीं कृतांताला हंसतमुखानं कवटाळून त्यालाच चकित केलं नाहीं का ?

मृत्यूला फजित करण्याची असली संधि स्वर्गांत कुठून मिळायला !

स्वर्गाच्या बाजारपेठेंत न मिळणाऱ्या चिजांची यादी करायला बसलों तर ती केवढीतरी लांबलचक होईल.

हास्य, अश्रु, कल्पना...

यांपैकीं एकेकावरून सारा स्वर्ग ओवाळून टाकावा अशी त्यांची योग्यता आहे.

मनुष्याच्या मनःक्षोभाचा परिहार करण्यासाठीं अन् त्याच्यांतले दोष घालविण्यासाठीं विनोदाचा जन्म झाला खरा; पण साऱ्या मानवजातीला खदखदून हंसवायला लावणाऱ्या या शक्तीबद्दल मला असं कांहीं जबरदस्त आकर्षण वाटत आलं आहे कीं मी पुष्कळदां मनाशीं म्हणतों, ‘ विनोदानं मनुष्याला आपल्या अंगचे दोष घालवून देतां येवोत न येवोत; त्यामुळं त्याला खदखदून हंसतां येतं हा काय थोडा लाभ झाला ? ’

स्वर्गांत दोष आणि दुःख यांचा अभाव असल्यामुळें तिथं विनोदाची गरजच उरत नाहीं, There is no humour in heaven असं कोणत्याशा पाश्चात्य टीकाकारानं म्हटलं, त्यांत हाच अभिप्राय मार्मिकपणानं सूचित केला आहे त्यानं !

नारदासारख्या विनोदशील वृत्तीच्या विभूतींनाहि विनोदाची हौस भागविण्यासाठीं वारंवार भूतलावर यावं लागलं होतं, ही गोष्टहि वरील विधानाला पुष्टि आणीत नाहीं का ?

स्वर्गांत हास्याला स्थान नाहीं तसं अश्रूंनाहि नाहीं. फार काय, रस पदवीला पोंचण्याइतकी शृंगार, वीर, वात्सल्यादि कोणत्याहि भावनेची उत्कट अवस्था पृथ्वीतलावांचून अन्यत्र कुठंहि आढळून यायची नाहीं ! कारुण्यानं ओथंबलेलं रामायण, वीररसानं भरलेलं महाभारत, भक्तिरसानं नटलेली ज्ञानेश्वरी या साऱ्या वाङ्मयीन कृति मानवी सामर्थ्याविषयींच्या अपूर्णतेच्या जाणिवेंतून निर्माण झाल्या नाहींत का ?

देवांना इच्छित वस्तु देणाऱ्या स्वर्गांतल्या कल्पवृक्षापेक्षांहि मनुष्याच्या ईप्सितांची पूर्ति करणारी ही वाङ्मयांतली कल्पकताच मला किती तरी श्रेष्ठ दर्जाची वाटते !

तात्पर्य,या मर्त्य लोकांत प्रसूतीच्या कळा आहेत,तसं नवनिर्मितीचं समाधानहि आहे; अपमानाचीं शल्यं आहेत, तशीं सन्मानाचीं फुलंहि आहेत; निराशेचा अंधकार आहे, तसा आशासिद्धीचा प्रकाशहि आहे; अज्ञेयाचं धुकं आहे, तसं बोधाचं चांदणंहि आहे !

कैलासेश्वराचं तांडव आणि गिरिकन्येचं लास्य, सागराचा प्रक्षोभ आणि पुष्करिणीची शांतता, अग्नीची दाहकता आणि चंदनाची शीतलाई, दुष्टांचे फूत्कार आणि सज्जनांची फुंकर, ज्या ऐहिक जीवनांत एकवटलेलीं पहायला मिळतात, त्याला कडवट पण रुचकर खमंग मेथीच्याच भाजीची उपमा देणं इष्ट नाहीं का ?

माझ्या त्या मित्रानं ‘ भाजींत भाजी मेथीची अन् सुधा माझ्या प्रीतीची ! ’ असं उखाण्यांत नांव घेतलं, त्यांत फक्त एकच अक्षर वाढवून मी असं म्हणेन, “ भाजींत भाजी मेथीची अन् ‘ वसुधा ’ माझ्या प्रीतीची ! ”

—अप्रकाशित

## श्री. बालशंकर देशपांडे यांच्या पुस्तकांवरील

# अभिप्राय

"चमत्कृतिजनक कल्पकता हाच श्री. देशपांडे यांच्या सर्व लेखनाचा विशेष आहे. ही कल्पकता कधीं विनोदी वेष करून वावरते, कधीं काव्यकल्पनेचें तलम पातळ नेसते आणि कधीं कधीं ती सुंदर सुभाषितांचा शृंगार करूनहि मिरविते."

—**वि. स. खांडेकर** ( प्रस्तावना, श्रावणांतल्या विजा )

*　　*　　*

"लघुनिबंधांत प्रगट झालेली लेखकाची चातुरी विलोभनीय आहे."—**राजकवि यशवंत** (म. सा. पत्रिका एप्रिल-जून १९४९)

*　　*　　*

"उपरोधाचें व विनोदाचें दुर्मिळ वैशिष्ट्य श्री. देशपांडे यांना लाभलें आहे." —**पु. भा. भावे** ( आदेश, २७-६-४६ )

*　　*　　*

"आपल्या लिखाणांत कल्पनारम्यता, ध्येयवाद व खुमासदार विनोद साधून श्री. देशपांडे यांनीं स्वतःबद्दल वाचकांत विशेष अपेक्षा निर्माण केल्या आहेत" —**प्रा. कु. मनु नातु**, एम्. ए. ( नागपूर नभोवाणीवरील पुस्तकपरीक्षण )

*　　*　　*

"हा संग्रह विनोद, उपरोध, कल्पकता व सुंदर भाषाशैली यांनीं वाचनीय झाला आहे." —**नवयुग** ( २५-६-५० )

*　　*　　*

" सखोल चिंतनशीलतेमुळें त्यांचे लघुनिबंध विचारी वाचकाला मोह घालतील." —विविधवृत्त ( १३-६-४९ )

* * *

" कल्पकता आणि विनोदबुद्धि हीं त्यांच्या सर्वच लिखाणांत प्रकर्षानें आढळतात." —धनुर्धारी ( २-७-४९ )

* * *

" हे निबंध त्यांचें भाषाप्रभुत्व, व्यापक वाचन व व्यासंग आणि आर्थिक निरीक्षण यांची साक्ष देणारे आहेत."

—नवाकाळ ( २९-६-४९ )

* * *

" भाषेवरील प्रभुत्व वाखाणण्यासारखें असून निरीक्षणशक्ति व कोटिपूर्ण भाषाशैली प्रभावी आहे." —दै. भारत ( ७-६-४९ )

* * *

" लेखक रसिक, व्यासंगी असून त्यांचें अनुभवभांडार खोल व विस्तृत आहे. गडकरी, खांडेकर व अत्रे यांच्या लेखनगुणांची अनेकदां आठवण करून देणारा हा संग्रह आहे."

—ज्ञानप्रकाश ( ३० ६-४९ )

* * *

" भाषा प्रौढ असून त्यांना आपल्या लिखाणांत गोड विनोदही निर्माण करतां येतो." —अखंड भारत ( २६-६-४९ )

* * *

" सुंदर कल्पना, चमकदार सुभाषितें व खोचक उपरोध करण्यांत त्यांचा हातखंडा आहे." —युगवाणी (सप्टेंबर १९४७)

* * *

" उपरोधपूर्ण विनोद, प्रसंगानुरूप सुभाषितें व भाषालालित्य यांची जोड मिळाल्यामुळें कादंबरी वाचनीय झाली आहे."

— साहित्य ( मे १९४९ )

" असामान्य कल्पकता, रचनाचातुर्य, उपहास, उपरोधगर्भ विनोद, भाषेची प्रसन्नता आणि आंतरिक तळमळींतून निघालेला दुर्दम्य ध्येयवाद हे श्री. देशपांडे यांच्या साहित्याचे गुणविशेष होत."

—हिंद ( सप्टेंबर १९४९ )

* * *

" ठिकठिकाणीं विखुरलेले विनोदाचे अंकुर एक प्रकारची मजेशीर अवीट गोडी निर्माण करतात."—**सुषमा** (सप्टेंबर १९४९)

* * *

" विनोदी वृत्तीचा उपयोग करून आपल्या लिहिण्यांत खेळकरपणा आणि प्रसन्नता निर्माण करण्याची हातोटी त्यांना चांगलीच साधली आहे."

—**समीक्षक** ( एप्रिल १९४६ )

* * *

" खांडेकर-पद्धतीचें निवेदनकौशल्य आणि लालित्य यामुळें हा संग्रह बराच वाचनीय झाला आहे."

—**किर्लोस्कर**

* * *

" श्री. देशपांडे यांच्या भाषेचा प्रवाह मोहक, गंभीर, खेळकर, चमकदार अशीं निरनिराळीं वळणें घेत भावनांच्या प्रकारानुसार वहात असलेला पाहून त्यांच्याविषयीं अपेक्षा बाळगावयास हरकत वाटत नाहीं."

—**वाङ्मयशोभा** ( मे १९४६ )

* * *

" निव्वळ बाह्य सौंदर्यांनीं मनाला भुलाविणारी कलाप्रीति यांच्या ठिकाणीं दिसत नाहीं. तर मानवी अंतःकरणांत विचारांचीं बीजें रुजवून अवाक् पण सूचक अशा नर्म लीलांनीं मानवजातीचें अभिष्ट साधणें हें श्री. देशपांडे यांच्या कलेचें नियत कार्य आहे."

—**महाराष्ट्र, नागपूर** ( २४।३।१९४६ )

* * *

" आजकालच्या यशस्वी लघुनिबंधकारांत श्री. देशपांडे यांनी आपलें स्थान वैशिष्ठ्यानें प्राप्त करून घेतलें आहे. त्यांचा व्यासंग आणि स्वतःचें तत्त्वज्ञान, वेगळेपणानें मांडण्याची मोहक पण भारदस्त हातोटी यांचा प्रत्यय जागोजाग हा संग्रह ( तांडव आणि लास्य ) वाचतांना येतो. " —महाराष्ट्र, पुणें ऑगस्ट १९५०

* * *

REFBK-0007553